म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र. 2033
REFBK-0012745



# रवींद्र झंकार

## काका कालेलकर

पॉप्युलर बुक डेपो, लॅमिंग्टन रोड, मुंबई ७

२०३३

७५६९८
२०/३/७९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ७५६९८ वि: काव्य
वर्ग २०३३ नों. दि. २०।३।७९

# रवींद्र-झंकार

रवींद्रनाथ टागोरांच्या
४३ बंगाली गीतांचें
मनन व भाषांतर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९२८४९

काकासाहेब कालेलकर

REFBK-0012745
REFBK-0012745

पॉप्युलर बुक डेपो, मुंबई ७

© काकासाहेब कालेलकर

प्रथमावृत्ति
मार्च १९६२
फाल्गुन १८८३

मुद्रक :
बा. ग. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
चिराबाजार
मुंबई २

प्रकाशक :
ग. रा. भटकळ
पॉप्युलर बुक डेपो
लॅमिंग्टन रोड
मुंबई ७

# निरोप घेतांना

मराठी वाचकांना सादर केलेलीं 'रवींद्र-मनन' आणि 'रवींद्र-वीणा' हीं दोन पुस्तकें आणि आतां त्यांच्या कानीं पडणारा हा 'रवींद्र-झंकार' मिळून रवींद्रांच्या मूळ बंगाली गीतांजलीचें मनन–चिंतन आणि रसग्रहण पुरें होत आहे. रवींद्र–मननाच्या प्रस्तावनेंत मीं लिहिलेंच आहे कीं मूळ गीतांजलींतील गीतांची निवड मीं केली नाहीं. आम्ही जेलमधें असतांना श्री. बिसेन यांनीं अेखादें गीत निवडावें आणि वाचून दाखवावें, आणि मीं तत्काल त्या गीताविषयीं लिहावें असा आमचा क्रम चालू होता. श्री. बिसेन यांनीं रवि-बाबूंच्या कोणच्या ग्रंथांतून गीत घेतलें याचाहि मी त्यावेळीं विचार करीत नव्हतों! गीत समोर आलें आणि कानीं पडलें म्हणजे त्याच्या भावनेंत रममाण व्हावयाचें आणि सुचेल तें लिहवून घ्यावयाचें अेवढेंच त्यावेळीं मला बस होतें.

ही सारी प्रवृत्ति स्वान्तःसुखाय घडली असल्यामुळें प्रकाशनाचें काम राहूनच गेलें. पुढें श्री. रवीन्द्र केळेकर आणि श्री. नरेश मंत्री यांनीं त्या वह्या पाहून मला त्यांची आठवण दिली. श्री. सदानन्द भटकळ यांनीं तो सर्व मसाला प्रकाशित करण्याचा अुत्साह दाखविला आणि या तिघांच्या आग्रहाला मी आनंदानें व बऱ्याचशा अंशानें कृतज्ञतेनें वश झालों.

कारागृहामधें समान–व्यवसायी लोकांचा सहवास असला तरी आणि जेल चालवणाऱ्या आणि जेल-जीवन सहन करणाऱ्या लोकांशीं नित्याचा संबंध येत असला तरी कारागृहवासाला अेकापरी अेकान्तवास म्हणतां येईल. आग-गाडींत चढल्यानंतर गप्पा मारा, झोंप काढा, पुस्तक वाचा किंवा सृष्टि-निरीक्षण

करा. वेगाचा प्रवास आपोआप घडतच असतो. त्यासाठीं पाय चालवावे लागत नाहींत. त्याचप्रमाणें स्वराज्याच्या चळवळींत भाग घेतल्यामुळें कारागृहांत पोंचल्यानंतर कांहींहि न करतां आपोआप देशसेवा घडल्याचें पुण्य आपल्या खातीं जमा होत असतें आणि वाचन, चिंतन, मनन आणि सरकारनें सोय मिळूं दिली तर लेखन चालवायला मन मोकळें होतें. म्हणूनच कारागृह–वासाला मीं अेकान्तवास म्हटलें आहे.

या अेकान्तवासांतील रवींद्र–प्रतिभेचें जें श्रवण–मनन घडलें तें अितरांनीं वाचावें अशी अिच्छा नव्हती असें नव्हे. पण वाचक मिळोत किंवा न मिळोत आपल्याला चिंतनानन्दाचे 'प्रामोद्य–सागर' मिळत आहेत, तेच 'पर्याप्त' आहेत असा आत्मनेपदी संतोष वाटला होता.

त्या मननाचें हें तिसरें पुस्तक हातावेगळें करतांना मीं हिशेब करून पाहिला आणि दिसून आलें कीं बंगाली गीतांजलींतील १५७ गीतांपैकीं या ग्रंथ-त्रिवेणींत १२९ गीतें येअून गेलीं आहेत. आतां चुटपुट लागली आहे कीं बाकीचीं २८ गीतेंदेखील घेतलीं असतीं तर किती चांगलें झालें असतें. ज्या अिंग्रजी गीतांजलि ग्रंथानें रवींद्रांचा जगाला प्रथम परिचय करून दिला आणि जी वाचून मीच काय, आमच्या वेळची संस्कार–प्रेमी तरुण पिढी अगदीं भारून गेली होती, त्या गीतांजलीच्या मूळ बंगाली संग्रहाचें समग्र विवेचन केल्याचा संतोष वाटला असता. पण आतां हीं अठ्ठावीस गीतें घेणें शक्य नाहीं. वेळ जरी काढला तरी कारागृहांतील अेकान्तवासाची मनमोकळीक आतां साधावयाची नाहीं. त्यावेळींच झालें असतें तर सहज झालें असतें.

गीतांजलि जेव्हां – इंग्रजींतून का होअीना – प्रथम हातीं आली आणि आम्ही आधाश्यासारखें तिचें सेवन केलें ते दिवस आजहि आठवतात. देशसेवेचा मार्ग अगदीं खुंटल्यामुळें आध्यात्मिक साधनेसाठीं हिमालयांत वर्ष दोन वर्षें घालवून परतत होतों. अशा अैन वेळीं गीतांजलीचें श्रवण घडल्यामुळें निसर्गानंद, काव्यानंद, भक्तिरसाचा अवीट आनंद आणि भारतीय संस्कृतीच्या शिखराचें उज्ज्वल दर्शन गीतांजलींत अेकवटलें आहे असें त्यावेळीं वाटल्यास तें कांहीं अनाठायीं नव्हतें.

गीतांजलि अेकट्यानें ही वाचावी, स्नेह्यासोबत्यांच्या बरोबर बसून ही वाचावी अशा व्यवसायांत कांहीं दिवस गेले. पुढें राष्ट्रीय वृत्तीच्या विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीची कल्पना देण्यासाठीं रवींद्रनाथ, स्वामी विवेकानन्द, डॉ. आनन्द-कुमार स्वामी, लाला हरदयाळ, भगिनी निवेदिता, डॉ. राधाकृष्णन्, तरुलता दत्त, सरोजिनी नायडू अित्यादि भारतीय मनीषींचें अिंग्रजी साहित्य विद्यार्थ्यां-बरोबर वाचण्याचा क्रम सुरू केला. त्यांत गीतांजलि होतीच आणि शेवटीं स्वराज्याचें फळ हातातोंडाशीं आलें असतांना मननाची जी शेवटची संधी लाभली तेव्हां पुन्हा अेकदां रवींद्र-चिंतन घडलें.

अशा या गुरुस्थानीं असलेल्या ग्रंथाला हातावेगळा करीत असतांना वर्षानुवर्ष ज्या भक्तिभावाचें सेवन केलें त्याला अुचंबळा येणें अपरिहार्य आहे आणि त्यांत पुन्हां गेलें वर्ष सबंध राष्ट्रानें 'रवींद्र जन्म शताब्दी' अुजविण्याचें ठरवून स्वदेशी-विदेशी रवींद्रभक्तांना त्या विश्वकवीचें सान्निध्य अनुभवावयास लावलें हीहि धन्यता कांहीं थोडी थोडकी नव्हे.

रवींद्रांच्या जीवन-दृष्टीविषयीं आणि त्यांच्या जीवनोपासनेविषयीं मीं अन्यत्र पुष्कळ लिहिलें आहे आणि गेल्या वर्षी तर रवींद्राविषयीं लोकांनीं अितकें कांहीं बोलून घेतलें आहे कीं कोंकणी म्हणीप्रमाणें 'अस्वलापेक्षां दरवेशाची हुवेल अधिक' असेंच सामान्य लोकांना वाटावयाचें. या प्रस्तावनेंत मला फक्त अवभृथ-स्नानाचा संतोषच व्यक्त करावयाचा होता.

'मनन', 'वीणा' आणि 'झंकार' या तिन्ही पुस्तकांत गीतांजलींतील मूळ पद्यें दिलीं आहेत. हीं पद्यें कशीं वाचावयाचीं त्याचे नियम 'मनना'च्या शेवटीं परिशिष्टांत दिले आहेत. बंगाली अक्षरांचें, स्वरांचें, व्यंजनांचें आणि युक्ताक्षरांचें अुच्चारण कांहींसे निराळें असल्यामुळें त्यांच्या पद्धतीनें हीं गीतें वाचल्यावांचून त्यांतील लय, ताल आणि भार यांचा बोध बरोबर होत नाहीं आणि अर्थात् गीतांचें माधुर्य मनावर पूर्णपणें ठसत नाहीं.

रवीन्द्रनाथांच्या सर्व कृतींत विचार आणि भावना यांचा अुत्कर्ष तर असतोच. पण त्यांचें खरें कौशल्य शब्दयोजनेंतील नादमाधुर्यांत आहे. अेवढेंच नव्हे तर त्यांच्या सर्व काव्यांना संगीताची असाधारण जोडहि आहे.

रवींद्रांचें अिंग्रजी 'गीतांजलि' पुस्तक वाचत असतां त्यांतील गद्यांत देखील जें नादमाधुर्य आहे आणि वाक्यावाक्यांत लयाचा जो ठेका आहे त्याचा कैफ चढल्यावांचून रहात नाहीं. या गद्यशैलीच्या यशामुळें त्यांनीं बंगालींत कांहीं गद्य रेखाचित्रें लिहून काढलीं होतीं. त्यांचा संग्रह त्यांनीं 'लिपिका' या नांवानें प्रकाशित केला आहे. त्यांचा विचार 'लिपिका' अथवा 'कथिका' हीं रेखाचित्रें कवितेच्या पद्धतीनें छापण्याचाहि होता. पण तशी हिम्मत त्यांना झाली नाहीं. रवींद्रांच्या नादमधुर गद्यशैलीचें अुत्तम अध्ययन केल्यावांचून त्याचें अनुकरण कुणी करूं नये. अिंग्रजी गीतांजलि प्रसिद्ध झाल्यानंतर भारतांतील जवळ जवळ सगळ्याच भाषांमध्यें त्या शैलीचें अनुकरण पुष्कळांनीं करून पाहिलें.

गुजरातमध्यें तर असा प्रकार झालाच. पण आधुनिक काळांतील महाकवि न्हानालालच्या गद्यशैलींतील डोलन गुंजनाचें अनुकरणहि पुष्कळ झालें. कवि खबरदारनें त्या शैलीला 'नव्हे पद्य नव्हे गद्य' असें ठरवून अपद्यागद्य असें नांवहि दिलें होतें. कलेच्या बाबतींत पुष्कळ वेळां अनुकरण म्हणजे मरण असाच अनुभव येतो.

पण अशी डोलन–गुंजन युक्त गद्यशैली कितीहि श्रवणरुचिर आणि मोहक असेना का, तिला बंगाली गीतांची सर कधींहि यावयाची नाहीं.

कांहीं काळ रवींद्रांच्या शांतिनिकेतन या शिक्षणसंस्थेंत रहाण्याची संधी मिळाल्यामुळें गीतांजलींतील गीतें अनेक वेळां अैकायला मिळालीं. कधीं कवीच्या तोंडून आणि कधीं त्यांचेकडून शिकलेल्या अध्यापकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या तोंडून. बंगालांत रवींद्रांना कोकिळकंठ – रवींद्र म्हणत. त्यांच्या तोंडून त्यांचीं गीतें अैकत असतां आपण गंधर्वलोकींच पोहोंचलों आहोंत असें वाटूं लागे.

संगीताची असली ही जोड गद्य भाषांतराला नसल्यामुळें गीतांजलीचा पूर्ण आस्वाद येथें मिळूं शकत नाहीं. आणि जीं थोडीं पद्यमय भाषांतरें पहावयास मिळालीं त्यांनीं तर विषादच वाटला. पद्यमय भाषांतर करीत असतांना मुळांतील भावदेखील दुखवला जाण्याची भीति असते आणि रविबाबूंना तर आपल्या गीतांचा राग बदललेला देखील आवडत नसे.

रवींद्रांच्या गीतांचा भावनात्मक परिचय करून देण्याचाच प्रयत्न येथें केलेला आहे. मूळ गीतें दिलीं असल्यामुळें थोड्याशाच परिचयानें त्यांतील साहित्यकलेचा आणि शब्दरचनेचा आनंद मिळूं शकेल.

याहून ज्यांना पुढें जावयाचें असेल त्यांनीं रवींद्र-संगीताच्या ग्रामोफोनी तबकड्यावरून तें अैकलें पाहिजे अथवा रवींद्र-परंपरेनें गाणाऱ्यांच्या तोंडून हीं गीतें ऐकून समाधान मानलें पाहिजे. ज्यांना संगीताची गोडी आहे, पण त्याचें अंग नाहीं त्यांनीं तो आनंद व्यक्त कसा करावा? 'गुंगेको सपनो भयो समुझ समुझ पछताय' अेका मुक्या मनुष्याला सुंदर स्वप्न पडलें. त्याची आठवण वारंवार होतें. पण दुसऱ्यापुढें तें व्यक्त कसें करणार ?

प्रस्तुत पुस्तकाला अेक सविस्तर सूची जोडून गीतांजलींतील कोणतें गीत कोणत्या पुस्तकांत कोठें सांपडेल याची सोय श्री. नरेश मंत्रींनीं करून दिली आहे. कित्येक मित्रांचा विचार म न न, वी णा, झं का र हीं तिन्ही पुस्तकें अेकत्र बांधून बाळगण्याचा आहे. त्यांना तर ही सूची फारच अुपयोगी ठरेल.

हीं तीन पुस्तकें आणि 'र वीं द्र-प्र ति भे चे कों व ळे कि र ण' हें चौथें पुस्तक हीं रवींद्र-अुपासकांनीं जर अेकत्र वाचलीं तर त्यांना माझ्या रवींद्र-दर्शनाची कल्पना होअूं शकेल.

गुजरातीमधें निरनिराळ्या वेळीं रवींद्राविषयीं मीं जे लेख लिहिले त्यांचा संग्रह 'रविच्छवीचे अु प स्था न आणि त र्प ण' या नांवानें नुकताच प्रकाशित झाला आहे. तोहि माझी श्रद्धांजलीच आहे. रवींद्रनाथ आतां समग्रपणें मराठींत अवतरणार आहेत याचेंहि मोठें समाधान आहे.

नवी दिल्ली १४-३-६२ —काका कालेलकर

# गीत – सूची

[ कंसांतील नागरी आंकडे बंगाली गीतांजलींतले गीत–क्रमांक दर्शवितात व इंग्रजी आंकडे इंग्रजी गीतांजलींतले गीत–क्रमांक सुचवतात. आरंभीचे आंकडे या पुस्तकांतील गीतांचे पृष्ठ–क्रमांक सुचवतात. ]


३२ आकाशतले अुठल फुटे ( ४८ )
२८ आजि श्रावण घन गहन मोहे ( १८ )
२३ आनन्देरअि सागर थेके ( ९ )
४ आबार अेरा छिरे छे थोर मन ( ३३ )
७६ आबार असेछे आषाढ आकाश छेये ( ९९ )
६७ आनार अे प्रेम नय तो भीरु ( ८९ )
६१ आमार अकला घरेर आड़ाल भेड़े ( ८४ )
१७ अेअि मलिन वस्त्र छाड़ते हबे ( ४१ )
७८ अेअि मोर साध जेन अे जीवनमाझे ( १०२ )
९७ अेकटि नमस्कारे, प्रभु ( १४८ ) ( 103 )
६४ अेका आमि फिरब ना आर ( ८५ )
१४१ ओगो आमार ओअि जीवनेर ( ११६ ) ( 91 )
४९ ओगो मौन, ना जदि कओ ( ७१ ) ( 19 )
८० के बले सब फेले जाबि ( ११२ )
९४ गान दिये जे तोमाय खूँजि ( १३२ ) ( 101 )
२० जगते आनन्दयज्ञे आमार निमंत्रण ( ४४ )
१११ जड़ाये आछे बाधा, छाड़ाये जेते चाअि ( १४५ ) ( 28 )
९१ जड़िये गेछे सरु मोटा ( १२८ )
१०८ जा दियेछ आमार अे प्राण भरि ( १३९ )
४० जीवन जखन शुकाये जाय ( ५८ ) ( 39 )

१०२ जीवने जा चिरदिन ( १४९ )
१४५ जेन शेष गाने मोर सब रागिणी पुरे ( १३४ ) ( 58 )
५८ तारा तोमार नामे बाटेर माझे ( ८१ )
५५ तारा दिनेर बेसा अेसेछिल ( ९० ) ( 33 )
३७ तुमि अेबार आमार लहो हे नाथ, लहो ( ५७ )
१३२ तुमि नब नब रूपे अेसो प्राणे ( ७ )
१ तोमाय खोंजा शेष हबे ना मोर ( १३३ )
५२ दया दिये हबे गो मोर ( ७५ )
६९ देवता जेने दूरे रअि दाँड़ाये ( ९२ ) ( 77 )
११ निशार स्वपन छुटल रे अेअि ( ३७ )
७ पारबि ना कि जोग दिते अेअि छन्द रे ( ३६ ) ( 70 )
८७ प्रभुगृह हते आसिले जे दिन ( १२३ ) ( 85 )
१४८ प्रेमेर हाते धरा देब ( १५१ ) ( 17 )
४३ बिस्व जखन निद्रामगन ( ६० )
८४ मानेर आसन, आरामशयन ( १२२ )
७३ मुख फिराये रब तोमार पाने ( ९८ )
१ मेघेर ’परे मेघ जमेछे ( १६ ) ( 18 )
४६ मेनेछि, हार मेनेछि ( ६३ )
३१ रूपसागरे डुब दियेछि ( ४७ ) ( 100 )
१४ शरते आज कोन् अतिथि ( ३८ )
सुन्दर, तुमि अेसेछिले आज प्राते ( ६७ )
११५ हे मोर चित्त, पुण्य तीर्थे ( १०६ )
१३५ हे मोर दुर्भागा देश, जादेर करेछ ( १०८ )

**परिशिष्ट**

१. कांहीं टीपा ......
२. गीतांची समग्र सूची ......

# रवींद्र - झंकार

१२६८४

# १

कृष्णगोपींच्या प्रेमसाहित्यांत असे प्रसंग वर्णिलेले असतात कीं, श्रीकृष्ण रात्रीं कुडकुडत राधेच्या घरीं जातो आणि ती त्याला तुझी निष्ठा खरी नाहीं असें म्हणून घरांत घेत नाहीं आणि तो बाहेरूनच स्वतःचे कसे हाल होताहेत, थंडीनें कसा गारठून गेला आहे आणि त्याची निष्ठाहि कशी मजबूत आहे याचें सविस्तर वर्णन करून काकुळतीला येत आहे. शेवटीं राधेला दया येते व ती दार अुघडून कृष्णाला आंत घेते.

या काव्यांत भक्त ओीश्वराजवळ तशीच काकुळती करीत आहे. तो कबूल करतो कीं, दिवसभर दिवसाचा व्यवहार असल्यामुळें अनेक लोकांच्या सहवासांत आपण मग्न होतों. त्यावेळीं भगवंताची विस्मृति झाली होती, भगवंताच्या सहवासाची गरज भासत नव्हती. पण जेव्हां व्यवहार संपला – बाजार अुठला आणि अेकाकी पडल्यामुळें स्वतःविषयींचे विचार मनांत अुद्भवले तेव्हां स्वतःची असहायता आणि दुर्दशा ध्यानांत आली आणि ओीश्वराचे चरणीं केव्हां पोहोंचूं अशी तळमळ लागली. संसाराची – व्यवहाराची गोडी होती तोंवर ओीश्वराचें स्मरणहि झालें नाहीं. आतां सर्वप्रकारें हरल्याप्रमाणें झालें आहे. आतां तर संसार म्हणजे सोसाट्यानें वाहणारा नि हाडन् हाड गारठून टाकणारा असा वाराच होय

असें वाटतें. आणि वरून तर पावसाच्या झडीलाहि खळ नाहीं. अशा वेळीं जर भगवंतानें दूर केलें तर भक्तानें जावें तरी कोठें ?

मेघेर 'परे मेघ जमेछे,
आँधार करे आसे—
आमाय केन बसिये राख
एका द्वारेर पाशे।
काजेर दिने नाना काजे
थाकि नाना लोकेर माझे,
आज आमि जे बसे आछि
तोमारि आश्वासे।
आमाय केन बसिये राख
एका द्वारेर पाशे।

तुमि जदि ना देखा दाओ
कर आमाय हेला,
केमन करे काटे आमार
एमन बादल-बेला।
दूरेर पाने मेले आँखि
केवल आमि चेये थाकि,
परान आमार केंदे बेड़ाय
दुरन्त बातासे।
आमाय केन बसिये राख
एका द्वारेर पाशे।

"ढगावर ढग गोळा होऊन सर्वत्र अंधार पसरला आहे. अशा वेळीं हे करुणानिधाना, मला दरवाज्याबाहेर एकटाच कां बसवून ठेवलें आहेस ? दार उघडून मला आंत कां घेत नाहींस ?

कामाच्या दिवशीं अनेक प्रकारच्या व्यवहारांत अनेक लोकांच्या सहवासांत मी मग्न होतों. आतां मात्र तें सर्व सुटून फक्त तुझ्याच आशेवर मीं येथें बसलों आहें. मला आतां घराबाहेर दारासमोर एकल्या–अटूल्यासारखा बसवून कां ठेवतोस ?

तूं जर दार उघडून मला दर्शन दिलें नाहींस आणि अवहेलना केलीस तर मीं असला हा दुर्दिन कसा कंठावा ? दूरवर नजर करून मी आकाशाकडे पहात राहतों आणि या तुफान वाऱ्यानें झोडपला गेल्यामुळें माझा प्राणहि रडकुंडीस आला आहे आणि तो या तुफानी दुर्दान्त वाऱ्याबरोबर आक्रंदन करीत भटकूं लागला आहे. हे करुणानिधाना, अशा वेळीं मला बाहेर अेकाकी कां बसवून ठेविलें आहेस ? दार उघडून आंत घेणें इतकें का जड आहे ?"

# २

जुन्या कवींनीं मोहांध दशेचें अनेक परीनें वर्णन केलें आहे. साधकाच्या अुत्कटतेचीं वर्णनें अमाप आहेत, साधना अखंड चालविली तरी भगवंताचे चरण दिसत नाहींत म्हणून भक्तांनीं फोडलेला टाहो हि वर्णिला आहे आणि भगवंतांनीं आयत्या वेळीं येअून भक्ताला अुराशीं धरून कृतार्थ केल्याचीं मधुर वर्णनेंहि केलीं आहेत.

पण भक्तानें थोडी साधना केली, भगवंताचे चरण ओझरते कां होअीनात त्याला पहावयास मिळाले. पण दुर्दैवानें साधना ढिली पडली. मन पुनः प्रपंचपरायण झालें. प्रथम प्रथम प्रपंचाच्या गोष्टी गोड वाटूं लागल्या त्यामुळें मनाची अेकाग्रता नष्ट होअून तें अनेक दिशांनीं भटकूं लागलें आणि शेवटीं ही सर्व भगभग वाढल्यानें चित्ताचा दाह होअूं लागला, अशा साधना-दुर्बळ स्थितीचें वर्णन जुन्या कवींनी केलेलें पहाण्यांत नाहीं.

अेकदां साधना करून कांहीं मिळविलें आणि पुढें ती शिथिल पडली म्हणजे मनुष्याचा साधनेवरील, स्वप्रयत्नावरील विश्वासहि ढिला होतो, अशा स्थितींत तो पश्चात्तापानें पुनीत होत असतांना भगवंताच्याच कृपेची याचना करतो कीं, आतां तूंच माझी लाज राख. मला

स्वतःच्या पायाजवळ ठेवून घे. दूर भटकलों तर मला खेंचून जवळ कर आणि तुझी वाणी माझ्या हृदयांत अखंड स्फुरत ठेवून मला जागवीत जा.

ध्यान आणि साधना ढिल्या पडल्यामुळेंच सर्व कांहीं फिसकटलें ही गोष्ट ध्यानांत आल्यानंतर कवि म्हणतो—

आबार अेरा घिरेछे मोर मन।
आबार चोखे नामे जे आबरण।
आबार अे जे नाना कथाअि जमे,
चित्त अमार नाना दिकेअि भ्रमे,
दाह आबार बेड़े ओठे क्रमे
आबार अे जे हाराअि श्रीचरण।

तव नीरव वाणी हृदयतले
डोबे ना जेन लोकेर कोलाहले।
सबार माझे आमार साथे थाको,
आमाय सदा तोमार माझे ढाको,
नियत मोर चेतना-'परे राखो
आलोके-भरा अुदार त्रिभुवन।

" पुनः या सर्व प्रापंचिक गोष्टी, हे माझे षड्रिपु, माझ्या मनाला घेरून टाकीत आहेत. अेकदां या मनाला कसेंबसें सोडविलें होतें. पण पुनः तें यांच्या तावडींत गेलें. माझ्या डोळ्यांवर आतां पुनः आवरण आलें आहे.

पुनः आतां त्या पूर्वीच्या नाना कथांचा माझ्या जीवनांत जम बसूं लागला आहे. आतां माझें हें चित्त नाना दिशांनीं भटकूं लागलें आहे आणि भ्रमिष्ट होत आहे. क्रमाक्रमानें जीवनामध्यें दाह सुरू झाला आहे, आणि भगवंता तुझीं जीं पावलें मला लाभलीं होतीं तींहि आतां मी पुनः गुमावून बसलों आहें.

साधना केली, तिचें फळहि थोडें बहुत मिळालें होतें. पण माझी दृढता टिकली नाहीं. मिळविलें तें घालविलें. आतां भगवंता माझ्यासाठीं कृपाकरून तूंच साधक हो आणि मला वांचवून घे.

तुझी नीरव वाणी माझ्या हृदयतलांत अशी कांहीं जाग्रत कर कीं जनसंमर्दांचा कोलाहल कितीहि माजला तरी ती त्यांत बुडून जाऊं नये.

मी जरी प्रापंचिक स्नेह्या सोबत्यांच्या आणि खुशालचेंडू लोकांच्या घोळक्यांत असलों तरी तूं मला सोडूं नकोस, तूं माझ्याजवळच अस. स्वतःच्या कृपेचा पालव ठेऊन तूंच मला सदा आपल्यांत झांकून ठेव आणि तुझें हें प्रकाशमय विशाल त्रिभुवन सदासर्वदा माझ्या चेतनेवर, जाणिवेवर पसरलेलें राहो."

# ३

**या** जगांत तूंच का अेकटा निराळा होणार ? आणि कृपण होअून सुख शोधणार ? ध्यानांत ठेव कीं, संभाळून ठेवण्यांत—संग्रह करण्यांत किंवा जगण्याची धडपड करण्यांत सुख नाहीं. प्रतिक्षण मरावें तेंव्हांच जगण्याचा आनंद लुटावा. हें जर तुला समजलें नाहीं तर तुझ्यासारखा करंटा तूंच. जरा या विश्वाकडे पहा, बघ तेथें काय चाललें आहे तें !!

सर्व कांहीं चाललें आहे, कांहींच थांबत नाहीं, यावें आणि जावें, नाचावें आणि विलीन व्हावें. हाच जगाच्या आनंदाचा प्रकार आहे. तोच ताल तुला कां साधूं नये ? जगांत राहून जर जगाचा हा परमधर्म तुला साधला नाहीं तर तुझ्या जीवनाचें आणि या विश्व-रासाचें तूं मातेरें करून टाकणार आहेस.

जग ज्या तालांत नाचत आहे त्याच्या तालांत समरस होणें तुला अगदींच अशक्य आहे काय ? सर्व कांहीं येतें आणि जातें, अुत्पन्न होतें आणि नष्ट होतें यांतच त्याचा खरा आनंद आहे. लाटा अुठतात, फुगतात आणि हांसत हांसत फुटतात; थोड्याशा पुढें सरून

परततात आणि पुन: नव्या दमानें फुगूं फुटूं लागतात. लाटा जर फुटल्याच नाहींत तर शिंक येतां येतां थांबल्यासारखा विरस व्हायचा.

जरा कान देअून अैक. आकाशांतून दाही दिशांतून मरण-वीणेचे सुंदर स्वर कसे अैकूं येत आहेत. सूर्य, चंद्र तारे अखंड तेवत आहेत. जणुं जळणें हाच त्यांचा आनंद.

जगांत सगळ्याच वस्तु वेड लावणाऱ्या संगीताच्या तालामध्यें कुठें तरी धांवत आहेत. कोठें तें कोणालाच ठाअूक नाहीं. पण त्यांना परत फिरावयाचें नाहीं, बंधनांत बांधले जाअून स्थिर व्हावयाचें नाहीं. कारण त्यांना फक्त धांवावयाचें आहे, पडावयाचें आहे, सुटावयाचें आहे, अखंड चालत रहावयाचें आहे. हाच त्यांचा आनंद, हीच त्यांची मौज.

याच आनंदाच्या तालावर पावलें टाकीत सहाहि ऋतु येतात, आपआपला नाच नाचतात आणि धबधब्याप्रमाणें अुड्या घेत पुढें जातात. त्यांचे बरोबर तऱ्हेतऱ्हेचे रंग, तऱ्हेतऱ्हेचीं गीतें आणि अुन्मादकारी सुगंध येतात आणि जातात. सर्व कांहीं अुधळावें, सर्व कांहीं पसरावें, आकाश भरून द्यावें आणि पहातां पहातां विरून जावें आणि नव्याला वाट करून द्यावी हाच त्यांचा आनंद.

सर्वांना हें सुचतें, आपोआप समजतें, सहज अंगवळणीं पडतें. मग तुलाच काय झालें आहे ? तूंच असा कंजूस कां – दुर्मुख कां ? सुखाच्या लोभानें आनंद गमावून बसतोस ? विश्वाच्या तालांत मिसळून जाणें तुलाच कां अितकें जड जावें ?

विनाश किंवा लय जर गायनाच्या समेप्रमाणें बरोबर साधला तर तोच आनंदाची परिसीमा होय. क्षणभंगुराची – समभंगुराची गोडी औरच असते. ती समजल्यावर बाकी तें काय उरणार !

पारवि ना कि जोग दिते अेअि छन्दे रे,
[1]खसे जाबार [2]भेसे जाबार
[3]भाङ्बारअि आनन्दे रे ।

---

१. खसे – तुटून. २. भेसे – वाहून. ३. भांगबार – मोडण्याच्या.

पातिया कान शुनिस ना जे
दिके दिके गगनमाझे
मरणवीणाय की सूर बाजे
        तपन-तारा-चन्द्रे रे
ज्वालिये आगुन धेये धेये
        ज्वलबारअि आनन्दे रे ।

पागल-करा गानेर ताने
धाय जे कोथा केअि बा जाने
चाय ना फिरे पिछन-पाने
    रय ना बाँधा बन्धे रे
लुटे जाबार छुटे जाबार
    चलबारअि आनन्दे रे ।

सेअि आनन्द–चरण–पाते
छय ऋतु जे नृत्ये माते
प्लावन बहे जाय धराते
        वरण-गीते गन्धे रे
फेले देबार छेड़े देबार
        मरबारअि आनन्दे रे

"या विश्वसंगीताच्या छंदांत तुला अेकराग आणि अेकताल होणें नाहीं का जुळावयाचें ? आनंदानें तुटावें, आनंदांत वाहून जावें, आनंदांत नष्ट व्हावें हें सर्व तुला नाहींच का साधणार ? कान दिलास तर तुला अैकूं येणार नाहीं का कीं, दिग्‌दिगंतरीं सबंध आकाशांत मरण–वीणेचे कसे अद्‌भुत सूर वाजत आहेत ते ? हा सूर्य, हे तारे आणि हा चंद्र आग पेटवून जळण्याच्याच आनंदानें कसे धांवताहेत. सगळ्याच वस्तु आपल्या गाण्याच्या सुरानें जगाला वेडें करून

*पारबि ना कि जोग दिते ओअि छन्दे रे,* ,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,, १

कुठें धांवत आहेत हें कोण सांगूं शकेल? या वस्तु माघार घेण्याची गोष्टच करीत नाहींत. बंधनाच्या पाशांत अडकून रहाण्याची त्यांची तयारी नाहीं. सुटून जावें, लुटले जावें आणि चालत रहावें या आनंदांतच सर्व वस्तु धांवत आहेत.

त्याच आनंदाच्या ठेक्यामध्यें सहाहि ऋतु नाचत येतात. सर्व जगाला रंग, गंध आणि गीतें यामध्यें बुडवून टाकूं पहात आहेत. सर्वत्र पसरावें, टाकून द्यावें, सोडून द्यावें आणि मरून जावें याच आनंदांत ते नाचत आहेत. तुला त्यांच्या त्या नाचांत सामिल होणें साधणार नाहीं का?"

# ४

अज्ञानाच्या मुग्धावस्थेमध्यें स्वतःच्या जीवनाचें सार्थक कशांत आहे याची कल्पना नसते आणि स्वतःची खरी शक्ति काय आहे याचेंहि भान नसतें. पुढें जेव्हां बुद्धि आणि समजूत वयांत येते तेव्हां अेकाअेकीं सर्व गोष्टी समजूं लागतात. जेथें अंधाराची रात्र होती तेथें प्रकाश झाला. स्वतःचे आसपास कांहींच जागा नाहीं असें वाटत होतें त्या अैवजीं विस्तीर्ण प्रदेश चारी बाजूला पसरला आहे आणि आपल्याला विकासासाठीं सर्व बाजूनें मुबलक मोकळीक आहे असा अनुभव आला. जगाशीं आपला कसलाच संबंध नाहीं असें जें प्रथम वाटत होतें त्याचे अैवजीं जगच अुलटें आपल्या दारांत येअून ठेपलें. अेवढेंच नव्हे तर त्या जगांत स्वतःसाठीं तें अेक जबाबदारीचें साधन आहे असें कळून चुकलें. ज्याच्या मदतीनें हा अज्ञानाचा पडदा तुटला त्याच्या संबंधानें कृतज्ञता–बुद्धि अुत्पन्न होअून हृदयानें त्याच्या चरणीं लोटांगण घेतलें आणि अशा समर्पणाच्या योगानें त्याला आपलेसें केलें.

ही सर्व पृथ्वी तर आपली होतेच पण आकाशांतील प्रकाश देखील पहांटेच्या स्वातंत्र्याचें वरदान देण्यासाठीं, हात पुढें करतो; आणि तुरुंगवास संपला आतां सर्वत्र मुक्ति आहे याची

घोषणा करण्यासाठीं, आणि जो तुरुंग होता तोच राजप्रासाद झाला आहे हें दर्शविण्यासाठीं दारीं जयध्वनीचा ललकार चालू होतो. रात्र संपली आणि पहांट झाली म्हणजे सगळी दुनिया बदलते आणि सर्व संबंध नवीन प्रकारचे होऊन जातात. जेथें आजवर गुलाम होतों तेथेंच आपण मालक बनतों आणि आपला सर्वांशी असलेला आत्मीयतेचा संबंध अनुभवास येतो.

निशार स्वपन छुटल रे, अेअि
छुटल रे।
टुटल बाँधन टुटल रे।
रअिल ना आर आड़ाल प्राणे,
बेरिये अेलेम जगत्पाने,
हृदयशतदलेर सकल
दलगुलि अेअि फुटल रे, अेअि
फुटल रे।

दुयार आमार भेङे शेषे
दाँड़ाले जेअि आपनि अेसे
नयनजले भेसे हृदय
चरणतले लुटल रे।

आकाश हते प्रभात-आलो
आमार पाने हात बाड़ालो,
भाङा कारार द्वारे आमार
जयध्वनि अुठल रे, अेअि
अुठल रे।

" मुग्ध निशेचें स्वप्न आतां ओसरलें, आणि माझें बंधन तुटलें. आतां माझ्या प्राणाच्या आड कसलेंच बंधन राहिलें नाहीं. आतां मी बाहेर पडून जगासमोर आलों आहें. माझ्या हृदयकमलाच्या सगळ्या पाकळ्या आतां अुमलल्या

आहेत. माझें दार तोडून शेवटीं तूं आपण होऊन माझे समोर उभा राहिलास. आणि तुला पहातांच माझें हृदय अश्रुजलानें भिजून जाऊन तुझ्या चरणीं त्यानें लोटांगण घेतलें आहे. आकाशांतून प्रभात-किरण माझेकडे आपले हात लांबवीत आहेत आणि माझ्या भग्नबन्दिखान्याच्या दरवाज्यांत आतां जयध्वनि होऊं लागला आहे."

## ५

लहानपणापासून आई-बापांच्या घरीं लाडांत वाढलेली मुलगी, तेथील प्रेमांत कितीहि गुरफटलेली असली तरी, तिचा हृदयनाथ तिला भेटतांच आणि त्याच्या मुरलीचें आमंत्रण ऐकतांच ती जसें आपलें सर्व पूर्वजीवन विसरून स्वाभाविकपणें त्याच्या मागोमाग जाते आणि त्याच्या जीवनांत स्वतःचें जीवन विश्वासानें आणि आनंदानें अेकरूप करून टाकते आणि हा अनोळखी आहे अशी कल्पनाहि ती मनांत येअूं देत नाहीं, त्याचप्रमाणें भक्ताच्या जीवनांत जेव्हां भगवत्कृपेचा शरदृतु सुफलित होतो तेव्हां तोहि आपलें सर्व पूर्वजीवन अेकदम विसरून भगवंताच्या कार्याला स्वतःला वाहून घेतो. अशा वेळीं भक्त स्वतःच्या हृदयाला म्हणतो —

शरते आज कोन् अतिथि
अेल प्राणेर द्वारे ।
आनन्दगान गा रे हृदय,
आनन्दगान गा रे ।

नील आकाशेर नीरव कथा
शिशिर-भेजा व्याकुलता
बेजे अुठुक आजि तोमार
वीणार तारे तारे

शस्यखेतेर सोनार गाने
जोग दे रे आज समान ताने,
भासिये दे सुर भरा नदीर
अमल जलधारे।

जे अेसेछे ताहार मुखे
देख रे चेये गभीर सुखे,
दुयार खुले ताहार साथे
बाहिर हये जा रे।

" शरद ऋतूच्या समृद्धीचा मुहूर्त साधून प्राणाच्या द्वारीं हा कोण अतिथि आला आहे? माझ्या हृदया, आतां सर्व कांहीं विसरून आनंदगान गाअूं लाग, आनंद गान गाअूं लाग. अभ्रें वितळून स्वच्छ झालेल्या या नील आकाशाची मूककथा, शिशिरदंवांनीं थबथबलेली व्याकुलता दोन्ही तुझ्या वीणेच्या तारांतारांतून झंकृत होअूं देत. गुंजू लागूं देत.

ही पहा ही पृथ्वी, हिनें आपल्या शस्यश्यामल शेतांतून सोनेरी गायनाची अेक लकेर सोडून दिली आहे. आतां तूं देखील साथ देण्यासाठीं बरोबर त्याच सुराशीं आपला सूर मिळवून तिच्याबरोबर गाअूं लाग आणि संगीताच्या स्रोताच्या निर्मळ जलधारेमध्यें स्वतःला वहात जाण्यासाठीं झोकून दे.

हा जो अतिथि येत आहे त्याच्या चेहऱ्याकडे, त्याच्या मुखारविंदाकडे, अंतरींच्या गभीर सुखानें पाहूं लाग आणि हे हृदया आपलें दार अुघडून त्याच्याबरोबर जाण्यासाठीं घरांतून बाहेर पड.

आजपासून तुझ्यासाठीं माहेर उरलें नाहीं. आतां तें तुझ्या वांट्याला परक्यांचें घर झालें. तुझा हृदयनाथ तुला भेटला. आतां उरलेलें आयुष्य त्याच्या सहवासांत त्याची अर्धांगी होऊन घालवायचें आहे. यासाठीं तूं आनंदगान गाऊं लाग, आनंदगान गाऊं लाग."

# ६

कर्मयोग आणि भक्तियोग हे जीवनपथाचे दोन विकल्प नसून गृहस्थाश्रम आणि वानप्रस्थाश्रमाप्रमाणें या दोन अवस्था आहेत. कर्मयोग हा दिवसभराच्या काबाडकष्टाप्रमाणें आहे. काबाडकष्टावांचून ज्याप्रमाणें पोट भरत नाहीं त्याचप्रमाणें कर्मयोगावांचून जीवन समृद्ध होऊं शकत नाहीं. पण ज्याप्रमाणें सगळा दिवस काम केल्यानें अंगांतील कपडे घामानें चिकचिकीत होतात आणि धुळीनें माखले जातात त्याचप्रमाणें कर्मप्रधान जीवनामध्यें जसजसा पुरुषार्थ वाढेल तसतसा परिग्रह वाढतो आणि अहंकार चिकटतो. कर्ममय जीवनांत सामर्थ्य आहे, समृद्धि आहे पण अंतिम समाधान निवृत्तिमय भक्तींतच असणार.

सर्व प्रकारच्या शुभ प्रवृत्तींनीं जीवन भरून काढलें म्हणजे मग परिपक्व वृद्धावस्थेंत निवृत्त होण्याचा अधिकार मनुष्याला मिळतो आणि मग त्या अलिप्त स्थितींत जर त्यानें भक्तीच्या सुवासानें आपलें जीवन भरून टाकलें तर सबंध आयुष्याची मेहनत कृतार्थ होते. पण आयुष्य जवळ जवळ संपत आल्यामुळें अंतिम भक्तिरसाला जी मुबलक फुरसत असावी लागते ती मात्र मिळेल अशी खात्री वाटत नाहीं. जर त्या शेवटच्या गोड घासा-

विषयीं कांहीं हुरहुर अुरत असेल तर ती एवढीच कीं, आतां भक्तीला अवकाशच कितीसा राहिला ?

ज्ञानोबांनीं अेक सुंदर संवाद लिहिला आहे. त्यांच्या पोरपणीं अेका वृद्धाशीं गांठ पडली असतां तो वृद्ध म्हणाला, "म्हातारपणीं भक्ति करूं." त्यावर ज्ञानदेवांनीं चुणचुणीतपणानें अुत्तरादाखल प्रश्न केला, "आयुष्य काय तुझें आज्ञाधारू ?"

अेअि मलिन वस्त्र छाड़ते हबे
हबे गो अेअिबार—
आमार अेअि मलिन अहंकार ।
दिनेर काजे धुला लागि
अनेक दागे हल दागि,
अेमनि तप्त हये आछे
सह्य करा भार ।
आमार अेअि मलिन अहंकार ।

अेखन तो काज साङ्ग हल
दिनेर अबसाने,
हल रे ताँर आसार समय,
आशा अेल प्राणे ।
स्नान करे आय अेखन तबे,
प्रेमेर बसन परते हबे,
संध्याबनेर कुसुम तुले
गाँथते हबे हार ।
ओरे आय, समय नेअि जे आर ।

" दिवसभराच्या कामामुळें माझें हें अंगाचें वस्त्र अनेक डागांनीं डागळलें गेलें आहे. अेरव्हीं शरीराला ताप झाला आहेच त्यांत आतां हे अंगांतील कपडे सहन करावयाचे म्हणजे मोठें ओझेंच आहे. आतां मलिन अहंकाररूपी हें वस्त्र तावडतोब सोडलेंच पाहिजे. कर्ममार्गी साधकाला अहंकार केव्हां व कसा गांठील हें सांगणें कठिण असतें, कारण अहंकार म्हणजे पुरुषार्थाची–पराक्रमाची छायाच नव्हे काय? अेखादा कबीरच आपली कांबळ अशा कांहीं युक्तीनें वापरतो कीं, जन्मभर तिचा अुपयोग करूनहि काम संपतांच 'ज्योंकी त्यों धरि दीनी चदरिया।' असें त्याला म्हणतां येतें. बाकीच्या सगळ्या सुर, नर, मुनींनीं कांबळ पांघरली असतां 'ओढीके मैली कीनी चदरिया।' असेंच दिसून आलें आहे. सर्वसाधारणपणें पुरुषार्थाच्या मागोमाग अहंकाराची मलिनता येतेच. म्हणून निवृत्तीचें अभ्यंग स्नान करावें लागतें आणि मगच पूजा-भक्तीचा आनंद घेतां येतो.

पण आतां दिवस मावळला. काम संपलें. ज्याची वाट जन्मभर पाहिली त्याची येण्याची वेळ जवळ आली. हृदयामध्यें प्राणामध्यें आतां आशेचा अंकुर अुगवला आहे. आतां श्रमाचें वस्त्र सोडून देअून चांगलें अभ्यंग–स्नान करून अुपासनेचें प्रेमवसन परिधान केलें पाहिजे आणि संध्यावनांत अुमललेलीं चांगलीं चांगलीं फुलें गोळा करून त्याचेसाठीं अेक हार तयार केला पाहिजे.

पण आतां वेळच कितीसा अुरला आहे ?"

# ७

आनंदयज्ञांत कामगिरी मिळाली आणि ती चोख बजावली तर शेवटीं कृपाप्रसाद म्हणून यजमानाचें दर्शन घडलें पाहिजे. आणि अेक शब्दहि न अुच्चारतां यजमानाला पूर्ण भक्तीनें मुजरा करण्याचें सद्‌भाग्य लाभलें पाहिजे. जर अखंड सेवा करून देखील बाहेरच्या बाहेरच रहावें लागलें, यजमानाचें दर्शन घडलें नाहीं आणि त्याची कृपादृष्टि आपल्यावर पडली नाहीं तर सेवा केल्याचें सार्थक काय ?

जे लोक मृत्यूला भितात ते मृत्यूचें स्वरूपच ओळखत नाहींत. नाहींतर सेवक कधींतरी स्वामीच्या दर्शनाला जातांना आणि मुजरा करण्याची संधि सांपडली असतांना अस्वस्थ होईल काय ?

त्या विश्वस्वामीनें या जगांत आनंदयज्ञ आरंभला आहे. मी किती धन्य कीं मलादेखील त्यांत भाग घेण्यास आमंत्रण मिळालें. माझें मानवी जीवन कृतार्थ झालें. कारण मला त्यांत कामगिरी मिळाली. या यज्ञांत जेवढें म्हणून रूपवैभव आहे तें सर्व मला पहावयास मिळालें, माझे डोळे तृप्त झाले, तसेंच या जगांत जेवढे म्हणून कांहीं सुन्दर स्वर आहेत ते सर्व माझ्या कानांत मी घेअू शकलों आहें, विश्वसंगीतांत मी मग्न होअून गेलों आहें. आतां पाहण्या-अैकण्यासारखें कांहींच अुरलें नाहीं.

मला आज्ञा झाली कीं, वाजव तुझी बांसरी ! मला याहून अधिक काय हवें होतें ? मीं प्राणाचें हास्य आणि रुदन दोन्हीं माझ्या गायनांत अेकत्र गुंफून दिलीं. अेवढेंच नव्हे तर मीं माझ्या गायनाशीं अेकरूप झालों.

आतां मात्र विचारावेंसें वाटतें कीं, " माझी वर्दी पुरी झाली नाहीं का ? " आतां गायन संपवून मीं आंत यावें आणि डोळे भरून तुला पहावें. आणि तुझें दर्शन घेत घेत तुझा होणारा जयजयकार अैकावा. बस, दुसरी कसलीच आशा उरली नाहीं.

जगते आनंदयज्ञे आमार निमंत्रण।
धन्य हल धन्य हल मानवजीवन।
नयन आमार रूपेर पुरे
साध मिटाये बेड़ाय घुरे,
श्रवण आमार गभीर सुरे
हयेछे मगन।

तोमार यज्ञे दियेछ भार,
बाजाअि आमि बाँशि।
गाने गाने गेंथे बेड़ाअि
प्राणेर कान्नाहासि।
अेखन समय हयेछे कि।
सभाय गिये तोमाय देखि'
जयध्वनि शुनिये जाब,
अे मोर निवेदन।

" जगताच्या आनंद-यज्ञामध्यें मला निमंत्रण मिळालें. धन्य झालें, धन्य झालें माझें हें मानव-जीवन !

या आनंदयज्ञांत जें जें कांहीं रूपलावण्य आहे तें मी टक लावून पहात हिंडलों आणि माझे कान या आनंदयज्ञांतील सर्व गभीर सूर—सर्व खोल सूर अैकून त्यांत मग्न झाले आहेत.

तुझ्या या यज्ञांत मीं बंसरी वाजवावी अशी कामगिरी तूं मला दिली आहेस म्हणून मीहि प्राणाचें रुदन आणि हास्य प्रत्येक गानामध्यें गुंफत गात गात हिंडत आहें.

प्रभो, आतां वेळ नाहीं का झाली कीं, माझें गायन आटपून तुझे दरबारांत प्रवेश करून मीं तुझें दर्शन करावें ? तुझा जयध्वनि ऐकत ऐकत मीं स्वतःचें सर्वस्व तुझ्या चरणीं अर्पण करावें ? ”

# ८

जो बसून रहातो त्याचें भाग्य बसतें, जो चालतो त्याचें भाग्य चालतें असें वेदकाळींच प्रत्यक्ष अिन्द्रानें सांगून ठेविलें आहे.[1] मनुष्यानें अेकाच ठिकाणीं बसून रहावें अशी जर विधात्याची अिच्छा असती तर त्यानें मनुष्याला वृक्ष-वनस्पतीं-प्रमाणें स्थावरच केलें असतें. मनुष्य जंगम आहे. त्याचें जगहि ( जगत् = जें चालतें तें ) गमनशील आहे. मनुष्याच्या वाट्याला स्थिरता तेव्हांच येते जेव्हां त्याची वाट संपते आणि चिरनिद्रा त्याला घेरून टाकते. पण तेथेंहि त्याचा गमनशील स्वभाव आपला जोर करतोच. थकलेलें शरीर ( शव ) मागें टाकून देअून जीवरूपानें तो पुढेंच धांवतो. प्रेत शब्दाचा खरा अर्थ हाच आहे.[२]

भरती असो वा ओहोट असो मनुष्याची यात्रा चालूच असणार. जोरांत असो किंवा रेंगाळत असो मनुष्य चालतच असतो. पण जेव्हां त्याच्या जीवनसागराला आनंदाचें

---

१. आस्ते भग आसीनस्य ऊर्ध्वं तिष्ठति तिष्ठतः ।
शेते निपद्यमानस्य चराति चरतो भगः ॥

२. शव आणि प्रेतमधील फरक : शव = जें पडून (निजून) रहातें तें.
प्रेत = जें पुढें जातें तें.

भरतें येतें तेव्हां त्याला कोण रोकूं शकणार? आनंदसागरांत मोठी भरती आली आहे. लाटा म्हणतात चला, वारा म्हणतो चला, हृदय म्हणतें चला, पाय म्हणतात आमच्यानें आतां थांबवत नाहीं. अशा वेळीं खलाशी किनाऱ्यावर सांपडावयाचा नाहीं. जातिवंत खलाशी जितके म्हणून असतील ते सर्व पटापट होड्यांमध्यें उड्या मारून, शिडें चढवून आणि हातांत वल्हीं घेऊन गाऊं लागावयाचेच.

समुद्रयात्रेचें एक व्याकरण असतें. लाटा उठतात आणि पडतात. जर तुमची होडी लाटांशीं समांतर आडवी राहिली तर ती उलटलीच म्हणून समजा. लाट लहान असो वा मोठी असो, फुगत असो वा फुटत असो हाडाचा खलाशी होडीला लाटेसमोर धरतो आणि तीराप्रमाणें तिला चिरून तिच्या पुढें जातो. नाक वर करून लाटेशीं टक्कर देण्यांतच होडीला आनंद वाटतो; पण जर कां ती लाट होडीच्या बरगडींत बसली तर होडीची धडगत नसते.

समुद्रयात्रेचा दुसरा नियम असा कीं, जर होडींत पुरेसा माल असला तर तुम्हीं सुरक्षित आहांत. जर माल बुडेल या भयानें होडी भरली नाहीं तर तुफानामध्यें होडीच उरावयाची नाहीं. यासाठीं हिंमतपूर्वक मुबलक माल भरून यात्रेला चला.

हमेशा जमिनीवरच राहणारे लोक–पाण्यांत पाय न ठेवणारे लोक–गयावया करून सांगतात. जीव संकटांत घालूं नका म्हणून सल्ला देतात. किनाऱ्यावर सर्व सुख आहे, कशाला जातां त्या समुद्राच्या तोंडांत? असें म्हणून मागें खेंचतात. खलाश्याला हा युक्तिवाद कसा पटावा? तो चिडून म्हणतो, मीं असा काय गुन्हा केला आहे कीं मीं किनाऱ्यावरच रहावें? असा कोणता शाप आहे कीं जो माझें समुद्रावरील स्वच्छंदजीवन बुडवून मला जमिनीवरच डांबून ठेवील? कोणच्या ग्रहानें मला बाधा केली आहे कीं मीं समुद्रापासून विमुख व्हावें? नको म्हणणारे नको म्हणोत, रडणारे रडोत, अपशकुन करणारे शिंकत राहोत. मी तर हा पाहा चाललों. धरारे दोरी, चढवा सगळीं शिडें वर, पकडा सुकाणू आणि चालवा वल्हीं. आनंद सागराला भरती आली आहे. या जड भूमीवर कोण उभा रहातो! ठाऊक आहेत आम्हांला तुमचीं भयें. दिसायलाच काय तीं भयाण. तुफान वारा सुटला म्हणजे केवळ झाडेंच कोलमडून पडतात असें नाहीं; पामर भयेंहि सागर–वीरापुढें पळून जातात किंवा विरून जातात. तुफानाशीं ज्यानें मैत्री केली त्याला तुम्हीं कोण रोकणारे? तो चालला; हिंमत असेल तर त्याच्या बरोबर या, मागोमाग याल तर पस्तावाल. खांद्याला खांदा लावून, संकटाचा साथी होऊन यावयाचें असेल तर तुम्हांला

आमंत्रण आहे. आनंद सागराला भरती आली आहे आणि आमच्या सर्व होड्या आज यात्रेला निघाल्या आहेत.

आनन्देरअि सागर थेके
असेछे आज बान[1] ।
दाँड ध'रे आज बोस् रे सबाअि,
टान्[2] रे सबाअि टान् ।
बोझा जत बोझाअि करि
करब रे पार दुखेर तरी,
[3]ढेउयेर 'परे धरब पाड़ि
जाय जदि जाक प्राण ।
आनन्देरअि सागर थेके
असेछे आज बान ।

के डाके[4] रे पिछन हते
के करे रे माना,
भयेर कथा के बले आज
भय आछे सब जाना ।
कोन् शापे कोन् ग्रहेर दोषे
सुखेर डांगाय[5] थाकब बसे,
पालेर[6] रशि धरब कषि
चलब गेये गान ।
आनन्देरअि सागर थेके
असेछे आज बान ।

---

१. बान–भरती. २. टान्–खेंचा. ३. ढेउयेर–लाटांच्या. ४. डाके–बोलावतो. ५. डांगाय–किनाऱ्यावर. ६. पालेर–शिडाची.

आनंदाच्या सागरांतून आज भरती उसळली आहे. वल्ह्यांच्या दांड्या धरून सर्वजण आपआपल्या ठिकाणीं मजबूत बसा आणि पूर्ण दमानें वल्हीं खेचूं लागा.

जेवढा म्हणून माल होडींत भरतां येईल तेवढा लादून ही दुःखाची होडी आपण पार घेऊन जाऊं या. प्राण जायचे असले तर भले जावोत पण समोरून येणाऱ्या भरतीशीं होडीचें नाक भिडवून आपण चालूं या. आज आनंद सागराला भरती आली आहे.

कोणरे हा मागून हांक मारतो आहे; कोण परत बोलावीत आहे. कोणरे आम्हांला मना करतो ! ! आज या उत्सव प्रसंगी भयाची बात कोण करीत आहे. माहीत आहेत आम्हांला तुमचीं सर्व भयें. आमच्या पुढें त्यांचा गमजा कशाला ? असा कोणचा शाप आमचेवर येवून पडला आहे, कोणच्या ग्रहाचीं आम्हांला बाधा झाली आहे कीं, आम्हीं सुखाच्या किनाऱ्यावर बसून रहावें. धरारे शिडाच्या दोऱ्या कसून, आणि चला गात गात गाणीं. आज आनंदाच्या सागरामध्यें अक्षय तृतीयेची भरती उठली आहे. आतां थांबणें शक्य नाहीं.

टीप :

कोन शापे कोन ग्रहेर दोषे
सुखेर डांगाय थाकब बसे,

एकदां आम्ही समुद्रस्नानाला गेलों होतों. आमच्यापैकीं ज्यांना पोहतां येत होतें, लाटांशीं कशी दोस्ती करावी याची खुबी ज्यांना माहीत होती ते आम्ही सर्व झपाट्यानें आंत शिरलों. जेथें लाटा फुटत होत्या तो सर्व प्रदेश सोडून जेथून त्या उठत होत्या त्या प्रदेशांत आम्ही गेलों आणि मग घोड्यावर बसण्याच्या आनंदाचा अनुभव करूं लागलों. लाटेबरोबर वर जावें, लाटेबरोबर खालीं यावें, हातपाय पसरून तरंगत रहावें, पुढें जावें आणि मागें यावें, असे अनेक प्रकार आम्ही केले आणि छातीभर, आंगभर आनंद मिळविला.

आमच्यापैकीं एक थोडासा भित्रट होता. त्याला पोहायलाहि बेताचेंच येत होतें. त्यानें आपलें गुडघाभर पाण्यांतच आंघोळ करावयाचें ठरविलें.

समुद्रस्नानाचा ज्यांना अनुभव आहे त्यांना ठाऊक आहे कीं या गुडघाभर पाण्यांतच सर्व प्रकारचा चिखल आणि कचरा असतो आणि तेथें एकहि लाट उठत नसल्यामुळें आणि सर्वच लाटा फुटत असल्यामुळें वारंवार मार खाऊन लालबुंद व्हावें लागतें. पण आनंदरसाचा एक थेंबहि तेथें मिळत नाहीं.

'सुरक्षित' स्नान असें असतें. चिखलांत न्हावें लागतें, मार खावा लागतो, डोळ्यांत पाण्याचा फेंस जाऊन डोळे भगभगतात, वारंवार पाडले जाऊन कानांत रेती जाते आणि आनंद तर कसलाच नाहीं.

जगांत ज्यांना जीवनाची सुरक्षितता हवी असते, त्यांच्या वांट्यालाहि हाच प्रकार असतो. जीवनाचा जो खरा खलाशी आहे त्याला जर किनाऱ्यावर बसावयास सांगितलें तर तो म्हणेल, 'मी असा कोणचा गुन्हा केला आहे? शनीची अशी कोणती साडेसाती माझ्या मागें लागली आहे कीं मीं किनाऱ्यावर पडून रहावें. समुद्र हांक मारीत आहे, लाटा आमंत्रण देत आहेत, वारा शिडें भरून भरून वहात आहे अशावेळीं मीं या किनाऱ्यावरच रहावें म्हणतां? यापेक्षां जीवनाचा पैल किनारा गांठलेला बरा. या किनाऱ्यावर कांटे, खडे आणि शिंपा च आहेत. रत्नें आणि मोती त्या किनाऱ्यावर असतात, ऐवढेंहि मला ठाऊक नाहीं असें समजतां काय? मी खलाशी आहें खलाशी. किनाऱ्यावरचा खेंकडा नव्हे. मला कसलें भय घालतां आणि कसल्या सुरक्षिततेची लालूच दाखवितां? मला सोडा. माझी नाव आणि मी यावेळीं महासागराच्या मध्यावर पोंचावयास पाहिजे होतों. किनारा म्हणजे जीवनाचें वाळवंट होय, तेथें मला क्षणभरहि रहावयाचें नाहीं.'

'किनाऱ्यावर 'सुख' आहे आणि सुरक्षितता आहे हें खरें, पण याखेरीज तेथें दुसरें कांहींच नसतें. मुख्य म्हणजे 'जीवन' तेंच तेथें नसते. सुकलेलें जीवन कितीहि सुखी असलें तरी मला त्याची पर्वा नाहीं. आपणहोऊन संकट ओढवून घेण्यांत जी लज्जत आहे, जीवनसमृद्धि आहे ती या किनाऱ्यावरील सलामतीमध्यें नाहीं. हाच या किनाऱ्याचा सर्वांत मोठा दोष आहे. मला कोणी विचारलें कीं किनाऱ्याला कां कंटाळतोस तर मी म्हणेन कीं, जीवनाला थरारून सोडणारें येथें कसलेंच संकट नाहीं. म्हणून मग येथें उभें रहा कशाला?'

# १

तुलाहि या जगांत कोणी विचारीत नाहीं आणि मलाहि कोणी जवळ करीत नाहीं; तर मग आपण अेकमेकांचे कां न व्हावें ? अशी वृत्ति किंवा प्रसंग मनाला पटणें कठीण आहे काय ? परमात्मा सर्वकल्याणकारी असून देखील तो कोणालाहि नकोसा असतो. लोक त्याच्या नांवाचा घोष करतील, त्याचा जयजयकार करतील, त्याच्या साठीं मंदिरें बांधतील, त्याला नैवेद्य दाखवून स्वत: प्रसादाचें भक्षण करतील. पण जर का तो स्वत:च हाजर झाला तर मात्र ही ब्याद आम्हांला नको असेंच त्यांना वाटावयाचें. आज जगामध्यें सर्वांची काळजी तो वहात असून देखील तो आहे किंवा नाहीं याचीच सनातन चर्चा माणसांमध्यें चालू आहे आणि तो मात्र अगदीं अेकाकी मनुष्याच्या रस्त्यावरून अंधारांत बंद दारांना मधून मधून ठोठावीत चालत असतो.

फक्त एक भक्तच अशा दुर्दिनाचे वेळीं देखील त्याच्या मीलनाची आशा बाळगून हृदयरूपी घराचे दरवाजे उघडे ठेअून त्याला पाचारीत आहे कीं, तुझ्यावांचून मला कोणी नाहीं, कोणी नकोहि आहे. मला फक्त तूंच हवा आहेस. आणि तुला बोलवणारेंहि माझ्याहून दुसरें कोणीच नाहीं. तेव्हां माझ्या हृदयमंदिरांत कां येत नाहींस ? सर्वच घरें आपल्याला बंद आहेत तसें हेंहि घर बंद असेल अशा समजुतीनें स्वप्नासारखा निघून जाऊं नकोस. मी

सबंध रात्र तुझीच वाट पहात ही दुष्ट निशा कंठिली आहे. आतां पहांट झाली खरी पण प्रकाश झाला नाहीं. श्रावणाचाच महिना आहे! कृष्ण मेघांनीं रात्रीचें साम्राज्य उषः-कालाच्या प्रदेशावर देखील पसरविलें आहे, आणि वाढती रात्र अधिकच मोठी केली आहे. अशावेळीं सबंध रात्रीची निराशा ध्यानांत आणून माझ्या दारावरून देखील जर तूं पुढें गेलास तर माझें अखंड जागरण व्यर्थ जाईल. म्हणून हे प्रियतमा एकसख्या, माझ्या दाराकडे पहा. तें तुझ्या स्वागतासाठीं सताड उघडें आहे. माझी आकांक्षा आणि तुझ्या अखंड यात्रा निष्फळ होऊं देऊं नकोस.

आजि श्रावण-घन-गहन-मोहे
गोपन तब चरण फेले
निशार मतो नीरब ओहे
सबार दिठि अेड़ाये अेले।
प्रभात आजि [1]मुदेछे आँखि,
बातास वृथा जेतेछे डाकि,
निलाज नील आकाश ढाकि
निबिड़ मेघ के दिल मेले।

कूजनहीन काननभूमि,
दुयार देवा सकल घरे,
अेकेला कोन् पथिक तुमि
पथिकहीन पथेर 'परे।
हे अेका सखा, हे प्रियतम,
रयेछे खोला अे घर मम,
समुख दिये स्वपनसम
जेयो ना मोरे [2]हेलाय ठेले।

---

१. मुदेछे–मिटले आहेत. २. हेलाय ठेले–अवहेलना करून.

" आज श्रावणाच्या निबिड अंधःकारांत सर्वांची नजर चोरून चोरटीं पावलें टाकीत रात्रीप्रमाणें अगदीं निस्तब्ध, असा तूं कुठें चालला आहेस ? सगळी रात्र संपली, पहांट झाली, तरी पूर्व दिशेनें आपले डोळे अजूनहि मिटूनच ठेविले आहेत. पूर्वदिशेचा वारा हांका मारून कंटाळून चालता झाला आणि स्वच्छ निळें आकाश निबिड मेघांनीं झांकून गेलें आहे. काननभूमीमध्यें पक्ष्यांचीं गीतें अेकूं येत नाहींत, त्यांचें कलकूजन बंद झालें आहे. सगळ्या घरींचे दरवाजे लावले गेले आहेत. ज्या रस्त्यावर चिट्पाखरूं देखील फिरकत नाहीं तेथें तूं कोण अेकटाच मार्ग कापीत चालला आहेस ?

हे अेकसख्या, हे प्रियतमा, हें पहा माझें घर सताड उघडें आहे. मी तुझीच वाट पहात आहें. अिकडे दुर्लक्ष करून माझ्या समोरून अेखाद्या स्वप्ना-प्रमाणें निघून जाऊं नकोस, माझी अवहेलना करूं नकोस. येथें तुझें सर्वप्रकारें स्वागत आहे आणि मला दुसरें कोणीच नाहीं, मी तुझीच वाट पहात आहें, तूंच काय तो माझा अेकमात्र सखा आहेस आणि प्राणाहून प्रिय आहेस "

# १०

पाश्चात्य लोकांत कल्पना आहे कीं, हंसाला जेव्हां मरावयाचें असतें तेव्हां तो कांठ सोडून सरोवरांत आंत आंत आंत पोहत जातो आणि असें कांहीं सुन्दर गातो कीं त्या गाण्याच्या अंतिम आलापाबरोबर त्याचे प्राणहि बाहेर निघून अनंतांत मिळून जातात. त्याचें मरण त्याला किंवा जगाला दुःखदायक होत नसून मरण म्हणजे कधींहि न ऐकलेलें आणि न अनुभवलेलें दिव्य गायन होऊन जातें. त्याचें हें जीवन जर अितकें निर्मळ आणि प्रसन्न तर त्याचें मरण त्याहून कितीतरी अुदात्त, दिव्य, भव्य आणि आनंदस्वरूप असलें पाहिजे. कवि म्हणतो मी देखील आतां जगून जगून–जीवनलीला नाचून नाचून थकलों आहें. आतां या सर्व सेवेचें फळ मला मिळालें पाहिजे. जें मिळवण्यासाठीं जन्मभर नाचलों तें मिळालें म्हणजे चिरशान्ति मला मिळेलच. पोरपणीं नाचावयाचा आनंद असतो, अुतारवयामध्यें निरीक्षणाचा आणि शेवटीं चिंतनमय चिरशान्तीचा असतो. नामरूपाच्या जगांत जन्मभर यथेच्छ वावरल्यानंतर नामरूपाचा जेथें स्पर्शहि नाहीं अशा स्थानीं पोंचलेंच पाहिजे. हेंच तर निर्वाण, हाच मोक्ष, हीच कैवल्यस्थिति. सर्व परिश्रमाचें हें अंतिम फळ आहे. याच्या पुढें कांहींच अुरत नाहीं.

रूपसागरे डुब दियेछि
अरूप रतन आशा करि;
घाटे घाटे घुरब ना आर
भासिये आमार जीर्ण तरी।
समय जेन हय रे अेबार
ढेअु-खावा सब चुकिये देबार,
सुधाय अेबार तलिये गिये
अमर हये रब मरि।

जे गान काने जाय ना शोना
से गान जेथाय नित्य बाजे,
प्राणेर वीणा निये जाब
सेअि अतलेर सभा-माझे।
चिरदिनेर सुरटि बेंधे
शेष गाने तार कान्ना केंदे
नीरव जिनि ताँहार पाये
नीरव वीणा दिव धरि।

" रूपरहित अपरूप रत्न मिळावें म्हणून रूपसागरांत मी डुबक्या मारीत आलों आहें. आतां माझी ही जराजर्जरित नौका घेअून घाटा घाटाची सफर करणें नको. लाटा खाण्याचा आनंद सोडून देण्याचें दिवस आतां दिसतात. आतां सुधासागरांत तळाला जाअून मरून अमर होण्याची अिच्छा आहे.

जें गायन कानानें अैकिलें जात नाहीं, तें जेथें नित्य वाजत असतें तेथें माझी प्राण-वीणा घेअून मी जाअीन. जन्मभर ती वीणा मी लावत बसलों होतों. आतां तिच्यावर आपलें अंतिम क्रन्दन गाअून घेतलें म्हणजे मग ही नीरव वीणा त्याच्या पायीं वाहून ( ठेअून ) मीहि निस्तब्ध होअून जाअीन. "

# ११

वेदांमध्यें आकाश आणि पृथ्वी यांना आओीबाप म्हटलें आहे. आकाश पिता आणि पृथ्वी माता आणि आपण सर्व त्यांचीं बालकें. किती भव्य कल्पना!! विश्वबंधुत्व सिद्ध करायला किती निःशंक पुरावा. आकाश सर्वांच्या डोक्यावर पसरलेलें आहे. प्रत्येकाच्या आंत आणि बाहेर आकाशच भरलेलें आहे. हें आकाश अंधःकार आणि प्रकाश, वारा आणि पाऊस सर्वांना आश्रय देतें आणि या रीतीनें आपल्याला जिवंत ठेवतें.

पृथ्वी आकाशानें दिलेल्या प्रकाशाचा, वाऱ्याचा आणि पावसाचा संग्रह करते आणि असंख्य प्रकारच्या वनस्पति-औषधींना जन्म देऊन सर्वांचें पालनपोषण करते. पृथ्वी, पाणी, वारा, प्रकाश, आकाश हे सर्व त्या परमपित्याचे आशीर्वादच होत. ज्याप्रमाणें आओी किंवा दाओी बालकाला कधींच विसंबत नाहीं, नेहमीं त्याचे भोंवतीं घिरट्या घालून त्याला संभाळीत असते, त्याचप्रमाणें आकाश आणि पृथ्वी आपल्या सर्व बालकांना व्यक्तिशः प्रत्येकाला घेरून त्यांचा संभाळ राखतात. बालकांना काय कल्पना असते कीं, आओीबाप आपली किती काळजी वहातात. पुढें जेव्हां बालकांना बुद्धि येते आणि त्यांना दिसून येते कीं, अखंड सेवा, आणि अखंड काळजी वाहूनच आओीबापांनीं आपल्याला लहानाचें मोठें केलें आहे, तेव्हां मुलें स्वाभाविकपणेंच भक्तिनम्र होतात आणि पुढें आओीबापांच्या मार्फत ओीश्वराला ओळखूं शकतात. मग त्यांना वाटतें कीं, ओीश्वराचा

आशीर्वाद देखील आपण आईबापांचे मार्फतच मिळवावा. सर्व कांहीं त्यांनींच मिळवून दिलें आहे. ईश्वराचा आशीर्वाददेखील त्यांचे हातूनच मिळालेला बरा.

आकाशातले उठल फुटे
[1]आलोर शतदल।
[2]पापड़िगुलि थरे थरे
छड़ालो दिक्-दिगन्तरे,
ढेके गेल अन्धकारेर
निबिड़ कालो जल।
माझखानेते सोनार कोषे
आनन्दे भाअि, आछि बसे —
आमाय घिरे छड़ाय धीरे
आलोर शतदल।

आकाशेते [3]ढेउ दिये रे
बातास बहे जाय।
चार दिके गान बेजे ओठे,
चार दिके प्राण नाचे छोटे,
गगनभरा परशखानि
लागे सकल गाय।
डुब दिये अेअि प्राणसागरे
नितेछि प्राण बक्ष भरे,
फिरे फिरे आमाय घिरे
[4]बातास बहे जाय।

---

१. आलोर – प्रकाशाचें. २. पापडिगुलि – पाकळ्या. ३. ढेउ – लहरी, लाटा.
४. बातास – वारा

दश दिकेते आँचल पेते
[5]कोल दियेछे माटि।
रयेछे जीव जे जेखाने
सकलके से डेके आने,
सबार हाते सबार पाते
अन्न से देय बाँटि।
भरेछे मन गीते गन्धे,
बसे आछि महानन्दे,
आमाय घिरे आँचल पेते
कोल दियेछे माटि।

आलो, तोमाय नमि, आमार
[6]मिलाक अपराध।
ललाटेते राखो आमार
पितार आशीर्वाद।
बातास, तोमाय नमि, आमार
[7]घुचुक अवसाद।
सकल देहे बुलाये दाओ
पितार आशीर्वाद।
माटि, तोमाय नमि, आमार
मिटुक सर्व साध।
गृह भरे फलिये तोलो
पितार आशीर्वाद।

---

५. कोल – मांडी. ६. मिलाक – नाहींसे होवोत. ७. घुचुक – नष्ट होवो.

“आकाशाच्या छताखालीं प्रकाशाचें शतदल पद्म अुघडलें आहे. पाकळ्यांचे थरावर थर अुघडून त्या दिग्‌दिगन्तराला पसरलेल्या आहेत. अेकाच पद्मानें सबंध सरोवर झांकून टाकावें त्याप्रमाणें या शतदल पद्मानें निबिड अंधःकाराचें कृष्णजळ झांकून टाकलें आहे. आणि या विशाल कमळाच्या मध्यभागींच्या सुवर्ण कोषामध्यें कमलासन ब्रह्माप्रमाणें मी आनंदानें बसलों आहें आणि माझ्या आसपास हें प्रकाशाचें शतदल फुलून राहिलें आहे.

आणि हा पहा वारा कसा वाहूं लागला आहे. वारा कसला! आकाशाला जणुं लाटाच येअून राहिल्या आहेत. चारी बाजूनें गायनाचे आलाप छेडले जात आहेत. आणि चारी बाजूला प्राण नृत्य करीत आहे. सर्व आकाश भरून वारा नाचत असल्यानें आकाशच जणुं स्पर्शरूप होअून माझ्या सर्व गात्रांना कवटाळीत आहे. खरोखर वारा म्हणजे आकाशाचा प्रेमळ स्पर्शच नव्हे काय? या प्राण-सागरांत मी आतां डुंबूं लागलों आहें. आणि यांतून छाती भरून प्राण (वायू) घेत आहें. पहा हा वारा कसा माझ्याभोंवती घोटाळत वाहूं लागला आहे.

आणि ही पृथ्वीमाता दाही दिशांना स्वतःचा पदर पसरून मला मांडीवर घेत आहे. प्रत्येक जीव कोठेंहि असो तेथून ती त्याला बोलावून घेते आणि सर्वांचे हातीं, सर्वांचे पात्रीं पोटभर अन्न वाटून देते. या पृथ्वीच्या राज्यांत माझें मन गीतानें आणि सुगंधानें भरून जात आहे, आणि मी माझ्या या आसनावर महानंदानें बसलों आहें. पृथ्वीनें माझ्या आसपास आपला अंचल पसरला आहे आणि मला मांडीवर घेतलें आहे.

प्रकाशा, मी तुला नमस्कार करतों. माझे सर्व अपराध तुझ्यामध्यें विलीन होअून अुडून जावोत. तूं माझ्या पित्याचा वरदहस्त माझ्या मस्तकावर ठेव.

हे वाऱ्या, मी तुला नमस्कार करतों. माझी सर्व ग्लानि नष्ट होवो. माझ्या सर्व शरीराला गोंजारून तूं मला परमपित्याच्या आशीर्वादाचा अनुभव करून दे.

हे मृत्तिके, मी तुला नमस्कार करतों. माझ्या सर्व वासना तृप्त होवोत. माझी सर्व भगभग शान्त होवो. तूं माझें सर्व घर भरून माझें जीवन सुफलित कर. माझ्या जीवनरूपी दाण्यांत रस भरून दे आणि अशा रीतीनें पित्याचा आशीर्वाद मिळवून दे.”

# १२

अीश्वराच्या जगामध्यें दोन न्याय चालत असतात. अेक आहे कर्माचा न्याय आणि दुसरा भगवत्कृपेचा.

जोंवर आपण आपल्या व्यक्तित्वाला प्राधान्य देतों, तोंवर आपण कर्माच्या साम्राज्यांत असतों. ' करावें तसें भरावें, पेरावें तसें घ्यावें. ' कधीं कमी व्हावयाचें नाहीं, कधीं अधिक व्हावयाचें नाहीं. ब्रह्मा विष्णु महेश देखील या कर्माच्या कायद्यांतून मुक्त नाहींत.

पण ज्या क्षणीं आपण अीश्वराला शरण गेलों, सर्व कर्तृत्व त्याचेकडे सोंपविलें आणि आपल्या कर्तृत्वाचा किंवा व्यक्तित्वाचा लेशहि अुरूं दिला नाहीं, त्याक्षणीं आपल्यापुरता कर्माचा कायदा गौण होतो आणि भगवत्कृपेची किमिया काम करूं लागते. मग आपलीं सर्व संचितें आपोआप भस्म होतात. पूर्वसंचित पापपुण्य त्याच्या चरणीं वाहिलें गेल्यामुळें आपल्या हिशोबांतून काढून टाकिलें जातें. मग भगवत्कृपा सर्व कांहीं परिस्थिति आपल्या हातांत घेअून स्वतःला योग्य वाटेल त्याप्रमाणें सर्व व्यवस्था करून मोकळी होते.

मग भक्ताला देखील लवकर किंवा अुशिरां असा प्रश्न काढतां येत नाहीं. तरीहि जीवाची तळमळ व्यक्त करण्याची आणि भगवंताला परोपरीनें आळविण्याची त्याला मुभा असतेच. कारण तसें करूनच तो कर्माच्या कचाट्यांतून सुटत असतो.

पूर्वजीवनाविषयीं अुपरति झाल्याविना या शरणागतीचा अुदय होत नसतो म्हणून भक्तांच्या वचनांमध्यें पश्चात्ताप–अुपरति, शरणागति, आणि श्रद्धा हीं सर्व तत्त्वें प्रतिबिंबित झालेलीं असतात.

तुमि अेबार आमाय लहो हे नाथ, लहो।
अेबार तुमि फिरो ना हे—
हृदय केड़े नियें रहो।
जे दिन गेछे तोमा बिना
तारे आर फिरे चाहि ना,
जाक से धुलाते।
एखन तोमार आलोय जीवन मेले
जेन जागि अहरह।
की आवेशे किसेर कथाय
फिरेछि हे जथाय तथाय
पथे प्रान्तरे,
अेबार बुकेर काछे ओ मुख रेखे
तोमार आपन बाणी कहो।
कत कलुष कत फाँकि
अेखनो जे आछे बाकि
मनेर गोपने—
आमाय तार लागि आर फिरायो ना,
तारे आगुन दिये दहो।

"भगवंता, आतां तूं मला अेखाद्या अनाथ जीवाप्रमाणें भटकूं देअूं नकोस. मला माझें आत्मस्वातंत्र्य पुरे झालें. आतां तूं माझ्या हृदयाचा कबजा घे. मला अुचलून घे.

जितके दिवस मी तुला विसरलों ते सर्व व्यर्थ गेले, त्या दिवसांचें आतां मला स्मरण देखील नको. आतां मला तुझी आठवण अखंड रहावी आणि तुझ्या प्रकाशांत मीं जाग्रत असावें हेंच मला हवें आहे. माझें मलाच आश्चर्य वाटतें कीं कुणाच्या सांगण्यानें आणि कसल्या आवेशानें मी जगभर भटकलों आणि रस्त्यानें तसेंच आडरस्त्यानें फिरत राहिलों. आतां तें सर्व मीं सोडून दिलें आहे. तुला शरण आलों आहें. मला पोटाशीं धर. माझें डोकें मला तुझ्या छातीवर टेकवूं दे आणि मग तूं स्वतःचा आदेश मला सांग.

मला ठाऊक आहे कीं तुझ्या कृपेचा अधिकारी मी नाहीं. माझ्या पोटांत कितीतरी पाप, कितीतरी दंभ लपून राहिला आहे. माझ्या त्या सर्व दोषांकडे पाहून मला दूर लोटूं नको. तुला काय कठीण आहे? माझे सर्व दोष पाहून घेऊन त्यांना काडी लावून दे. माझी योग्यता पाहून मजवर कृपा करण्यापेक्षां माझ्या-वर कृपा करण्यासाठीं माझे दोष जाळून मला योग्यच कां करीनास? आजवर दूर राहिलों तो राहिलों. आतां मात्र कृपावंता, मला दूर करूं नकोस. मला उचलून घे, मला आपलासा कर आणि माझें हृदयच तुझ्या ताब्यांत घेऊन टाक."

# १३

जुन्या काळीं प्रत्येक राजा उत्कृष्ट सेनापति असल्या-मुळेंच त्याला राजपद मिळत असे अथवा टिकत असे.

राजा सर्वोत्कृष्ट न्यायाधीश पण असे. म्हणूनच हाताखालच्या अमलदारांच्या हातून जर शुद्ध न्याय न मिळाला तर लोक सरते शेवटीं राजाकडे धाव घेत असत; अपील करीत असत. आजदेखील करतात.

त्याचप्रमाणें जर अेखाद्या सेनापतीला अेखाद्या मोहिमेवर पाठविलें आणि शौर्य, चातुर्य, अथवा युद्धकौशल्य कमी पडल्यामुळें सेनापति हरूं लागला तर राजा ताबडतोब त्या ठिकाणीं जाऊन पोहोंचे आणि सेनेचा अधिकार आपल्या ताब्यांत घेऊन, सेनेला निकरानें लढवून, विजय मिळवीत असे. राजानें स्वतः सेनापतिपद आपलेकडे घेतलें म्हणजे समजावें कीं, आतां सर्व राजशक्ति अेकवटून काम होणार आहे. पुष्कळ वेळां, राजानें मोहिमेचा भार आपल्या शिरावर घेतला आहे अशी बातमी लागतांच शत्रू घाबरून जात असत आणि आतां आपला टिकाव लागणार नाहीं अशी खात्री होअून शरण येत.

प्रत्येक जीव म्हणजे अेका लहानशा राज्यावर नेमला गेलेला परमात्म्याचा प्रतिनिधिच होय. परमात्म्याच्या वतीनें देहरूपी किंवा व्यक्तित्वरूपी अेका लहानशा पण अत्यंत

महत्त्वाच्या प्रदेशावर जीवात्म्यानें राज्य करावयाचें असतें. तेथें जर दुर्बळतेमुळें, गफलतीमुळें, निष्ठेमध्यें फरक पडल्यामुळें, किंवा कोणत्याहि कारणामुळें जर या प्रतिनिधीचें राज्य क्षीण ठरलें तर तो तावडतोब सम्राटाला त्याची बातमी देऊन मदत मागणारच. राजाचें राज्य शिथिल होतां कामा नये.

भक्त हृदयस्वामीला अुद्देशून म्हणतो —

जीवन जखन शुकाये जाय
करुणाधाराय असो।
सकल माधुरी लुकाये जाय,
गीत-सुधारसे असो।
कर्म जखन प्रबल-आकार
गरजि अुठिया ढाके चारि धार
हृदयप्रान्ते हे नीरव नाथ,
शान्तचरणे असो।

आपनारे जबे करिया कृपण
कोणे पड़े थाके दीनहीन मन
दुयार खुलिया हे अुदार नाथ,
राजसमारोहे असो।
वासना जखन विपुल धुलाय
अंध करिया अबोधे भुलाय
ओहे पवित्र, ओहे अनिद्र,
रुद्र आलोके असो।

“जेव्हां माझ्या जीवनांत कोरड पडेल, मन-वचन-वाणी नीरस होओील आणि जिवाची काहिली चालू असेल तेव्हां हे भगवान, अुन्हाळ्याच्या शेवटीं पावसाची झडी लागावी त्याप्रमाणें करुणाधारेच्या रूपानें येअून माझ्या हृदयांत वास कर आणि सर्वत्र गारेगार करून माझें हृदय तुझ्या कृपेनें ओलेचिंब करून टाक.

आणि जेव्हां माझ्या हृदयांतील माधुरी नष्ट होअून मी अगदीं कोरडा ठणठणीत होअीन, प्रेम न अुरल्यामुळें हृदय शुष्क, कठोर आणि सहानुभूतिशून्य होअील तेव्हां हे रसेश्वर, गायनरूपी सुधारस बनून तूं ये आणि त्या सुधारसांत माझें हृदय अगदीं मुरवून टाक.

आणि जेव्हां मोठ्या पराक्रमानें कर्में करीत असतां कर्मांचें स्तोम माजतें आणि कर्मांच्या भाराखालीं जीवनच दबलें जातें आणि हृदयांतील भक्ति नष्ट होअून रजोगुणाची यातायातच जेव्हां सबंध जीवनाला व्यापून टाकते, तेव्हां हे शान्तिनाथ, अगदीं पायाची चाहूल देखील न लागूं देतां आणि अेक शब्दहि न अुच्चारतां माझ्या हृदयांत येअून आपलें आसन ग्रहण कर. म्हणजे कर्मांची ही वावटळ आपोआप शान्त पडेल आणि जीवनाकाश प्रसन्न – निर्मळ होअील.

आणि हे जीवनसम्राट! जेव्हां माझ्या हृदयांत कार्पण्य येअील, मनाची अुदारता नष्ट होअील आणि तुझ्या भक्ताला न साजेल अशी हीनता माझ्या जीवनाला व्यापून टाकील तेव्हां, हे अुदार नाथ, माझ्या हृदयाचीं कपाटें अुघडून आपल्या थोरपणानें त्यांत प्रवेश कर आणि जगाला अनुभव होअूं दे कीं हें भिकाऱ्याचें घर नसून चक्रवर्ती सम्राटाचा हा अेक विहार आहे.

आणि जेव्हां क्षुद्र वासना धुळीचे ढग अुत्पन्न करून सर्वत्र अंधःकार करून सोडील आणि अबोध अंधःकाररूपी काळोखांत मला बुडवून टाकील, तेव्हां हे परम पवित्र, हे अखंड जागरूक, तुझा तेजस्वी प्रकाश घेअून सर्व अंधकाराचा नाश करीत आणि क्षुद्र वासना जाळून भस्म करीत माझ्या हृदयांत प्रवेश कर.

# १४

सर्वपरीनें सुखी असतांना देखील केव्हां केव्हां सुन्दर गोष्टी पाहून किंवा मधुर शब्द अैकून मनुष्याच्या मनाला हुरहुर लागते आणि त्याचें कारण कांहीं केल्या कळत नाहीं. कालिदासानें ठरवून टाकलें आहे कीं, त्याचें कारण मनुष्याला नकळत पूर्वजन्मींच्या प्रेमाची आठवण होत असते, हेंच होय.

रम्याणि वीक्ष्य मधुरांश्च निशम्य शब्दान्
पर्युत्सुकी भवति यत् सुखितोऽपि जन्तुः ।
तत् चेतसा स्मरति नूनं अबोधपूर्वम्
भावस्थिराणि जननान्तर-सौहृदानि ॥ शाकुंतल.

पण जेव्हां असें कांहीं मधुर अैकूं आलेलें नसतें, रमणीयता दृग्गोचर झालेली नसते, आकाशांत अंधकार पसरलेला असतो आणि निखिल विश्व निद्रेमध्यें मग्न असतें, अशावेळीं जेव्हां मनुष्याची हृत्तंत्री– हृदयवीणा अेकाअेकीं वाजूं लागते, झोप अुडून जाते आणि प्राण अेकाअेकीं खळबळून गुणगुणूं लागतो, तेव्हां त्याचें कारण काय म्हणावें? विचित्र वेदना हृदयाला अस्वस्थ करते, नकळत कुणाला तरी आपल्या कंठहाराबरोबर आपलें सर्वस्व

अर्पण करण्याची वृत्ति मनांत काहूर माजविते आणि डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागतात, याचें कारण काय म्हणावें ? कोणी ही अवस्था अुत्पन्न केली ? कोणी झोंप अुडविली आणि हृदयामध्यें ही मधुर वेदना अुत्पन्न करून मजकडून आत्मार्पणाची कोण अपेक्षा करते आहे ? कांहींच समजत नाहीं. पण जीवनामधील शिखर गांठणारी घडी येअून ठेपली आहे असें मात्र राहून राहून वाटूं लागतें.

विश्व जखन निद्रामगन,
गगन अन्धकार,
के देय आमार बीणार तारे
अेमन झंकार।
नयने घुम[1] निल केड़े,
अुठे बसि शयन छेड़े,
[2]मेले आँखि चेये थाकि —
पाअि ने देखा तार।

गुंजरिया गुंजरिया
प्राण अुठिल पुरे,
जानि ने कोन् बिपुल बाणी
बाजे व्याकुल सुरे।
कोन् बेदनाय बुझि ना रे
हृदय भरा अश्रभारे,
परिये दिते चाअि काहारे
आपन कण्ठहार।

विश्व जेव्हां निद्रामग्न होतें आणि आकाशांत केवळ अंधकारच भरला होता, अशावेळीं माझ्या हृदयवीणेची तार अशा रीतीनें कोणी छेडिली आहे आणि

---

१. घुम– झोंप. २. मेले–उघडून.

माझ्या डोळ्यांतील झोंप कोणी पळविली आहे ? मी अंथरूण सोडून अुठून बसावें, आणि डोळे अुघडून पहावें तों तो दिसत नाहीं — कोणीच दिसत नाहीं ! फक्त माझा प्राण खडबडून अुठून गुंजन करूं लागला आहे आणि ही विपुल वाणी, व्याकुळ सुरानें वाजत आहे — गर्जत आहे ती कुणाची हेंहि समजत नाहीं. अश्रुभारानें हृदय भरलेलें आहे पण कोणत्या वेदनेमुळें तें समजत नाहीं आणि मन आपला कंठहार काढून कुणाच्या गळ्यांत घालण्यासाठीं अुत्सुक झालें आहे तेंहि समजत नाहीं. फक्त मनामध्यें चुटपुट आणि हुरहुर मात्र काहूर माजवीत आहेत."

# १५

"तुझा कर चुकविण्यासाठीं मी घर सोडून पळ काढला – परागंदा झालों. पण जेथें तुझें राज्य नाहीं असें स्थानच सांपडत नाहीं. आतां मी स्वतःला कसा वांचविणार ? आतां शरण जाण्यांत आणि सर्वस्व तुझ्या चरणीं सोंपवून देण्यांतच सुरक्षितता आहे," अशा अर्थाचा अेक अभंग तुकोबांनीं लिहिला आहे.

अिंग्लंडमध्यें Thomson नांवाच्या अेका संस्कारी पण भटक्या कवीची The Hound of Heaven नांवाची कविता प्रख्यात आहे. धार्मिक स्तोत्रसंग्रहामध्यें देखील तिला स्थान मिळालें आहे. त्या कवितेंत कवि म्हणतो– "अीश्वराला टाळावें, त्याच्या हातावर तुरी द्यावी या अुद्देशानें मी पळालों, पण त्याची निश्चित पावलें माझा पिच्छा सोडीत नाहींत. पंचमहाभूतांपैकीं प्रत्येक भूताला मी शरण गेलों, पण ज्याचेकडे जावें त्यानें शेवटीं परमेश्वराचीच निष्ठा कायम बाळगून मला दगा द्यावा आणि मला त्याच्या हातीं सोंपवून देण्याची तत्परता दाखवावी. कोठेंहि जा हाच अनुभव येतो. आतां मी करूं तरी काय ? मीं कितीहि आकांत केला तरी त्याचीं पावलें न गडबडतां न थांबतां माझा पाठलाग करीत आहेत आणि अधिकाधिक जवळ येत आहेत. आतां माझा धीर खचला, आत्मविश्वासहि अुडाला, आणि आतां तर माझा प्राणहि माझेशीं बेवफा

होऊन त्याच्याकडे धाऊं पहातो आहे. आतां हें बंड सोडून द्यावें आणि मुकाट्यानें त्याला शरण जावें हाच वांचण्याचा अेकमात्र अुपाय अुरला आहे."

अशा कांहींशा अर्थाचें तें काव्य आहे. भाषा प्रौढ, अुपमा आणि रूपक समर्पक, आणि वर्णनशैली अत्यंत अुत्कट या सर्व गुणांमुळें Hound of Heaven–स्वर्गीचें श्वापद-हें काव्य अिंग्रजी भाषेचा अेक अप्रतिम अलंकार होअून बसलें आहे.

अशाच प्रकारचें हें लहानसें काव्य रवीन्द्रनाथांनीं आपल्याला दिलें आहे.

मेनेछि, हार मेनेछि ।
ठेलते गेछि तोमाय जत
आमाय तत हेनेछि ।
आमार चित्तगगन थेके
तोमाय केअु जे राखबे ढेके
कोनोमतेअि सअिबे ना से
बारेबारेअि जेनेछि ।

अतीत जीवन छायार मतो ।
चलछे पिछे पिछे,
कत मायार बाँशिर सुरे
डाकछे आमाय मिछे ।
मिल छुटेछे ताहार साथे,
धरा दिलेम तोमार हाते,
जा आछे मोर अेअि जीवने
तोमार दूवारे अेनेछि ।

"माझी हार मी कबूल करतों. कबूल करतों. जेवढें म्हणून तुला टाळावयास गेलों तितकें मीं स्वतःचें नुकसानच केलें आहे — तितकें मीं स्वतःलाच हाणलें आहे.

मला पुनः पुनः अनुभव आला आहे कीं माझ्या चित्तगगनांतून तुला झांकून ठेवण्याचा जो म्हणून प्रयत्न केला गेला तो सरते शेवटीं मला असह्यच झाला आहे.

तुला चोरून जें आयुष्य मीं आजवर खर्चलें, तें सर्व अेखाद्या छायेप्रमाणें माझ्या मागें मागें येत आहे. आणि मायावी राग काढून मला आपल्या माया-जालाकडे मिथ्या बोलावीत आहे. मी त्या जीवनाशीं तदाकार होण्याचा पुष्कळ प्रयत्न केला पण सरतेशेवटीं तुझ्याच हातांत सांपडलों. आतां माझ्या; असल्या जीवनांत जें कांहीं होतें नव्हतें, तें सर्व तुझ्या द्वारीं घेऊन आलों आहें. आतां मी आपली हार कबूल करतों, कबूल करतों. "

# १६

साधक जेव्हां प्रारम्भ करतो तेव्हां शास्त्राच्या आणि संतांच्या वचनांवर विश्वास ठेवून अुत्साहपूर्वक पुढें जात असतो. साधनेच्या प्रारम्भीं जो हृदयाचा प्राथमिक विकास होतो तेवढाच त्याला धीर देण्यास पुरेसा असतो.

पण पुढें अशा अेका भूमिकेवर तो येअून पोंचतो कीं त्याला सर्वत्र शून्यच दिसूं लागतें. व्यवहाराच्या दुनियेची गोडी नष्ट झाल्यामुळें येथील पाश तुटून गेलेले असतात. आणि भगवंताकडून स्वीकार झाल्याची कसलींच चिन्हें मिळत नाहींत त्यावेळीं खरोखरच भगवान धोंडा होअून बसलेला असतो. सर्वत्र अंधःकार, निराशा आणि कठोरता भासूं लागते. शास्त्रवचनांचा धीर सुटलेला असतो, अनुभवाचा ओलावा कोठेंच दिसत नाहीं. होतें तें घालवलें, आणि ज्याचे मागें लागलों त्याचा मागमूसहि नाहीं अशी स्थिति होअून जाते.

अशावेळीं आधार फक्त श्रद्धेचा असतो. श्रद्धा सांगते कीं, हेहि दिवस जातील आणि मग अेकदम अेका नव्याच दुनियेमध्यें प्रवेश होअील. हें मौनाचें अंडें फुटलें म्हणजे अेकाअेकीं विशाळ जग दिसूं लागेल, आणि सर्वत्र संगीतच संगीत होअून जाअील.

फुलपांखरांचे किडे झाडांवर जन्म घेतात. झाडांचीं पानें खाअून परिपुष्ट होतात.

मग त्यांना अेकप्रकारची बेशुद्धि येते. स्वतःचें कोंडाळें करून ते किडे पडून रहातात. पुढें आपोआप त्या कोंडाळ्याचेंच अेक प्रकारचें अंडें बनतें. हा कोष कितीतरी वेळ असाच जड स्थितींत पडून रहातो. पुढें वेळ येतांच हें अंडें भंग पावतें आणि त्यांतून परीचे पंखे धारण करणारें फुलपांखरू बाहेर येतें आणि विशाल सृष्टि पाहून तें हृदयांतील आनंदानें नाचूं लागतें. साधकाची अशीच दशा असते. फुलपांखराचा किडा अजाणतां सृष्टिनियमालाच वश होअून कोशांत पडून रहातो. भक्त श्रद्धेच्या जोरावर औश्वरी मौन आणि साधनेची रात्र सहन करतो, आणि त्यांतून यथाकाळीं बाहेर निघतो, आणि नंतर सर्वत्र आनंदी आनंद अनुभवतो.

निराशेचे वेळीं अंधारी रात्रच धीर धरविण्यास कारणीभूत होते. तो म्हणतो – ही रात्रच पहा कशी आदर्श साधकाप्रमाणेंच अखंड जागरूक राहून पहांट होण्याची वाट पहात आहे. बाराबारा तास अुत्तरोत्तर वाढणारा अंधःकार पाहून देखील तिची श्रद्धा डगमगत नाहीं. ती आपली असंख्य तारे पेटवून वाट पहातच बसते. मला नको का तिच्यापासून धडा घ्यायला !

ओगो मौन, ना जदि कओ
नाअि कहिले कथा।
बक्ष भरि बअिब आमि
तोमार नीरवता।
स्तब्ध हये रअिब पड़े
रजनी रय जेमन करे
ज्वालिये तारा निमेषहारा
धैर्ये अवनता।

हबे हबे प्रभात हबे,
आँधार जाबे केटे।
तोमार वाणी सोनार धारा
पड़बे आकाश फेटे।

तखन आमार पाखिर बासाय
जागबे कि गान तोमार भाषाय।
तोमार ताने फोटाबे फुल
आमार वनलता?

"हे मौनमूर्ते, तूं जर बोलणार नसलास तर नको बोलूं. तुझी ही नीरवता, तुझा हा अबोलाच मी हृदयांत भरून घेऊन सहन करीन. ज्याप्रमाणें रात्र तारे पाजळून अनिमिष लोचनांनीं मान वांकवून जागरण करीत असते त्याप्रमाणें मी तुझें हें मौन सहन करीन.

पण शेवटीं पहांट खात्रीनें होईलच—अंधाराचा नाश होईलच; आणि मग आकाश फाटून त्यांतून तुझ्या वाणीची सुवर्णधारा वाहूं लागेल. ती धारा पृथ्वीवर पोंचतांच माझ्या वनलता तुझ्या गाण्यानें फुलूं लागतील.

मग तुझें मौन कोठें राहील?"

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ५५६१८ दि: ...
क्रमांक ...२२३३... नों दि: २०।३।०७
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र. 92684

# १७

**अी**श्वर ज्याप्रमाणें सर्वसमर्थ आहे त्याचप्रमाणें जीवहि सर्वतऱ्हेनें असहाय आहे. सामर्थ्यामध्यें अीश्वर जर अद्वितीय तर निःसहाय स्थितीच्या बाबतींत मीहि अद्वितीय आहें.

अशा स्थितींत साधना करून अीश्वराच्या चरणापर्यन्त पोंचण्याची जबाबदारी माझी कशी असूं शकेल? मजकडून साधना करवून घेणारा सहाय्यक जेव्हां प्रत्यक्ष परमेश्वरच असेल तेव्हांच कांहींतरी आशा बाळगतां येअील.

माझें जीवन मलिन आहे हेंच मला प्रथम ठाअूक नव्हतें. मग तें धुअून साफ करण्याची अिच्छा कोठून असणार? आतां माझी मलिनता माझ्या नजरेस पडली आहे खरी. ती दूर झाली पाहिजे हेंहि मला पटलें आहे, पण नुसतें पटून अुपयोग काय? ती मलिनता धुअून काढण्याची शक्ति मजमध्यें नाहीं. तो भाग भगवंता तूंच अुचलला पाहिजेस. जोंवर या मलिनतेची जाणीव किंवा लाज मला नव्हती तोंपर्यन्त तुझी मदत मीं मागितली नाहीं. आतां ती जाणीव झाल्यामुळें माझें व्याकुळ हृदय क्रन्दन करूं लागलें आहे. आतां त्याला धुळींत राहूं देअूं नकोस. धुअून काढ.

दया दिये हबे गो मोर
जीबन धुते।
नअिले कि आर पारब तोमार
चरण छुँते।
तोमाय दिते पूजार डालि
बेरिये पड़े सकल कालि,
परान आमार पारि ने ताअि
पाये थुते।

एतदिन तो छिल ना मोर
कोनो व्यथा,
सर्व अंगे माखा छिल
मलिनता।
आज ओअि शुभ्र [1]कोलेर तरे
व्याकुल हृदय [2]केंदे मरे,
दियो ना गो दियो ना आर
धुलाय शुते।

"दयावंता, कृपा करून तुलाच माझें जीवन धुवून द्यावें लागणार आहे. तसें जर न झालें तर तुझ्या पायाचा स्पर्श करण्याची माझ्यांत योग्यता कोठून येणार! तुला अर्पण करण्यासाठीं फुलांची परडी घेऊन मी बाहेर निघतों. तर सर्वत्र माझ्या अंगचें काजळच बाहेर येतें. जिकडे पहावें तिकडे काळेंच काळें दिसतें. त्यामुळें माझा प्राण तुझ्या चरणीं मला ठेवितांहि येत नाहीं.

---

१. कोलेर तरे – मांडीवर. २. केंदे मरे – रडतें.

आजवर या स्थितीचें मला दुःख नव्हतें. सर्वांग मलिनतेनें माखलेलें असून देखील मला त्याची जाणीव नव्हती. त्यामुळें कसलीच अस्वस्थताहि नव्हती. पण आज तुझी ती पवित्र शुभ्र मांडी मला दिसते आणि काजळानें माखलेलें माझें शरीरहि मला दिसतें. त्यामुळें माझें व्याकुळ हृदय आक्रंदन करूं लागलें आहे. यापुढें त्याला या सर्व धुळींत निजूं देऊं नकोस. चांगलें तेल लावून, स्नेह-प्रयोग करून प्रेमानें गोंजारण्यासाठीं आपल्या मांडीवर घे. माझी साधना तूंच करावयाची आहे, कारण लहान मोठी सर्व शक्ति तुझीच आहे."

# १८

मनुष्याची अशी ही फसगत नेहमींच होत असते. दुर्दैवाची गोष्ट ही कीं अशी फसगत होण्यांत त्याचा स्वतःचाच सहकार कांहीं थोडाथोडका नसतो.

मनुष्याच्या वासना अितक्या मोहक असतात कीं, त्याच्या सात्त्विक वृत्तीला त्या भुरळ घालतात. अीश्वराची पूजा करण्यासाठीं सोळा प्रकारचे अुपचार आणि छप्पन प्रकारचे भोग मनुष्यानें निर्माण केले. जें जें कांहीं स्वतःला चांगलें वाटेल तें तें सगळें भगवंताला अर्पण करावें ही मूळची कल्पना किंवा योजना. भोगविलासाचें जें जीवन स्वतः सोडून दिलें तें अीश्वराला अर्पण करण्यांत मनुष्याला संकोच वाटला नाहीं. आपल्या घरीं राजा आला असतां त्याचा पाहुणचार करण्यासाठीं ज्याप्रमाणें आपण आपल्या शक्तीची कमाल करून त्याचा पाहुणचार करतों त्याप्रमाणें परमात्म्याला देखील राजा समजून आपण त्याची राजविलासी पूजा करूं लागलों. फरक अेवढाच कीं, जर त्रयोदशगुणी तांबुल राजाला दिला तर राजा स्वतः त्याचें सेवन करतो. भगवंताच्या पूजेच्या शेवटीं अर्पण केलेला तांबूल भगवंतांनीं स्वीकारला आहे असें समजून त्याचा अुरलेला प्रसाद आपणच खावयाचा असतो. असें करतां करतां भक्तीसाठीं आणलेल्या तांबूलाची चटक भक्ताला लागते आणि मग स्वतःला जसा तांबूल हवा असेल तसाच तो भगवंताच्या पुढें करून स्वतः मटकावण्याची संवय त्याला लागते.

नारदादि ऋषींनीं समजावून सांगितलें कीं मनुष्यानें आपल्या वासना मारण्याच्या ऐवजीं त्या sublimate करून, त्याचें उदात्तीकरण करून ईश्वराच्या चरणीं अर्पण कराव्यात. " काम असावा ईश्वरभजनीं, क्रोध असावा इन्द्रियदमनीं " इत्यादि प्रकारें वासनांचा उपयोग आत्मोद्धाराकडे करावा. तंत्रमार्गानें देखील असाच उपदेश केला कीं देहदंडन न करतां, तपस्येच्या कठोर मार्गानें न जातां, मधुरा–भक्तीचें सेवन करा आणि वासनांनाच ईश्वरसेवेच्या मार्गाला लावा. याचा परिणाम काय झाला ते शाक्त मार्गाचा इतिहास सांगत आहेच.

तारा दिनेर बेला एसेछिल
आमार घरे —
बलेछिल, एकटि पाशे
रइब प'डे ।
बलेछिल देवतासेवाय
आमरा हब तोमार सहाय —
जा-किछु पाइ प्रसाद लब
पूजार परे ।

एमनि करे दरिद्र क्षीण
मलिन बेशे
संकोचेते एकटि कोणे
रइल एसे ।
राते देखि प्रबल हये
[1] पशे आमार देवालये,
मलिन हाते पूजार बलि
हरण करे ।

---

१. पशे – घुसतात.

"वासना ओळखून होत्या कीं त्यांच्या वास्तविक स्वरूपांत त्यांना कोणी जवळ करणार नाहीं म्हणून ! त्यांनीं भक्तीचा मोठा आव आणून वचन देण्यास सुरवात केली. आम्हांला दुसरें काय हवें आहे ? आम्हांला आमच्या जीवनाचें सार्थक करण्याची जर संधि द्याल तर आम्हीं कृतार्थ होऊं. तुमच्या देवपूजेच्या वेळीं आम्हांला बोलवा. आमच्या शक्तीप्रमाणें आम्हीं मदत करूं आणि पूजेच्या शेवटीं जो कांहीं प्रसादाचा तुकडा मिळेल तो घेऊन संतुष्ट राहूं. मग त्या वासनांनीं दिलेल्या वचनाप्रमाणें अभिनय करून, अगदीं गरीब बापड्या होऊन एका कोपऱ्यांत दीनपणानें आपलें स्थान घेतलें. आणि जणुंकाय एवढी जागा देखील घेण्याचा आपला हक्क नाहीं अशा मुद्रेनें अगदीं संकोचून कमींत कमी जागा घेऊन त्या बसल्या.

पुढें रात्र पडली. सर्वत्र अंधार झाला तेव्हां मग मी काय पहातों—या वासनांना कळून चुकलें कीं, आतां संधि आपलीच आहे. त्यांनीं बघतां बघतां विकराळ रूप धारण केलें आणि न विचारतां त्या देवळांत घुसल्या व पूजेसाठीं म्हणून जो नैवेद्य तयार करून ठेविला होता तो आपल्या मलिन हातांनीं त्यांनीं उचलला आणि बघतां बघतां खाऊन फस्त केला.

प्रथमच जर त्यांच्या मायावी बोलण्याला मीं भीक घातली नसती तर !!"

# १९

जेव्हां अुत्तर हिन्दुस्थानांत अीस्ट अिन्डिया कंपनीचें राज्य झालें तेव्हां हे दुकानदार दिल्लीला जाअून बादशहाची खुशामत करून त्याच्याकडून कसलें तरी फरमान घेअून येत आणि त्याच्या जोरावर बंगालसारख्या समृद्ध प्रदेशांत ठिकठिकाणीं चौक्या बसवून बादशहाच्या नांवानें नाना प्रकारचे कर अुपटीत असत. कित्येकजण तर फरमान असो नसो बादशहाचें नांव घेअून प्रजेला असें कांहीं नाडीत कीं, त्यांचेजवळ कांहींच रहात नसे. अशा लोकांच्या कठोरपणामुळेंच भाषेमध्यें 'लुटणें' या अर्थी 'नागवणें' हा शब्द आला आहे. कारण अंगावर कपडादेखील ते राहूं देत नसत.

पुढें जेव्हां या धूर्तांनीं पाहिलें कीं, मोगल राज्य डळमळीत आणि दुर्बळ झालें आहें, लोक अनाथ आणि असहाय झाले आहेत, तेव्हां त्यांनीं बादशहाच्या फरमानाची आणि त्याचे सेवक होण्याची भाषा सोडून दिली आणि कंपनी बहादुरच्या नांवानेंच निर्लज्जपणें लोकांचा छळ आरंभिला.

अेकदां अेक अिंग्रज सेनापति आपल्या सैन्यानिशीं बंगालमध्यें फिरत असतां अेके ठिकाणीं लोक गांव सोडून जीव घेऊन पळत असतांना त्याचे दृष्टीस पडलें. सेनापतीनें त्यांना थोपवून धरून विचारलें—तुमच्यावर काय संकट आलें आहे? कोण तुमच्यावर चढाअी करून आला आहे? भिअूं नका, मला शक्य असेल तर मी तुमचें रक्षण करीन.

लोक म्हणाले, ' जर कोणी चढाओी करून आला तर आम्हीं स्वतःच त्याचा अिलाज करूं शकूं. आम्हीं गांव खाली करीत आहोंत याचें कारण निराळेंच आहे.

' आजपासून आमच्या गांवीं ब्रिटिश अदालत स्थापन होणार आहे. तिच्या लुटी-पासून कांहींच रक्षण नसल्यामुळें आम्हीं गांव सोडण्याचें ठरविलें आहे. '

ब्रिटिश सेनापतीला देखील वाटलें असेल कीं, या संकटांतून मी या लोकांना कसें काय वांचविणार ? बिचाऱ्यानें फक्त ही गोष्ट आपल्या वासरींत (डायरींत) नमूद मात्र करून ठेविली.

कंपनी सरकारच्या कारकुनांची हीं करतूतें मनुष्यस्वभावाला सोडून थोडींच आहेत ? आपल्या वासनादेखील आत्मदेवाच्या राज्यांत — या शरीरांत असाच धुमाकूळ घालतात. प्रथम प्रथम धार्मिक आचार, कर्तव्यबुद्धि, परोपकार, शास्त्रीय प्रयोग वगैरे बहाणे पुढें करून वासनातृप्तीचे मार्ग शोधून काढले जातात आणि चारित्र्यबळ, संयम-शक्ति आणि पवित्रता नष्ट करतात. आणि पुढें जेव्हां खात्री होते कीं, मनुष्याचें हृदय अगदींच दुर्बळ झालें आहे, त्याच्यांत त्राण अुरलें नाहीं तेव्हां सर्व प्रकारची आत्मवंचना दूर सारून आणि आणि दंभाचा पडदादेखील फाडून टाकून, निर्लज्जपणें सडेतोड भाषा बोलूं लागतात; आणि आत्म्याची अूर्ध्वगति रोकतात. या वाटमाऱ्यांना प्रथमपासूनच ओळखलें पाहिजे. प्रथमच त्यांच्या तावडींत सांपडावयाला नको. '**तयोर्न वशमागच्छेत् ।**'

तारा तोमार नामे वाटेर माझे
  [1]मासुल लय जे भरि ।
देखि शेषे घाटे अेसे
  नाअिको पारेर [2]कड़ि ।
तारा तोमार काजेर भाने
नाश करे गो धने प्राणे,
सामान्य जा आछे आमार
  लय ता अपहरि ।

---

1. मासुल — महसूल, कर. २. कड़ी — कवडी.

आजके आमि [3]चिनेछि सेअि
छद्‌मवेशी–दले।
ताराओ आमाय चिनेछे हाय
शक्तिविहीन ब'ले।
गोपन मूर्ति छेड़ेछे ताअि,
लज्जाशरम आर किछु नाअि,
[4]दाँड़ियेछे आज माथा तुले
पथ अवरोध करि।

"हे राजेश्वरा, ते तुझ्या राजमार्गावर ठाणें देअून तुझ्या नांवानें कर वसूल करतात. पुढें जेव्हां नदी ओलांडण्याची पाळी येते तेव्हां तरीचें (होडीचें) भाडें चुकविण्यासाठीं घाटावर खिसा चांचपून पहावें तर अेक कवडीहि अुरली नाहीं. ते तुझ्या कामाचा बहाणा पुढें करून धन, प्राण सगळ्याचा सत्यानाश करतात आणि जी कांहीं चीजवस्त आमचे जवळ असेल तिचें अपहरण करतात.

आतां तर स्थिति अधिकच बिघडली आहे. हे छद्‌मवेशानें येणारे तोतये राजसेवक आहेत असें आम्हीं आजच ओळखलें. हाय रे दुर्दैवा, अितक्यांत त्यांनाहि कळून चुकलें कीं, आम्हीहि शक्तिविहीन, असहाय, अनाथ आहोंत. आतां तर ते कसली लाजभीड ठेवणार! त्यांनीं आपला कपटवेश आतां टाकून दिला आहे, आणि निर्लज्ज होअून वाटमाऱ्याप्रमाणें रस्त्यांत तोऱ्यानें अुभे राहिले आहेत. आणि आमची वाट आडवीत आहेत. आतां हे कसचे आम्हांला जिवानिशीं सोडणार!!"

---

३. चिनेछि – (मी) ओळखतों ४. दाँडियेछे–अुभे राहिले आहेत.

# २०

गीतेंत सांगितलें आहे कीं जगांत आपल्या वाट्याला जी सामाजिक सेवा आली असेल ती अुत्तम रीतीनें बजावली असतां तीच परमेश्वराची पूजा होअूं शकते आणि तिच्या योगानें मनुष्याला जीवनसिद्धि प्राप्त होते.

" स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः । "

अेक कवि म्हणतो " जनसेवा ती अीश्वरसेवा. "

टिळकांनीं भगवंताला ' जनतात्मा ' म्हटलें आहे. जनतेमध्येंच जगन्नाथाला ओळखलें पाहिजे. ही जी सर्वसामान्य साधना आहे ती सामान्य मनुष्याला साधणें कठीण जाते. याचें कारण त्याच्या स्वार्थी असामाजिक वृत्तीच होत. यज्ञ, दान, तप यासारखीं सामाजिक कामें मनुष्य जर प्रसन्नपणें आणि निरपेक्षपणें करूं लागला तर त्याचे क्षुद्र, संकुचित आणि असामाजिक व्यक्तित्व नष्ट होअून जाअील आणि मग त्याच्या जीवनांत द्वैत असें रहाणार नाहीं.

मग तो कधीं असें म्हणणार नाहीं कीं, " लोकांच्या सहवासाचा मला कंटाळा आला आहे. मला अेखाद्या कोंपऱ्यांत बसून ध्यान करावयाचें आहे. " ध्यान करावयाचें

असेल तर लोकहितार्चेच ध्यान करावें, ओीश्वराच्या प्राप्तीसाठीं जर अेखादें योग्य तीर्थस्थान असेल तर तें लोकांचा बाजारहाटच होय. कारण तेथें सर्व लोक केवळ आपल्या वस्तूंचेच नव्हे तर आपल्या पुरुषार्थांचें आणि जीवनाचें आदान प्रदान करीत असतात. जगन्नाथाची भेट मंदिरांत होत नसून भर रस्त्यावर होते. अेवढें समजलें म्हणजे मनुष्याची साधना-विषयक कल्पनाच बदलून जाओील. बाजारांत क्रयविक्रयाची जी घासाघीस चालते आणि जनसंमर्दाचा जो कोलाहल अैकूं येतो त्यांतच आपल्याला त्या जगन्नाथाची मोहक मुरली अैकूं आली पाहिजे. आणि दुःखसुखात्मक व्यवहाराच्या जगांतच आपल्याला साधनेचें क्षेत्र सांपडलें पाहिजे. आप-परभाव दूर करून चांगले आणि वाओीट, सज्जन आणि दुर्जन असा भेदच जेथें अुरत नाहीं अशा प्रबळ प्रेमानें सर्वांशीं अैक्य साधणें याहून निराळी साधना ती काय असणार ?

देवाची मूर्ति रथांत बसवून माणसांकडून ती मंदिरापर्यन्त खेंचून नेण्याचे दिवस आतां अुरले नाहींत. अुलट आतां आपण आपल्या प्राणाच्या रथांत बसून लोकसमाजाच्या हृदयामध्यें वास करणाऱ्या जगन्नाथाच्या सेवेसाठीं घर सोडून रस्त्यावर यावयाचे आहे आणि तेथेंच भगवंताचा आदेश आणि संदेश अैकिला पाहिजे आणि सेवापरायण हृदयांत तो धारण केला पाहिजे.

आमार अेकला घरेर [1]आड़ाल भेंगे
विशाल भबे
प्राणेर रथे बाहिर हते
पारब कबे।
प्रबल प्रेमे सबार माझे
फिरब धेये सकल काजे,
हाटेर पथे तोमार साथे
मिलन हबे।
प्राणेर रथे बाहिर हते
पारब कबे।

---

1. आड़ाल–बंधन, आडकाठी.

निखिल आशा-आकांक्षा-मय
दुःखे सुखे
[2]झाँप दिये तार तरंगपात
धरब [3]बुके।
मन्द-भालोर आघातवेगे
तोमार बुके अुठब जेगे,
शुनब बाणी विश्वजनेर
कलरवे।
प्राणेर रथे बाहिर हते
पारब कबे।

" माझ्या या अेकाकी घराचा आडपडदा फाडून प्राणाच्या रथांत बसून या विशाल विश्वाच्या बाह्य प्रदेशांत मी केव्हां पोहोंचू शकेन? प्रबल प्रेमानें सर्वांच्यामध्यें सर्वांचें काम करण्यासाठीं मी केव्हां धावूं शकेन? मला आतां कळून चुकलें आहे कीं तुझ्याशीं माझें मिलन लोकसमुदायाच्या बाजाराच्या रस्त्यावरच होणें शक्य आहे. या मिलनासाठीं प्राणाच्या रथांत बसून मी केव्हां बाहेर पडूं शकेन, बाहेर येअूं शकेन?

सर्व आशा आणि आकांक्षा यांनीं भरलेल्या सुखदुःखांमध्यें अुडी घेअून लोक-स्वभावाच्या लाटांचे आघात मी माझ्या छातीवर केव्हां घेअूं शकेन, सहन करूं शकेन? अिष्ट आणि अनिष्ट, चांगलें आणि वाअीट यांच्या आघातांच्या जोरानें मी तुझ्या हृदयांत जागृत होअून विश्वजनांच्या कलरवामध्यें तुझा संदेश मी अैकूं शकेन असें केव्हां होअील? प्राणांच्या रथांत बसून मी घराबाहेर केव्हां येअूं शकेन?"

---

२. झाँप दिये – अुडी घेअून. ३. बुके – छातीवर.

# २१

ओस्वराचा स्थापना' करण्यासाठीं प्रथम स्थानशुद्धि करून आसन मांडावें लागतें. आपला जीव लहान म्हणून जर लहानसें आसन मांडलें आणि त्यावर बसविण्यासाठीं ओीश्वरांला लहान केलें तर त्याचें खरें दर्शन आपल्याला होणार नाहीं. तशा प्रकारची साधना खरी साधना न होतां केवळ मोहाची तंद्राच होओील. आपल्या लहानशा बाहुपाशामध्यें ओीश्वराला माववण्याचा प्रयत्न केला तर आपण केवळ स्वतःलाच आपल्या बाहुपाशांत बांधूं शकूं.

जेव्हां या अशेष विश्वामध्येंच तो विश्वंभर भरला आहे हें ओळखून त्याची प्राप्ति तेथें करण्याचा प्रयत्न करूं, तेव्हांच त्या हृदयेश्वराला आपल्या हृदयांत आणूं शकूं, पाहूं शकूं.

विश्वरूप दर्शन करावयाचें आहे काय ? तर ध्यान विचारांत घ्या आणि तसलें दर्शन ओीश्वराकडे मागा. आपलें चित्त हा ओक मजबूत पण लुसलुशीत असा देंठ आहे. त्याच्यावर हें कमळाप्रमाणें फुललेलें सर्व विश्व धारण केलें गेलें आहे आणि त्या विश्वकमळावर तुझा पूर्ण प्रकाश ओकसारखा वृष्टि करीत आहे असें हें तुझें नवीन विश्वरूपदर्शन मला घडव.

अेका आमि फिरब ना आर
अेमन करे—
निजेर मने कोणे कोणे
मोहेर घोरे।
तोमाय अेकला बाहुर बाँधन दिये
छोटो करे घिरते गिये
आपनाके जे बाँधि केवल
आपन डोरे।

जखन आमि पाब तोमाय
निखिल-माझे
सेअि खने हृदये पाब
हृदयराजे।
अेअि चित्त आमार बृन्त केवल,
तारि ’परे विश्वकमल;
तारि ’परे पूर्ण प्रकाश
देखाओ मोरे।

"यापुढें मी आतां असा अेकटा फिरणार नाहीं. मोहाच्या घोर तंद्रेमध्यें आपल्या मनाच्या कोपऱ्याकोपऱ्यांत मी हिंडणार नाहीं. तुला माझ्या बाहूच्या बंधनांत बांधावयास गेलों आणि तुला लहान बनवून घेरून टाकण्याचा प्रयत्न केला तर आपल्या पाशांत मी स्वतःलाच केवळ बांधूं शकतों असा अनुभव आला आहे.

मी जेव्हां तुला या सर्व विश्वामध्यें पाहूं शकेन—मिळवूं शकेन त्याच क्षणीं तुझ्यासारख्या हृदयेश्वराला मी माझ्या हृदयांत आणूं शकेन – ठेवूं शकेन.

हें माझें चित्त जणुं काय फक्त देठ आहे, त्यावर हें विश्वकमळ विकसून सर्वत्र पसरलेलें आहे आणि त्याच्यावर पूर्ण प्रकाशरूपानें तूं पसरलेला आहेस असें

दर्शन मला दे. विश्वाला सोडून विश्वनाथाचें दर्शन होणें शक्य नाहीं हें आतां मला कळून चुकलें आहे. माझ्या व्यक्तित्वाचा विश्वाशीं संबंध आहे हें मीं ओळखल्यानंतरच तूं मला प्रकाशरूपानें पावन करणार आहेस. मी जेव्हां विश्वाशीं अेकरूप होओीन तेव्हांच तूं माझ्या हृदयांत विराजमान होणार आहेस हें मला आतां पटलें. आतां मी विश्वाला बाजूला सारून आपल्याच मनाच्या कोनाकोंपऱ्यांत मूढ होअून पडणार नाहीं."

# २२

भगवंता, मला तुझ्या कृपेचा आश्रित बनवूं नकोस. तुझ्या तेजस्वी आनंदाचा भागीदार बनीव– साथीदार बनीव. मीं कांहीं अकर्मण्य भावुक नाहीं कीं भ्याडपणानें दुर्बळतेचे अश्रु ढाळीत बसेन. सुखाच्या आणि शोभेच्या अुथळ जीवनाची लालसा मला नाहीं. सुखाचें जीवन म्हणजे स्वप्नमय जीवन, त्याची गोडी ती काय धरावयाची ? ज्या भीषण आनंदानें पागल होअून तूं नाचतोस त्याच आनंदाचा साथीदार होअून शिवगणांप्रमाणें मीहि नाचूं अिच्छितों. तुझें तें तांडवनृत्य पहातांच संदेह-पेलव लोक, दुर्बळवृत्तीचे लोक भयभीत होअून आणि लज्जित होअून पळ काढतात. अशा वेळीं तुझ्या त्या रुद्र प्रेमाचा – प्रचंड मनोहर प्रेमाचा साथीदार होण्याचें पसंद करावें आणि क्षुद्र आशांचा तुच्छ स्वर्ग पायांखालीं तुडवून त्याला रसातळाला पाठवून द्यावा हेंच मला हवें आहे. मला तुझा साथीदार बनावयाचें आहे. पोष्य किंवा आश्रित बनावयाचें नाहीं.

आमार अे प्रेम नय तो भीरु,<br>
नय तो हीनबल,<br>
शुधु कि अे व्याकुल हये<br>
फेलबे अश्रुजल ।

मन्दमधुर सुखे शोभाय
प्रेमके केन घुमे डोबाय।
तोमार साथे जागते से चाय
आनन्दे पागल।

नाच' जखन भीषण साजे
तीव्र तालेर आघात बाजे,
पालाय त्रासे पालाय लाजे
सन्देहविह्वल।

सेअि प्रचंड मनोहरे
प्रेम जेन मोर बरण करे,
क्षुद्र आशार स्वर्ग ताहार
दिक से रसातल।

" माझें हें प्रेम भीरू नाहीं, हीनबल नाहीं, तें काय व्याकुळ होअून फक्त अश्रु ढाळीत बसेल?

मंदमधुर सुखांमध्यें आणि वरवरच्या शोभेमध्यें मला टाकून माझ्या प्रेमाला निद्रेमध्यें, स्वप्नमय जीवनामध्यें बुडवून कां टाकतोस? माझें प्रेम आनंदानें पागल होअून तुझ्याबरोबर जागूं पहातें, नाचूं पहातें. त्याचें तें कोड पुरीव.

तूं जेव्हां तुझ्या भीषण सरंजामानिशीं नाचूं लागतोस आणि तुझ्या तांडवाच्या तीव्र तालाचा आघात दणदणूं लागतो तेव्हां जे कोणी अश्रद्धाळू, दुःख-पेलव लोक संदेह-विव्हळ झाले असतील ते सर्व त्रस्त होअून दूर पळून जातील.

अशा वेळीं माझ्या प्रेमानें त्या प्रचंड मनोहराचा स्वीकार करावा, त्याचा स्वयंवर करावा आणि आपल्या क्षुद्र आशेच्या स्वर्गाला त्यानें रसातळाला पोंचवावें, हेंच मला हवें आहे. सुखासोयीच्या स्वप्नमय जीवनाची मला गोडी नाहीं. मला तुझ्या रुद्र आनंदाचा भागीदार होण्यांतच सार्थक वाटतें.

# २३

देवाला अर्पण केलेला नैवेद्य जर देव खाऊन टाकूं लागला तर किती लोक त्याला रोज मिष्टान्न चारतील? देवाची पूजा शेवटीं आपल्याच पदरीं पडते, अशी खात्री असते म्हणूनच लोक त्याची षोडशोपचारें पूजा करतात. दगडाचा देव करावयाचा आणि मग म्हणावयाचें कीं, 'देव फक्त भावाचा भुकेलेला आहे, त्याला थोडेच हे राजविलास हवे आहेत?'

अीश्वराला राजा म्हणणें, पिता म्हणणें सोयीचें असतें. राजाला हृदयाची भक्ति अर्पण करावयाची आणि त्याच्याकडून सर्व प्रकारचे अैहिक भाग्य मिळवावयाचें. अीश्वराला पिता म्हणावयाचें आणि त्याच्याकडून स्वतःची संभाळ करवून घ्यावयाची. अीश्वराला माता म्हणावयाचें आणि तिच्याकडून लाड करवून घ्यावयाचे आणि आपलें जर चुकलें तर पुनः म्हणावयाचें — 'कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति।' अीश्वराला वाटाड्या म्हणावयाचें आणि त्याचेकडून हात धरवून घेअून जीवनपथ सुरक्षित करावयाचा. हा सर्व सौदा फायद्यांतील आहे. पण, अीश्वराला सखा किंवा भाअू म्हणून ओळखूं लागलों तर जगांतील सर्व सुखी दुःखी, समर्थ दुर्बळ, ज्ञानी अज्ञानी लोकांना आपलेपणानें वागवावें लागेल आणि मग त्याग, दान, सेवा यांचें शुक्लकाष्ठ मागें लावून घ्यावें लागेल.

अीश्वर बादशहा होअून, पितामाता होअून आणि गुरु किंवा वाटाड्या होअून अेव्हांना कंटाळला असेल. अीश्वर प्रेमाचा, आत्मीयतेचा, खेळीमेळीचा आणि जवळिकेचा भुकेला आहे. आपण जर त्याला भाअू म्हणून स्वीकारलें आणि जगांतील सगळ्या भावांना आपुलकीनें वागविलें; त्याला सौंगडी म्हणून ओळखलें आणि सर्व अनाथांना प्रेमादरानें गोंजारलें तर आपल्याला आपलें संकुचित जीवन पदोपदीं खर्चीं घालावें लागेल; आणि शेवटीं आपलें असें कांहींच रहाणार नाहीं. अेवढा त्याग जर झेपला आणि आपण जर सर्वांशीं अेकरूप झालों तर आपलें व्यक्तिगत जीवन विसरून जाअून समष्टीच्या विराट जीवनसागरांत आपण लीन होअून जाअूं, तदाकार आणि तन्मय होअून जाअूं. पण अेवढें विशाल-विराट जीवन नशिबीं असावयास पाहिजे ना?

संकुचित जीवनाचा क्षुद्र स्वार्थ सुटेल तेव्हांच तें शक्य होणार —

" आधीं होता मुक्त। बळें झाला बद्ध।
घेअूनियां छंद। माझें माझें॥ "

देवाला जवळ करून, सर्वसामान्य जनतेशीं अेकरूप होअून विराट सागरांत मिसळण्यापेक्षां देवाला दूर ठेवण्यांत आणि त्याची महाराजा, पितामाता आणि गुरु म्हणून खुशामत करण्यांत आपल्याला आपल्या संकुचित जीवनाची अधिक सुरक्षितता वाटते.

यापुढें खरी भक्ति करावयाची म्हणजे देवाचें थोरपण पुढें न करतां त्याला आपल्या मानवी बंधूंचा प्रतिनिधि म्हणून ओळखणें हीच खरी साधना आहे.

[ धर्मनिष्ठ म्हणतात कीं, Fatherhood of God आणि Brotherhood of man हाच जीवनाचा खराखुरा संबंध आहे. भांडवलवाल्या लोकांनीं Fatherhood of God अेवढेंच काय तें स्वीकारलें. आणि आतां समाजसत्तावाद्यांनीं Brotherhood of man पुढें केलें आहे. आणि त्यांतहि भेद करून Brotherhood of poor, helpless, down-trodden, have-nots यालाच ते पुढें करीत आहेत. कवि म्हणतो कीं, असें करण्यापेक्षां Brotherhood of God चाच प्रचार करा म्हणजे जीवनांतील दंभ आणि हृदयांतील तळमळ दोन्हींहि दूर होतील. ]

देवूता जेने दूरे रञि दाँड़ाये,
आपन जेने आदर कारि ने।
पिता बले प्रणाम कारि पाये,
बन्धु बले दु हात धारि ने।
आपनि तुमि अति सहज प्रेमे
आमार हये अेले जेथाय नेमे
सेथाय सुखे बुकेर मध्ये ध'रे
संगी बले तोमाय बरि ने।

भाञि तुमि जे भाञियेर माझे, प्रभु,
तादेर पाने ताकाञि ना जे तबु,
भाञियेर साथे भाग करे मोर धन
तोमार मुठा केन भरि ने।
छुटे अेसे सबार सुखे दुखे
दाँड़ाञि ने तो तोमारञि सन्मुखे,
सँपिये प्राण क्लान्तिविहीन काजे
प्राणसागरे झाँपिये पड़ि ने।

"तुला देवता समजून तुझ्यापासून मी दूर अुभा रहातों; आत्मीय समजून आपुलकीनें मी तुझा आदर करीत नाहीं.

मी तुला पिता म्हणून तुझ्या पायावर लोटांगण घेतों—तुझी चरणवंदना करतों पण तुला भाअू म्हणून दोन्ही हातांनीं कवटाळीत नाहीं. तूं जेथें अत्यंत स्वाभाविक अकारण प्रेमानें अुचासनावरून अुतरून आमचा होअून आपण होअून येतोस तिथें तुला आपला सौंगडी म्हणून छातीशीं कवटाळण्याचें मला सुचलें नाहीं.

तूं खरोखर आमचा भाअू आहेस. जगांतील सर्व मानवबंधूंच्या हृदयांत तूं विराजमान आहेस, पण सर्व बंधूंकडे पाहून त्यांच्या चेहऱ्यांत तुझें दर्शन

करावें आणि आपल्या सर्वस्वाची त्यांच्याशीं वांटणी करून तुझ्या मुठी भरून टाकाव्यात हेंहि मला सुचत नाहीं.

आपल्या संकुचित व्यक्तित्वांतून सुटून निघून सर्वांच्या सुखदुःखांशीं अेकरूप होअून मी तुझ्यासमोर अजून अुभा राहिलों नाहीं आणि हे क्षुद्र प्राण अर्पण करून जेथें कसलाच थकवा नाहीं अशा मानवसेवेच्या विश्वकार्यांत पडून प्राण-सागराशीं अेकरूप व्हावयाचें अजून मला पटलेलें नाहीं.

तसें जेव्हां घडेल तेव्हांच मी तुझा होअीन आणि तूं माझा होशील. तेव्हांच मला सायुज्यमुक्ति मिळेल.”

# २४

आयुष्यांत लहानमोठ्या अनेक वासना आपल्या जीवनांत येअन जातात, आणि निरनिराळ्या वेळीं आपल्या जीवनाचा लहान वा मोठा भाग भरून टाकतात. ज्यावेळीं जी वासना प्रबळ होते त्यावेळीं तीच जीवनसर्वस्व आहे असें त्या वेळापुरतें वाटतें. पण ती तृप्त झाली, ओसरली किंवा विरून गेली म्हणजे वरवर तरी निदान तिचा मागमूसहि रहात नाहीं.

जीवन हें असेंच असावयाचें. पण अशा वासना कितीहि अुठल्या आणि कशाहि तृप्त झाल्या तरी त्यायोगें जीवन समृद्ध होतेंच असे नाहीं. असलें सामान्य जीवन गद्याप्रमाणें नीरस असण्याचाच संभव अधिक, अुथळ तर असतेंच.

पण जेव्हां मनुष्याला अेखादी दारुण व्यथा घेरते आणि त्याच्या जीवनाच्या सर्व क्षणांमध्यें सूत्राप्रमाणें अनुस्यूत होते तेव्हांच तें जीवन सारगर्भ आणि पारमार्थिक ( serious ) बनतें.

वेदना नसली आणि अेखादी महत्त्वाकांक्षा मनुष्याला चिकटली असली तरीहि तोच परिणाम होतो. किंवा जर अेकहि महत्वाकांक्षा नसली, स्वार्थाच्या अभिमानाचा लवलेश नसला पण मनुष्याला जर अेखाद्या मिशनची बाधा झाली असली – होय, जर अेखाद्या

मिशननें माणसाला भुताप्रमाणें झपाटलें तर त्याला बाधाच म्हटलें पाहिजे — तर त्याच्या सिद्धीसाठीं मनुष्य बारीक सारीक अितर सर्व गोष्टींची अुपेक्षा करूं लागतो आणि सर्व प्रयत्न अेकाग्र करून अुत्कटतेनें आपले सर्व व्यापार चालवूं लागतो. अशा तऱ्हेनें जेव्हां सबंध जीवनाचें आमूल मंथन होअूं लागतें तेव्हां अगदीं खोलांतील देखील ठाव वर येअून स्पष्ट दिसूं लागतात.

आतां जर मनुष्यानें ठरविलें कीं जीवनामध्यें अीश्वराचेंच दर्शन करावयाचें, जें कांहीं करूं तें त्याच्या प्रीत्यर्थ, जें कांहीं मनामध्यें आणूं तें त्याचें स्मरण कायम राखूनच, तर मग सर्व कर्मे अुत्कटपणें करून देखील त्याचा स्वतःचा असा निराळा आग्रह रहातच नाहीं. अीश्वरी कार्य तेंच आपलें कार्य अशी दृढ भावना झाली म्हणजे सर्व अस्वस्थता दूर होते आणि मनुष्य अीश्वरी योजनेला अनुकूल होअून स्वातीच्या शिंपेप्रमाणें अीश्वरी प्रेरणेच्या पर्जन्यबिंदूची वाट पहात रहातो. मग तो अीश्वराला म्हणतो —

मुख फिराये रब तोमार पाने
अेअि अिच्छाटि सफल करो प्राणे ।
केबल थाका, केबल चेये थाका,
केबल आमार मनटि तुले राखा,
सकल व्यथा सकल आकांक्षाय
सकल दिनेर काजेरअि माझखाने ।

नाना अिच्छा धाय नाना दिक-पाने,
अेकटि अिच्छा सफल करो प्राणे ।
सेअि अिच्छाटि रातेर परे राते
जागे जेन अेकेर बेदनाते,
दिनेर परे दिनके जेन गाँथे
अेकेर सूत्रे अेक आनन्दगाने ।

" माझें तोंड मीं नेहमीं तुझेकडेच फिरवून असावें अेवढी अेकच अिच्छा, हे प्रेमवंता, माझ्या प्राणांमध्यें सिद्ध कर ; मीं फक्त असावें, केवळ पहात रहावें,

माझें मन केवळ तुझेकडे अुद्ग्रीव करून ठेवावें. माझ्या सर्व व्यथांमध्यें, सर्व आकांक्षांमध्यें आणि सर्व दिवसांच्या कामांमध्यें – जीवनकार्यामध्यें ही अेकच अिच्छा रहावी आणि पूर्ण व्हावी असें कर.

स्वाभाविकपणें अनेक अिच्छा, माझ्या अनेक वासना अनेक दिशांनीं वहातात. त्या धांवोत, पण फक्त अेकच अिच्छा तूं माझ्या जीवनामध्यें आणि प्राणांमध्यें सफल कर.

रात्री मागून रात्री येतात आणि अेकाच वेदनेनें बांधल्या जातात. त्या वेदनांमध्यें ही अेकच अिच्छा जागृत रहावी असें कर.

दिवसामागून दिवस येतात. तेथेंहि याच अेका अिच्छेच्या सूत्रानें, या अेकच आनन्दगायनानें हे सर्व दिवस अेकत्र ओवले जावेत असें कर. ही माझी अेकच अिच्छा परिपूर्ण होवो आणि मला तुझें अखंड दर्शन घडो. म्हणजे मी कृतार्थ झालों."

# २५

हृदय जर सूक्ष्म-वेदी* (Sensitive) असेल तर पावसाळा आल्याबरोबर ऋतूचा अुन्माद त्यांत शिरल्यावांचून रहाणार नाहीं.

असें सांगतात कीं पाअूस यावयाचा असला म्हणजे कोळ्याच्या चामडीला त्याचें ज्ञान होतें व माशा पकडण्याचें आपलें जाळें तो ताबडतोब आडव्याचें अुभें करून टाकतो आणि अशा रीतीनें पावसाच्या थेंबांपासून ज्याळें वांचवितो. कांहीं पाकोळ्या तुफान यावयाचें असलें म्हणजे कित्येक तास अगोदर अस्वस्थ होतात आणि निरनिराळ्या पक्ष्यांच्या घरट्यां-कडे जाअून घिरट्या घालून त्यांना येणाऱ्या वादळाची सूचना देतात. पक्ष्यांनाहि ही सूचना समजते आणि ताबडतोब ते आपापलीं घरटीं सुरक्षित करून टाकतात. हीं सर्व सूक्ष्म-वेदितेचीं अुदाहरणें आहेत. हवेंत यत्किंचित् फरक पडला कीं या प्राण्यांना त्याचा बोध होतो.

ज्याचें हृदय कलात्मक आहे अथवा आध्यात्मिक क्षेत्रांत पुढें गेलें आहे त्याला साही ऋतु हे केवळ बाह्य परिवर्तनाचें नव्हे तर आंतरिक जागृतीचें कारण होअून बसतात. बाह्य

* गंभीर-वेदी- Thick skinned. सूक्ष्मवेदी नव्हे तो.

प्रकृति आणि मानसिक भावना यांच्यामध्यें सामंजस्य स्थापित झाल्यामुळें असा मनुष्य सृष्टिबरोबर तद्रूप होअून जातो आणि मग प्रत्येक ऋतूंतील आध्यात्मिक रहस्य ओळखूं शकतो.

आबार अेसेछे आषाढ आकाश छेये,
आसे वृष्टिर सुबास बातास बेये ।
अेअि पुरातन हृदय आमार आजि
पुलके दुलिया अुठिछे आबार बाजि
नूतन मेघेर घनिमार पाने चेये ।
आबार अेसेछे आषाढ आकाश छेये ।

रहिया रहिया विपुल माठेर 'परे
नव तृणदले बादलेर छाया पड़े ।
'अेसेछे अेसेछे' अेअि कथा बले प्राण,
'अेसेछे अेसेछे' अुठितेछे अेअि गान,
नयने अेसेछे, हृदये अेसेछे धेये ।
आबार आषाढ अेसेछे आकाश छेये ।

"पुनः अेकदां आकाश व्यापून आषाढ आला आहे आणि वाऱ्याच्या लहरीबरोबर वृष्टीचा सुवासहि पुनः अनुभवास येअूं लागला आहे. सृष्टि अुन्मत्त होअून घमघमूं लागली तर आश्चर्य काय ? माझें हें म्हातारें झालेलें हृदय देखील आज पुनः नव मेघांच्या सघनतेकडे पाहून सजीवन होअून पुलकित होअूं लागलें आहे. कारण, आकाशामध्यें आषाढ पुनः अेकदां पसरलेला आहे.

विशाळ कुरणांतील तृणदलांवर पहा कशी ढगांची छाया राहून राहून नाचत आहे. हें सर्व पाहून माझा प्राण आरोळ्या ठोकीत आहे कीं 'तो येत आहे' 'पहा तो येत आहे' आणि त्याबरोबर आसपासची सृष्टिहि जणूं प्रतिध्वनि करीत गाअूं लागली आहे. 'खरेंच, तो येत आहे' 'तो येत आहे.'

पहा तो आला आणि डोळ्यांत भरला, धांवत धांवत हृदयांत शिरला. अरे हा आषाढ जो पुनः आला तो सगळ्या आकाशाला व्यापून बसला आहे."

# २६

वेळूची नळी सरळ असली आणि दोन्हीकडून मोकळी असली म्हणजे झालें, मागाल ते सुर ती देऊं शकते. भक्त नेहमीं स्वतः भगवंताच्या हातांतील मुरली होऊं अिच्छितो. मग ती मुरली गायकाचा प्राण आरपार वाहूं देते. त्याला गाऊं देते. पण स्वतः अलिप्तच रहाते. भक्त म्हणतो मला तसें नाहीं रहावयाचें. तेल भरलेल्या दिव्यांत वात ठेवल्याबरोबर ज्याप्रमाणें ती तेल शोषून घेते आणि तेलानें थबथब भरून जाते त्याचप्रमाणें आपल्या जीवनांत भगवंताचा स्नेह थबथबून भरून जावा हीच भक्ताची अेकमात्र अिच्छा असते. वात लहान आहे म्हणून कांहीं तेल तिचा अव्हेर करीत नाहीं. लहान तर लहान पण तिच्या जिवाप्रमाणें तिला तेल भरपूर मिळतेंच आणि तिला जर ज्योत पेटवावयाची असेल तर जेवढी ज्योत वातीला झेपेल तेवढी ज्योत पेटवत ठेवणें हें त्या स्नेहाचेंच -- तेलाचेंच काम. वातीकडे कुठूनहि पहा, त्यांत तेलच भरलेलें असेल. ज्योतीला कशीहि तपासा, तींत तेलच जळत असेल. वातींत अेकहि असें स्थान नाहीं कीं जेथें तेलाला पोहोंचतां येत नाहीं. कारण वात तेलासाठीं अंतर्बाह्य अुघडीच असते -- अनुकूलच असते.

अेअि मोर [1]साध जेन अे जीवनमाझे
तब आनन्द महा संगीते बाजे ।
तोमार आकाश, अुदार [2]आलोकधारा,
द्वार छोटो देखे फेरे ना जेन गो तारा —
छ्य ऋतु जेन सहज नृत्ये आसे
अन्तरे मोर नित्य नूतन साजे ।
तब आनन्द आमार अंगे मने
बाधा जेन नाहि पाय कोनो आवरणे ।
तब आनन्द परम दुःखे मम
ज्वले अुठे जेन पुण्य - आलोक - सम,
तब आनन्द दीनता चूर्ण करि
फुटे अुठे फेटे आमार सकल काजे ।

"माझी अेवढीच मागणी आहे, अेवढेंच साध्य आहे, फक्त अेकच आकांक्षा आहे ती ही कीं माझ्या या जीवनामध्यें तुझ्या आनंदाचें महासंगीत अखंड वाजत रहावें. तुझें हें विपुल आकाश, तुझी ही अुदार आणि अनवरत प्रकाशाची धारा यांनीं माझें द्वार लहान आहे असें पाहून तोंड फिरवूं नये, मला सोडून जाअूं नये, अेवढें कर. साही ऋतु जणुं काय सहज नृत्य करीत करीत नित्य नवीं नवीं रूपें धारण करीत, नवे नवे साज सजून माझ्या अंतःकरणांत प्रगट व्हावेत व त्यांनीं आपला अखंड रास चालवावा.

कोणच्याहि आवरणाची आडकाठी राहणार नाहीं अशा रीतीनें माझ्या अंगाला आणि मनाला तुझ्या आनंदाचा कोमल स्पर्श व्हावा आणि माझ्या दुःखांत देखील, परमदुःखांत देखील तुझ्याच आनंदानें, पुण्यप्रकाशाप्रमाणें पेट घ्यावा. आणि त्यानें, त्या तुझ्या आनंदानें माझी सर्व दीनता चूर्ण करून माझ्या सर्व कामांमध्यें पारिजात फुलावा, त्याप्रमाणें फुलून जावें. अेवढी अेकच गोष्ट मला साधावयाची आहे. अेवढी अेकच मागणी मी मागत आहें, हीच अेक वासना हृदयांत भरून अुरली आहे."

---

१. साध – अिच्छा. २. आलोक – प्रकाश.

# २७

'उगाच कशाला धडपड करतोस? सर्व कांहीं येथल्या येथेंच सोडून जावें लागणार. बरोबर कांहीं येणार नाहीं. ज्याला मी मी म्हणतोस तो देहदेखील बरोबर येणार नाहीं. सगेसोयरे येथेंच राहतील. घरदार, धनसंपत्ति सोडतांना तुला रडूं कोसळेल, पण बरोबर मात्र नेतां येणार नाहीं. म्हणून ही सगळी माया सोडून दे. कशाचीच आसक्ति ठेवूं नकोस. निष्कारण पसारा वाढविण्याचे भरीस पडूं नकोस. इहलोकाचा विचारच सोडून दे आणि परलोकाची तयारी कर.' — असा उपदेश आजवर आपण ऐकत आलों आहोंत. हा उपदेश मनावर ठसूं लागला म्हणजे केव्हां केव्हां वाटूं लागतें कीं, आपण या जगांत आलों हीच एक मोठी चूक झालेली आहे. अरे, आलों तें आलों; नि यांत गूंतूनहि गेलों! आतां या गुंतागुंतींतून कसें सुटावें? हाच काय तो खरा शहाणा प्रश्न आहे. सर्व प्रकारें उदासीन व्हावें, अलिप्त राहावें आणि सुटून जावें हीच काय ती खरी साधना असें मनाला वारंवार वाटूं लागतें.

पण कोण जाणें कां, ही भावना दृढपणें टिकतच नाहीं. माया–मोह जबरदस्त आहे म्हणून असें होत असेल असें आपण आजवर मानून चाललों. पण ही जी वैराग्यभावना म्हणून आपण स्वीकारली तिच्या मुळाशींच कांहीं चूक तर नसेल ना? संसार व्यर्थ आहे

हा सिद्धान्त खरा असेल पण वैराग्य किंवा जीवनाची शून्यता हेंच जीवनाचें खरें रहस्य आहे असेंहि पटत नाहीं.

वैराग्याचा सिद्धांतहि खरोखर पाहातां व्यर्थ आहे असेंहि नसेल कशावरून? हा संसार जसा पोकळ आहे तसें वैराग्यहि पोकळ असण्याचा संभव कमी नाहीं आणि म्हणूनच वैराग्य पुनः पुन्हा मनावर ठसून देखील टिकत नसावें.

या जगांत आलों आहोंत, जन्मभर कांहीं ना कांहीं मिळवीत असतों. हें सर्व चूक आहे असें म्हणण्यापेक्षां याचा कसा काय उपयोग करावा हें आपल्याला अजून समजलें नाहीं असें मानून, जुन्या चाकोरींतून जाण्याचें सोडून देऊन जीवनाचा आणि मरणाचा नव्यानें विचार कां करूं नये?

मेल्यानंतर सर्व कांहीं मागें टाकून जावयाचें आहे असें समजल्यानें जीवन शुद्ध आणि समृद्ध होतें का? जीवन कृतार्थ होतें का? जर तसें होत नसेल आणि केवळ वैफल्यच पदरीं पडत असेल तर आपल्या शोधाची दिशा बदललीच पाहिजे.

जन्मापासून मरणापर्यंत आपण जें कांहीं गोळा करतों तें सर्वच्या सर्व बरोबर न्यावें लागणार, यांतलें कांहीं अेक सुटणार नाहीं अशी जर खात्री झाली तर मनुष्य संग्रह करतांना चांगलाच विचार करील. पायीं प्रवासाला जातांना ज्याप्रमाणें मनुष्य बेताचेंच सामान बरोबर बाळगतो, ओझें वाढूं देत नाहीं, त्याप्रमाणें या जीवनांत देखील कचरा–संग्रहाचा कचरा गोळा करतां कामा नये. जें कांहीं सारभूत असेल, रहस्यमय असेल, आत्मवैभव वृद्धिंगत करणारें असेल तेंच बरोबर बाळगलें पाहिजे. विश्वस्वामीच्या या विशाल भांडारांत आल्यानंतर येथून करंटेपणानें रिकाम्या हातानें जावयाचें नाहीं. येथें जें घेऊं तें मिळणार तर आहेच. जशी पारख असेल तशींच रत्नें आपल्याला घेतां येतील. येथें कांचहि गोळा करतां येईल आणि रत्नेंहि गोळा करतां येतील. येथें पाचोळाहि भरला आहे आणि फुलेंहि बहरलीं आहेत. जशी अभिरुचि असेल तसें घ्यावें. घेण्यांतच जर चूक झाली असली तर वेळींच शहाणे होऊन जेथलें तिथेंच सोडून दिलें पाहिजे. या विश्वभांडारांतून — Universal Stores – मधून बाहेर पडतांना आपण पसंत केलेलें सर्व कांहीं आपल्याला स्वतः उचलून न्यावें लागणार म्हणून वेंचीव आणि उत्कृष्ट मालच घेतलेला बरा. तरच येथें आल्याचें सार्थक होईल. शिवाय येथून अधिकाधिक उपयोगी समृद्धि आपण गोळा केली

आहे असें समाधानहि बरोबर घेतां आलें पाहिजे. जीवनयात्रा सफळ करावयाची म्हणजे ही नवी साधना स्वीकारलीच पाहिजे.

के बले सब फेले जाबि
    मरण हाते धरबे जबे ।
जीबने तुमि जा नियेछिस
    मरणे सब निते हबे ।
एमि भरा भाण्डारे एसे
शून्य कि तुमि जाबि शेषे ।
नेबार मतो जा आछे तोर
    भालो करे ने तुमि तबे ।

आबर्जनार अनेक बोझा
    जमियेछिस जे निरबधि,
बेंचे जाबि, जाबार बेला
    क्षय करे सब जास रे जदि ।
एसेछि एइ पृथिबीते,
हेथाय हबे सेजे निते —
राजार बेशे चल रे हेसे
    मृत्युपारेर से उत्सबे ।

'मरण जेव्हां तुला हातांत धरील, पंज्यांत पकडील, तेव्हां तुला सर्व कांहीं सोडून जावें लागणार आहे' असें तुला कोणीं सांगितलें ? आयुष्यभर तूं जें कांहीं गोळा केलें असेल तें सर्व बाबारे, तुला बरोबर न्यावें लागणार आहे.

या भरलेल्या भाण्डारांत येऊन तूं काय रिकाम्या हातानें शून्यपणें परत जाणार आहेस ? नेण्याजोगें जें कांहीं तुजजवळ असेल – तूं गोळा केले असशील तें सर्व नीट बांधून बरोबर घेऊन चल.

टाळण्याजोग्या पुष्कळशा कचऱ्याचें ओझें जें तूं अखंड गोळा करीत आला आहेस, त्याची जायचे वेळीं होळी करून जावें लागेल तुला. या विशाल पृथ्वीवर तूं आला आहेस. येथें एखाद्या भिकाऱ्याप्रमाणें जें दिसेल तें गोळा करूं नकोस. येथें एखाद्या राजाप्रमाणें उत्तम समृद्धि गोळा करून स्वतःला सजवून जावयाचें आहे. अशी तयारी करून मृत्यूच्या पैलतीरीं जो मोठा उत्सव व्हावयाचा आहे त्याचेसाठीं तयार हो आणि हंसत चल. रिकाम्या हातानें जावें लागणार असें वेड्यासारखें समजूं नकोस.

# २८

मानपान, ऐषआराम, सुख-समृद्धि यांच्यायोगें जीवन कृतार्थ होऊं शकत नाहीं. हे माझ्या जीवा, जर तुला आपलें सार्थक व्हावें असें वाटत असेल तर सर्व कांहीं सोडून, हंसतमुखानें तुला रस्त्यावर आलें पाहिजे, आणि सर्वसामान्य लोकांत जे अपमानित आहेत — पददलित आहेत त्यांच्याशीं अेकरूप झालें पाहिजे. त्यांना जें दुःख सहन करावें लागतें तें तुला राजीखुशीनें आपल्यावर ओढवून घेतलें पाहिजे. कांट्यांचा हार गळ्यांत घातला पाहिजे. जेथें दुःखी लोकांना मुकाट्यानें रहावें लागतें त्या धुळींत तूं आपलें डोकें खुपसून घेतलें पाहिजेस आणि त्यागांत जें सुख आहे, सर्वस्व सोडून दिल्यानें जी कांहीं योग्यता प्राप्त होते त्यांतील आनंद चाखला पाहिजेस.

स्वेच्छा-स्वीकृत गरिबी आणि दलित लोकांशीं साधलेलें हृदयाचें ऐक्य हीच सर्वांत मोठी साधना आहे. या साधनेच्या योगानें तुझें हृदय परिपुष्ट होईल, जीवन समृद्ध होईल आणि तुला अुच्च जीवनाचा खरा आनंद प्राप्त होईल. त्यागाचा अुपभोग कर असें जें ऋषींनीं सांगितलें आणि जें कांहीं आहे तें ईश्वरानें भरलें आहे असें पहा, म्हणून जी साधना त्यांनीं सांगितली त्यांतच जीवनाचा खरा आनंदरस भरलेला आहे. सर्वांच्या सुखासाठीं, सर्वांच्या आनंदासाठीं स्वतः शून्यरूप होणें आणि चूर्ण होअून स्वतःचा बलि देणें यांतच खरें सार्थक आहे.

मानेर आसन, आरामशयन
नय तो तोमार तरे ।
सब छेड़े आज खुशि हये
चलो पथेर, परे ।
असो, बन्धु, तोमरा सबे
अेकसाथे सब बाहिर हबे,
आजके जात्रा करब मोरा
अमानितेर घरे ।

निन्दा परब भूषण क'रे
काँटार कण्ठहार;
माथाय करे तुले लब
अपमानेर भार ।
दु:खीर शेष आलय जेथा
सेअि धुलाते लुटाअि माथा,
त्यागेर शून्यपात्रटि निअि
आनन्दरस भ'रे ।

"हे माझ्या जीवा, मानाचें उच्चासन आणि आरामाचें मऊ शयन हीं तुझ्यासाठीं नाहींत. या सर्व सुखसमृद्धीच्या गोष्टी सोडून देऊन अगदीं प्रसन्नतेनें रस्त्यावर येऊन उभा रहा आणि गर्जना करून म्हण कीं, हे बांधवहो, तुम्ही सर्व मजकडे या, आपण सर्व मिळून घराबाहेर पडूंया. आज आपण अपमानित लोकांच्या क्षुद्र पण पवित्र घराची यात्रा करूं या.

निंदेला भूषण समजून आपण धारण करूं. कांट्यांचा कंठहार बनवूं आणि अपमानाचा सर्व भार डोक्यावर घेऊन वहन करूं. दु:खी लोकांचें जें अंतिम घर आहे त्या धुळीमध्यें आपण आपले डोकें माखून घेऊं आणि त्यागाच्या शून्य

पात्रामध्यें आनन्दरस भरुन भरून पिऊन घेऊं. पात्र अगदीं रिकामें केल्यावांचून आनन्दरस त्यांत मावतच नाहीं. सर्वस्वाचा त्याग केला म्हणजे मात्र आनन्दरस कसा अगदीं कांठापर्यन्त भरला जातो आणि मग तो आपल्याला आकंठ पितां येतो. जे त्यागवीर असतील त्यांनाच हा रसस्वाद मिळणार आहे."

# २९

ऐका यहूदी पैगंबराचें वचन आहे कीं आपण जेव्हां जन्माला येतों तेव्हां अगदीं अुघडे नागडे असतों. आणि जेव्हां या जगांतील वास्तव्य संपवून आपण परत जातों तेव्हांहि या पार्थिव जगांतील कांहींच बरोबर घेअून जात नाहीं. येतांना निदान शरीर तरी बरोबर घेअून येतों, पण जातांना तेंहि येथें ठेवूनच जावयाचें असतें.

Naked we came into this world and naked we return. Blessed be the name of the Lord.

पण मधल्याकाळीं आपण केवढा मोठा व्याप अुत्पन्न करतों आणि कितीतरी पराक्रमाची हांव बाळगतों. मोठ्या हौशेनें आणि महत्त्वाकांक्षेनें आपण अेक भली मोठी सृष्टि निर्माण करतों, तिचा पसारा वाढवितों आणि शेवटीं स्वप्न विरावें त्याप्रमाणें सर्व कांहीं आटपतें घेअून पुनः होतों तसे असहाय – अेकाकी होअून जातों.

म्हणूनच वेदान्ती म्हणतात – जें आदीं नाहीं, अंतीं नाहीं तें मध्यें असलें काय – नसलें काय सारखेंच.

पण यांत मोठा फरक आहे. बाळपणीं आपण कितीहि अज्ञानी आणि असहाय असलों तरी सुप्तरूपानें सर्व प्रकारची शक्ति आपल्यामध्यें स्फुरत असते. जन्माला येतों ते अज्ञान, दुर्बळता आणि असहायता घेअून येतों. पण चैतन्यशक्ति–प्राणशक्ति, अुमेद, अुत्साह, हिंमत हीं हळूहळू वाढत असतात. कारण त्यांचा अंकुर असतोच तसा जबरदस्त.

तेंच आयुष्य यथाकाळीं पुरें केलें म्हणजे ती शक्ति सर्व क्षीण होते. अुत्साह मंद पडतो, हिंमत ओसरते, श्रद्धा विरक्त होते आणि पराक्रमाचे ठिकाणीं अुपराम, शान्ति आणि समाधान येअून बसतात. बाळपणचीं वर्धमान शक्ति जरी आतां क्षीण झाली असली तरी ज्ञान, अनुभव आणि आकलन यांचा सांठा वाढलेला असतो. आतां चित्तामध्यें गोंधळ नसतो. जीवनाचें रहस्य समजून आलें आहे, विग्रह संपला आहे. सर्वांशीं शान्ति आणि प्रेम यांचाच संबंध स्थापित झाला आहे. लहाणपणची असहायता असह्य होती पण ती भविष्याच्या अुमेदीमुळें मनाला खुपत नव्हती. आतांची असहायता स्थायी जरी असली तरी पुरुषार्थ पूर्ण झाल्यामुळें आणि सर्वत्र आत्मीयता स्थापित झाल्यामुळें आतांच्या असहायतेचें कांहींच वाटत नाहीं. आतां केवळ शान्ति, अवैर आणि प्रसन्नता हींच अुरलीं आहेत.

देवाच्या घरून जसें आलों तसेंच त्याच्या घरीं परत जात आहोंत. देवानें जसें पाठविलें तसेंच तो परत बोलावीत आहे.

फक्त पूर्वी नव्हती ती शान्ति आणि प्रसन्नता या मात्र मिळविल्या. बाकी सर्व जें कांहीं येथें गोळा केलें तें येथेंच सोडून दिलें. जन्मभर लढलों आणि त्यांतून बोध काय घेतला – लढाअी ही व्यर्थ आहे. मैत्री, करुणा, मुदिता आणि अुपेक्षा* यांतच खरें आर्यत्व आहे. यांतच जीवनसाफल्य आहे. हीच कायती व्यक्तिगत जीवनाची चतुर्विध पुरुषार्थाची खरी कमाअी आहे.

सामाजिक जीवन देखील सरते शेवटीं हाच अनुभव कमावून कृतार्थ होणार आहे.

---

* योगयांच्या या जगासंबंधींच्या या चार भावना आहेत. याला बौद्ध साहित्यांत ब्रह्मविहार म्हणतात — सर्वांशीं मैत्रीनें वागावें, दुःखिताविषयीं करुणा असावी, दुसऱ्यांचें कल्याण झालेलें पाहून आनंदावें आणि दुष्टांप्रति शत्रुत्व नव्हे पण मात्र अुपेक्षावृत्ति असावी.

प्रभुगृह हते आसिले जेदिन
वीरेर दल
सेदिन कोथाय छिल जे लुकानो
विपुल बल ।
कोथाय बर्म, अस्त्र कोथाय,
क्षीण दरिद्र अति असहाय
चारि दिक हते असेछे आघात
अनर्गल —
प्रभुगृह हते आसिले जेदिन
वीरेर दल ।
प्रभुगृहमाझे फिरिले जे दिन
वीरेर दल
सेदिन कोथाय लुकालो आबार
विपुल बल ।
धनु शर असि कोथा गेल खसि,
शान्तिर हासि अुठिल बिकशि,
चले गेले राखि सारा जीवनेर
सकल फल —
प्रभुगृहमाझे फिरिले जेदिन
वीरेर दल ।

"जेव्हां ते सर्व सुभट योद्धे स्वामीच्या दरबारगढींतून बाहेर निघाले तेव्हां त्यांची ती सर्व विपुल शक्ति कोठें लपलेली होती ? चिलखत कुठें होतें आणि शस्त्रें कुठें होतीं ? निघाले तेव्हां ते कसे क्षीण, दरिद्री आणि असहाय दिसत होते, आणि चारी बाजूनें त्यांचेवर शस्त्रास्त्रांचा भडिमार होत होता. प्रभूच्या गढींतून जेव्हां सैनिक बाहेर निघाले तेव्हां त्यांची अशी स्थिति होती.

आणि जेव्हां युद्ध आटोपून, सर्व प्रकारचा भीषण पराक्रम करून आणि महागांतला महाग विजय मिळवून प्रभुगृहीं परत आले तेव्हां त्यांनीं युद्धांत दाखविलेलें, त्यांचें तें जगाला चकित करणारें, सामर्थ्य कुठें पुन्हा लुप्त झालें? त्यांचे ते धनुष्यबाण आणि त्यांची ती तलवार आतां कुठें गळून पडली होती? आतां त्यांच्या चेहऱ्यावर वीरश्री नसून फक्त शान्तीची आणि स्नेहाची प्रसन्नताच आहे. सबंध जन्मभर पराक्रम करून त्यांनीं जें कांहीं मिळविलें तें सर्व आतां हातांतून अर्थात् जीवनांतून गळून पडलें आहे. ज्या दिवशीं ते योद्धे मालकाच्या गढींत (घरीं) परत आले तेव्हां त्यांच्या हातांत कांहींच उरलेलें नव्हतें. जसे सडे गेले तसेच ते सडे परत आले. फक्त त्यांच्या डोळ्यांत स्नेह भरलेला होता, त्यांच्या चेहऱ्यावर शान्तीची प्रसन्नता होती आणि कृतार्थ होऊन प्रभुचरणीं ते स्थान शोधीत होते. ते प्रवृत्त होऊन बाहेर निघाले आणि निवृत्त होऊन प्रभुचरणीं परत आले, पण जीवन मात्र कृतार्थ झालें."

# ३०

दुधांत मिठाचा खडा पडला म्हणजे जसें तें दूध नासून जातें त्याचप्रमाणें जीवनांत जर अेखादी अमंगल वस्तु शिरली तर सगळें जीवन व्यर्थ होअून जातें, कितीहि पुरुषार्थ करा शेवटीं हातांत फळ कांहीं येत नाहीं अशी फसगत होते आणि जीवनाचा विरस होतो. तें अमंगल तत्त्व कितीहि क्षुद्र का असेना, आपल्याला दूर करतां येत नाहीं आणि तें असल्यानें जीवनांत कोणचीच गोष्ट सारखी साधत नाहीं. दुर्दैव्याच्या हातचे फासे जसे कधींहि सारखे पडत नाहींत त्याचप्रमाणें अशा मनुष्याचा सर्व पुरुषार्थ व्यर्थ होअून फसगत झाल्याचीच वेदना अुरामध्यें अुरते. संगीतप्रेमी कवीला अशा स्थितीला अुपमा देण्यासाठीं वीणेचें स्मरण होणें स्वाभाविक आहे. म्हणून कवि म्हणतो —

[1]जडिये गेछे [2]सरू [3]मोटा
दुटो तारे,
जीवनवीणा ठिक सुरे ताअि
बाजे ना रे ।

१. जडिये गेछे — गुंतल्या आहेत. २. सरू — बारीक. ३. मोटा — जाड.

एअि बेसुरो जटिलताय
परान आमार मरे व्यथाय,
हठात् आमार गान थेमे जाय
बारे बारे ।
जीबनबीणा ठिक सुरे आर
बाजे ना रे ।
एअि बेदना बअिते आमि
पारि ना जे,
तोमार सभार पथे असे
मरि लाजे ।
तोमार जारा गुणी आछे
बसते नारि ताँदेर[४] काछे,
दाँड़िये थाकि सबार पाछे
बाहिर–द्वारे ।
जीबनबीणा ठिक सुरे आर
बाजे नारे ।

"माझ्या जीवनवीणेंतील जाड आणि बारीक अशा दोन तारा कशानें तरी गुरफटून गेल्या आहेत, गुंतून एक झाल्या आहेत. त्यामुळें माझी ही जीवनवीणा ठीक सुरेल वाजत नाहीं. या बेसूर जटिलतेमुळें माझा प्राण व्यथेनें जसा कांहीं मरत आहे आणि माझें गायन पुनः पुनः एकाएकीं थांबून जातें, कारण माझी जीवनवीणाच ठीक सुरेलपणें वाजत नाहीं.

माझी वीणा बरोबर साथ देत नाहीं. ही वेदना मला कांहीं केल्या सहन होत नाहीं, म्हणून तुझ्या सभेच्या, तुझ्या दरबाराच्या वाटेवर येतांनासुद्धां मला

---

४. तादेर काछे – त्यांच्याजवळ.

मरणप्राय लाज वाटते. तुझ्या दरबारांतील जे इतर गुणी गायक-वादक आहेत त्यांच्याबरोबर मला बसतां येत नाहीं आणि म्हणूनच लाजेनें सर्वांच्या मागें दरवाज्याच्या बाहेर मी आपला उभा आहें. माझी जीवनवीणा ठीक सुरानें वाजत नाहीं त्याला मी काय करूं ?

प्रभो, आतां माझें काय होईल ? मीं कशासाठीं जगावें ? माझी अशी फसगत काय म्हणून झाली ? माझ्या जीवनवीणेनें अगदीं आयत्यावेळीं मला दगा दिला आणि मला लाचार केलें."

जड़िये गेछे सरु मोटा ........................................ १३

# ३१

पूर्णामध्यें अंशाचा अंतर्भाव होतो ही गोष्ट कोणीहि कबूल करील. पण विश्वाची लीला अशी कांहीं विचित्र आहे कीं, अंशामध्यें देखील पूर्ण साठवलेलें दिसून येतें. झाडाची अेखादी फांदी तोडावी आणि जमिनींत पेरावी तर हळूहळू त्यांतूनच अेक सबंध वृक्ष तयार होतो. फांदीच्या त्या तुकड्यांतूनच हळूहळू पाळेंमुळें अुत्पन्न होतात. फांदीच्या प्रत्येक डोळ्यांतून अेक अेक अंकुर फुटूं लागतो. त्या अंकुराच्या फांद्या होतात आणि यथाकाळीं तो वृक्ष फुलांफळांनीं लादला जातो. फांदीचा तुकडा, जो अंश होता, त्यांतूनच संपूर्ण झाड प्रकट झालें.

मनुष्याच्या साधनेचेंहि असेंच आहे.

अेखादा वैयाकरण शब्दतत्त्वाच्या मार्गे लागतो. भूक-तहान, सगे-सोयरे, स्त्री-पुत्र सर्वांना विसरून व्याकरणाचें रहस्य शोधावयास लागतो. पण तेंच रहस्य त्याला हळूहळू ज्ञानाच्या व्यापक क्षेत्राकडे घेअून जातें. आणि जर त्याची ती ज्ञानोपासना अुत्कट, निष्ठायुक्त आणि संपूर्ण झाली तर ज्ञानाबरोबर त्याला जीवन-रहस्यहि अुमगूं लागतें. अेकाच विषयाचें अनुशीलन करतां करतां सर्वच ज्ञानाचा तो अधिकारी बनतो. 'अेक साधे सब सधे' या न्यायानें अेकांगी साधनेंतून त्याची सर्वांगीण अुन्नति होते.

संगीताच्या मागें लागलेला अेखादा वेडा नादब्रह्माची अुपासना करूं लागतो आणि हळूहळू त्याचे चारहि पुरुषार्थ सिद्ध होअून तो मोक्षाचा अधिकारी होतो.

कोणत्याहि देवतेची अुपासना करा, जर तींत निष्ठा आणि चिकाटी असली तर ती अुपासना आणि ती देवता त्याला परमात्म्यापर्यन्त घेअून जातातच. 'सर्व–देव–नमस्कारः केशवं प्रति गच्छति ।' कुठूनहि कसलीहि अुपासना चालवा शेवटीं ती सर्वेश्वर संपूर्णाकडेच घेअून जाणार.

कवीला काव्याचा छंद लागला. काव्य म्हणजे साहित्य, संगीत आणि कला यांची सुभग त्रिवेणी. मनांतून जो भाव जागला—अुठला त्याला व्यक्त करण्यासाठीं जसे विपुलार्थवाही आणि औचित्यपूर्ण शब्द शोधावे लागतात, त्याचप्रमाणें योग्य राग, ताल आणि सूरहि धरून आणावे लागतात; आणि भाषा, स्वर आणि लय सर्व कांहीं योग्य प्रमाणांत मांडून कलाविधानहि साधावयाचें असतें.

फक्त कवितादेवतेची अुपासना करावयास गेला पण ती देवता आपले पंचायतन घेअून आली. साहित्य-सरस्वति, नाद-ब्रह्म, कला-शारदा, ज्ञानदेव-गणपति आणि हृदयेश्वरी—जीवनानुभूति – सर्वांचीच त्याला अुपासना करावी लागली. गीतांतून जग सांपडलें अेवढेंच नव्हे तर जगत्-स्वामी सर्वेश्वराच्या चरणीं पोंचण्याचा मार्गहि सांपडला. कोठूनहि चला शेवटीं विश्वस्वामी अंतरात्म्याकडेच आपण पोहोंचतों.

गान दिये जे तोमाय खुँजि
बाहिर-मने
चिरदिवस मोर जीवने ।
नियॆ गेछे गान आमारे
घरे घरे द्वारे द्वारे
गान दिये हात बुलिये बेड़ाअि
अेअि भुवने ।

कत शेखा सेजि शेखालो,
कत गोपन पथ देखालो,
चिनिये दिल कत तारा
हृद्गगने ।
विचित्र सुखदुखेर देशे
रहस्यलोक घुरिये शेषे
सन्ध्याबेलाय निये अल
कोन् भवने ।

कवि म्हणतो –

"गायनाच्याद्वारा मी बाह्य जगांत आणि हृदयाकाशांत जीवनभर तुला अखंड शोधत आहें. माझें गाणें मला घरोघरीं आणि दारोदारीं घेऊन गेलें. माझ्या गायनाच्याद्वाराच मीं हें सकल विश्व कुरवाळलें. या माझ्या गायनानें मला कितीतरी पाठ पढविले आहेत. कितीतरी बोध गळ्यांत उतरविला आहे, कितीतरी गूढ-पथ दाखविले आहेत आणि हृदयगगनांत उगवणाऱ्या कितीतरी दिव्य तारकांना ओळखण्यास शिकविलें आहे. अशा रीतीनें गायनाच्या सहवासांत सुखदुःखानें भरलेल्या या विचित्र जगाचा परिचय करीत करीत आणि त्याचीं सर्व रहस्यें अनेक प्रकारें उलगडीत या जीवनसंध्येपर्यन्त येऊन ठेपलों आहें आणि पहातों तों त्या विश्वेश्वराच्या अद्भुत दिव्य प्रासादाच्या प्रत्यक्ष दारींच माझ्या गायनानें मला आणून पोंचविलें आहे.

या गायनाचा मी उतराओ कसा होऊं ? या अेकट्या गायनानें मला सर्व कांहीं मिळवून दिलें. आत्मपरिचय आणि भगवत्-कृपा दोन्हीहि मला या गायनानें साधून दिली आणि माझें जीवन कृतार्थ आणि धन्य केलें."

ऐश्वर्यस्य समग्रस्य धर्मस्य यशसः श्रियः।
ज्ञानवैराग्ययोश्चेति षण्णां भग इति स्मृतिः ॥

ऐश्वर्य, धर्म, यश, श्री, ज्ञान आणि वैराग्य हे षड्गुण ते भग व यांनीं जो अलंकृत तो भगवान.

# ३२

**स**काळ झाली म्हणजे मुलें निजून अुठून ताजीतवानीं होअून न्याहारी करतांच खेळावयास जातात. संध्याकाळ झाली म्हणजे थकून भागून घरीं परत येतात. सकाळीं बाहेर निघतांना त्यांना खेळ आठवतो, संध्याकाळीं परत फिरतांना आअी आठवते. मनसोक्त खेळून थकल्यामुळें त्यांना झोंपहि गोड येते. झोंप म्हणजे खेळण्याच्या श्रमाचें सार्थक, असेंच त्यांना वाटतें.

मनुष्य बाहेर निघतो तो परत येण्यासाठींच, देवाला विसरतो तें देखील पुनः अुत्कट भक्तीनें देवाकडे धांव घेण्यासाठींच. खेळून थकल्यानंतर मुलाला आअीसंबंधानें जो ओढा वाटतो तोच ओढा प्रत्येक जीवाला जीवन भाररूप झालें म्हणजे भगवंताविषयीं वाटूं लागतो. या ओढ्यालाच आपण नमस्कार असें म्हणतों.

दुकानदार पोतीं भरून भरून माल घेअून येतो आणि यात्रेच्या मेळ्यांत दुकान पसरतो. दिवसभर त्याचा व्यापार चालतो. गिऱ्हाअीक येतात आणि त्याच्या मालाची तारीफ करून तो विकत घेतात. संध्याकाळ झाली— बाजार संपला आणि मालहि खपून गेला म्हणजे दुकानदार रिकामीं पोतीं गुंडाळून घेतो. हातीं आलेले पैसे गांवच्या सावकाराकडे जमा करतो आणि त्याचेकडून हुंडी घेअून कृतार्थपणें घरीं जाण्यासाठीं तयार

होतो. जीवनसंध्येच्या वेळीं देखील मनुष्याचें असेंच होतें. मनुष्य आपल्या सबंध आयुष्याचा आढावा काढतो — आपण काय काय केलें, कशासाठीं केलें, त्यांतून निष्पन्न काय झालें, पदरीं काय पडलें हें तो पाहूं लागला म्हणजे त्याची खात्री होते कीं, आपण कळत नकळत, बरीवाअीट अीश्वरी साक्षात्काराचीच साधना केली आहे. आपली सर्व प्रवृत्ति त्यालाच जवळ करण्यासाठीं होती. आणि आतां तर अितर सर्व रस विरून जाअून फक्त याच्या चरणीं पोंचण्याचीच तळमळ लागलेली आहे. ही तळमळ म्हणजे भगवंताला घातलेला नमस्कार.

हा नमस्कार म्हणजे नेहमींचा औपचारिक नमस्कार नव्हे. सम्राट जनकानें गुरुप्रसादानें शंका निवृत्त झाल्यानंतर याज्ञवल्क्याला म्हटलें, गुरुजी, मी आतां कृतार्थ झालों, माझें हें सगळें राज्य तर आपल्या चरणीं वाहतोंच पण त्याखेरीज स्वतःला देखील दास म्हणून सेवेसाठीं आपल्याला अर्पण करतों. "माम् चैव दास्याय". त्याचप्रमाणें समस्त जीवन आणि श्रद्धा सर्व कांहीं अेकत्र करून भगवंताला अर्पण करण्यासाठीं घातलेला तो हा नमस्कार असतो. यांत जीवनसर्वस्व येअून जातें आणि मागें कांहींच अुरत नाहीं.

अेकटि नमस्कारे, प्रभु,
अेकटि नमस्कारे
सकल देह लुटिये पडुक
तोमार अे संसारे ।
घन श्रावण-मेघेर मतो
रसेर भारे नम्र नत
अेकटि नमस्कारे, प्रभु,
अेकटि नमस्कारे
समस्त मन पड़िया थाक्
तव भवन-द्वारे ।

नाना सुरेर आकुल धारा
मिलिये दिये आत्महारा

अेकटि नमस्कारे, प्रभु,
अेकटि नमस्कारे
समस्त गान समाप्त होक
नीरव पारावारे ।
हंस जेमन मानस-यात्री,
तेमनि सारा दिवस-रात्रि
अेकटि नमस्कारे, प्रभु,
अेकटि नमस्कारे
समस्त प्राण अुड़े चलुक
महामरण-पारे ।

"हे जीवनप्रभो, मी तुला असा अेकच नमस्कार घालावा कीं, ज्या नमस्कारासरशीं या संसाररूपी तुझ्या चरणाच्या ठायीं माझ्या समस्त शरीरानें लोटांगण घालावें.

श्रावणाच्या कृष्ण मेघाप्रमाणें जीवन-भारानें नम्र – नत होअून तुझ्या प्रासादाच्या द्वारीं माझें समस्त मन अेकाच नमस्कारांत कोसळून पडावें.

आजवर गायिलेल्या माझ्या असंख्य गायनांचे सूर व्याकुल धारांनीं अेकत्र होअून त्यांनीं स्वतःला विसरावें आणि तुला घातल्या जाणाऱ्या त्या अेका नमस्काराबरोबर माझें समस्त गान मौन-महासागरांत विलीन होअून जावें. आणि मानससरोवराचे यात्री हंस ज्याप्रमाणें अुत्तरेकडे – हिमालयाचे पलीकडे पोंचण्यासाठीं भराऱ्या मारीत असतात, त्याप्रमाणें अेका नमस्कारांत माझे समस्त प्राण दिवसरात्र यात्रा करीत महामृत्यूच्या पैलतीराला जाअून पोंचूं देत.

या अेका शेवटच्या नमस्कारांत मला पूर्णपणें कृतार्थ होअूं दे. पुनः दुसरा नमस्कार घालण्याचें अुरूंच नये. अेवढेंच दान मला दे."

# ३३

प्रभूनें स्वमुखानेंच सांगितलें आहे कीं माझ्या विभूतींच्या विस्ताराला अंतच नाहीं – ' नास्त्यन्तो विस्तरस्य मे । ' आपण त्याला शोधावयास गेलों तर आपला जन्म संपेल पण शोध कांहीं संपणार नाहीं. अेका जीवनाचा अनुभव घेअून थकलों तर आपल्या डोळ्यांपुढें दुसऱ्या जीवनाचा नवा विस्तार खडा होतो आणि अशा रीतीनें नवीन नवीन जीवनाची नवी नवी विभूति आपण पहात जातों. हीं सर्व चित्रें दाखविणारा तो अेकच आहे आणि अनुभव करून जन्मोजन्मीं आनन्दविभोर होणारे आपणहि अेकच आहोंत. या अैक्य–सूत्रानें अनन्त जन्मांची अनुभूति आपण अेकत्र बांधूं शकतों. पण आपला शोध कांहीं संपतच नाहीं.

प्रभु ज्या अर्थी अनंत आहे त्याअर्थी त्याच्या विभूतींना अन्त कुठून असणार? म्हणूनच जेव्हां पहावें तेव्हां त्याची नवनवोन्मेषशालिनी लीला आपले नवीन नवीन प्रकार दाखवीतच असते.

हें जरी मीं ओळखलें तरी प्रभु पुनः कोणचें रूप धारण करून माझ्या रस्त्यावर हसत येअून अुभा राहील आणि मला हाताशीं धरून जवळ करील हें सांगतां येत नाहीं; पण त्याला पहातांच माझ्या प्राणरूपी वीणेमध्यें नवीन भावनेचा घोर लागेल यांत मात्र शंका नाहीं. तुला शोधत असतां माझा तो शोध कधींच संपणार नाहीं

तोमाय खोंजा शेष हबे ना मोर
जबे आमार जनम हबे [2]भोर ।
चले जाब नवजीवनलोके,
नूतन देखा जागबे आमार [3]चोखे,
नबीन हये नूतन से आलोके
परब तब नबमिलन-डोर ।
तोमाय खोंजा शेष हबे ना मोर
तोमार अन्त नाअि गो अन्त नाअि,
बारे बारे नूतन लीला ताअि ।
आबार तुमि जानि ने कोन् वेशे
पथेर माझे दाँड़ाबे, नाथ, असे—
आमार अे हात धरबे काछे असे,
लागबे प्राणे नूतन भावेर घोर ।
तोमाय खोंजा शेष हबे ना मोर ।

१२५८५

" माझें एक जीवन जेव्हां पूर्ण होईल आणि दुसऱ्या जन्माच्या पहांटेंत मी पोंचेन तेव्हां देखील मीं चालविलेला तुझा शोध पूर्ण होणार नाहीं. जेव्हां मी नवजीवनाच्या नवीन लोकांत प्रवेश करीन तेव्हां माझ्या डोळ्यांमध्यें नवीं नवीं दृश्यें जागृत होतील. त्यावेळीं त्या नवीन प्रकाशांत सर्व कांहीं नवीन रूप धारण करेल आणि नवमीलनाच्या सूत्रानें मी तें सर्व नवीन दृश्यजात कंठहाराप्रमाणें धारण करीन. पण मीं चालविलेला तुझा शोध मात्र तेथें संपणार नाहीं.

अनंता, तुला अन्त नाहीं, खरोखर तुला अंत नाहीं. म्हणूनच तुझी लीला नित्यनूतन होऊन पुनः पुनः प्रगट होते. आतां पुनः तूं कोणच्या वेषानें रस्त्याच्या मध्यें हसत हसत अुभा राहशील आणि जवळ येऊन माझा हात धरशील हें मला ठाऊक नाहीं. पण त्यावेळीं माझ्या प्राणाला नूतन भावाचा घोर लागेल यांत शंका नाहीं. पण माझा तुझ्याविषयींचा शोध मात्र कधींच संपणार नांहीं."

---

१. खोंजा – शोध. २. भोर – पहांट. ३. चोखे – डोळ्यांना.



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ........ दि: ........

## ३४

अनेक भाषांमध्यें 'आत्मा' शब्द स्त्रीलिंगी आहे. फारशी रूह, ग्रीक स्यूकि ( Psychic ), इंग्रजी सोल ( Soul ) हे शब्द तर स्त्रीलिंगी आहेतच. पण रूहच्या नादाला लागून हिंदीमध्यें आत्मा शब्दहि स्त्रीलिंगी झाला आहे. आपल्या अिकडे वैष्णव लोकांनीं आत्म्यालाच श्रीकृष्णाच्या विरहानें झुरणाऱ्या गोपीचें रूप दिलें आहे.

आत्म्याला स्त्रीलिंगी कां बनविलें ? स्त्री-स्वभावामध्यें जें कांहीं उत्कृष्ट आहे तें सर्व आत्म्याच्या गुणांमध्यें सांपडत असतें. निष्ठा, भक्ति, सहनशक्ति, धीर आणि स्वात्मार्पण हे सर्व स्त्रीजातीचे उत्कृष्ट गुण आहेत. तेच आपल्याला आत्मगुण म्हणून ओळखतां येतात. यांपैकीं निष्ठारूपी जो गुण आहे त्याच्यामुळें एक प्रकारची अलिप्तता येत असते; त्याची गोडी आणि त्याचें माहात्म्य समजलें पाहिजे.

एखादी कुमारिका किंवा विधवा जगाच्या रहाटीमध्यें वावरत राहील; परंतु ती जगाला अमुक मर्यादेच्या पुढें स्वत:जवळ येऊं देत नाहीं. जगानें स्वत:ची पायरी ओळखूनच तिच्याशीं वागलें पाहिजे. या अलिप्ततेमध्येंच तिचें पावित्र्य असतें. या पावित्र्यामुळेंच तिच्या प्रेमामध्यें खोलपणा उत्पन्न होऊं शकतो. या अलिप्ततेमुळेंच तिच्या आत्मार्पणास खरी किंमत येते. जी कुमारी सर्वसुलभ आहे, प्रत्येकाला आपल्यामागें लागूं देते किंवा

प्रत्येकाच्या मागें लागते; जिला कुणीहि प्राप्त करावी; तिला वेश्या म्हणतात. मग ती कितीहि उच्च कुळांतील असो, कितीहि गोड स्वभावाची असो आणि कितीहि संस्कारी असो.

पण जिनें स्वत:चें हृदय-सर्वस्व विशिष्ट व्यक्तीलाच अर्पण करण्यासाठीं पवित्र ठेविलें आहे, जिनें जगाशीं गोडपणें वागून देखील जगाला दूर ठेविलें आहे आणि जी फक्त आपल्या हृदयस्वामीसाठींच सुलभ आहे तिचें जीवन पवित्र तर असतेंच; पण तिच्या जीवनामध्यें सर्व प्रकारची खोली, सर्व प्रकारची तृप्ति आणि सर्व प्रकारची अुत्तुंग महति प्रगट होते. आत्म्याचा मुख्य गुण म्हणजे त्याची गंभीरता – खोली हा होय. महासागराची अगाधता पवित्र आत्म्यांतच असूं शकते. कितीहि खोल जा तरीहि त्याचा तळ सांपडत नाहीं; खोल, खोल, खोल जा; त्याचा अंत मिळत नाहीं. हेंच सागराचें सागरत्व आहे, ज्या आत्म्यामध्यें पावित्र्य आहे, अेकाग्रता आहे, एकनिष्ठा आहे त्या आत्म्यामध्यें हे सर्व गुण प्रगट होऊं शकतात.

ही एकनिष्ठा म्हणजे जगाचा बहिष्कार नव्हे, जगाचा तिरस्कार नव्हे. जगांत असावें, सामान्यपणें जगाच्या उपयोगीं पडावें, जगाच्या प्रसन्नतेंत भर घालावी; पण हृदयाची निष्ठा? ती फक्त हृदयस्वामीलाच अर्पण करावी. 'त्याच्यासाठींच स्वत:चें जीवन आहे, त्याच्यासाठींच सर्व कांहीं आहे, त्याच्या संतोषांतच जीवनाचें सार्थक आहे' या वृत्तीनेंच गूढातिगूढ भावनांचा साक्षात्कार होतो. मग जीवन-समृद्धीला अंत-पार रहात नाहीं. एकनिष्ठेनें जसें स्त्रियांनीं आपलें जीवन समृद्ध केलें आहे तसेंच आत्म्यानें जगांत रहात असून देखील ओश्वरनिष्ठा एकाग्रतेनें संभाळली पाहिजे. प्रत्येकानें वास घेतलेलें फूल जसें आपण पुजेंत वापरीत नाहीं तसें प्रत्येकाच्या मागें धांवणारें जीवन हृदयस्वामीला दिलें तरी पोंचत नाहीं. अेवढ्यासाठींच तें अलिप्तपणें सांभाळावयाचें असतें. हीच खरी जीवनसाधना आहे. ही जी वृत्ति जीवनामध्यें स्त्रियांना सहज असते तीच आत्म्याला साधक म्हणून कमवावी लागते. याचसाठीं आत्म्याला स्त्रीलिंगी गणलें आहे – गोपी बनविलें आहे.

आत्मा ओश्वराचें ध्यान करतो आणि जीवनाची सेवा करतो. यामुळें त्याचीहि अुन्नति होते आणि जीवनहि कृतार्थ होतें. पण जोंवर ओश्वराचें दर्शन झालें नाहीं तोंवर आत्मा आपला बुरखा बाजूला सारीत नाहीं. जगाच्या वांट्याला पहाट झाली असेल, जग अंध:कारांतून मुक्त झालें असेल, पण जोंवर भगवद्दर्शनाचा क्षण नजीक आला नाहीं

तोंवर आत्मा आपला बुरखा कायमच ठेवणार. ती धन्य घडी आली म्हणजे अेकाच अंतिम दानामध्यें आपलें सर्वस्व त्याच्या चरणीं वहावयाचें असते, अेकाच अंतिम गानांत आत्मनिवेदन करावयाचें असतें. जगानें तऱ्हातऱ्हांनीं भुलवून पाहिलें, झुलवून पाहिलें, विनवून पाहिलें, पण आत्म्यानें दाद दिली नाहीं; आणि म्हणूनच भगवंताला आपण होऊन त्याचा-तिचा स्वीकार करावासा वाटलें. जीवनामध्यें ज्या कांहीं घडामोडी झाल्या, जीं कांहीं स्थित्यंतरें झालीं तीं सर्व या आत्म्याच्या प्रभावानेंच. जीवनाच्या रोमरोमामध्यें या आत्म्याचा प्रभाव असूनहि आत्मा स्वतः मात्र जीवनांत गुरफटून न जातां, कोणाच्याहि अनुनयाला बळी न पडतां ओीश्वराच्या चरणीं अर्पण होण्यासाठीं अलिप्त आणि एकाकीच राहिला आहे. हेंच त्याचें कौमार्य, हेंच त्याचें पावित्र्य !

जीवने जा चिरदिन
रये गेछे आभासे
प्रभातेर आलोके जा
फोटे नाञि प्रकाशे,
जीवनेर शेष दाने
जीवनेर शेष गाने,
हे देवता, ताञि आजि
दिब तव सकाशे—
प्रभातेर आलोके जा
फोटे नाञि प्रकाशे ।

कथा तारे शेष क'रे
पारे नाञि बाँधिते,
गान तारे सूर दिये
पारे नाञि साधिते ।

की निभृते चुपे चुपे
मोहन नवीनरूपे
निखिल नयन हते
ढाका छिल, सखा, से—
प्रभातेर आलोके तो
फोटे नाञि प्रकाशे ।

भ्रमेछि ताहारे लये
देश देशे फिरिया,
जीवने जा भांगड़ागा
सबञि तारे घिरिया ।
सब्र भावे सब काजे
आमार सबार माझे
शयने स्वपने थेके
तबू छिल अेका से
प्रभातेर आलोके तो
फोटे नाञि प्रकाशे ।

कत दिन कत लोके
चेयेछिल ओहारे,
वृथा फिरे गेछे तारा
बाहिरेर दुयारे ।
आर केह बुझिबे ना,
तोमा साथे हबे चेना

सेजि आशा लये छिल
आपनारजि आकाशे—
प्रभातेर आलोके तो
फोटे नाजि प्रकाशे ॥

"जी चिरकाल गुप्तरूपानें माझ्या जीवनामध्यें वास करीत आहे तिनें माझ्या हृदयांत उषेचा प्रकाश झाला तरी स्वतःला प्रगट केलें नाहीं, आपला बुरखा सोडला नाहीं. हे जीवनेश्वरा, माझ्या जीवनाच्या अंतिम दानाच्या वेळीं, जीवनाच्या द्वारां आज ती स्वतःला तुझ्या हातीं अर्पण करील आणि याचसाठीं तिनें पहांट झाली असूनहि आपलें अवगुंठन सोडलें नव्हतें.

वाणीनें अनेक प्रकारें तिला मिळविण्याचा प्रयत्न केला, पण शब्द तिला पूर्णपणें बांधूं शकले नाहींत. गायनानें अनेक सूर वापरले, अनेक प्रकार करून पाहिले, अनेक राग आळवून पाहिले, पण गान तिला प्राप्त करूं शकलें नाहीं. हे जीवनसख्या, तिनें किती तरी युक्त्याप्रयुक्त्यांनीं स्वतःला लपवून ठेविलें आहे. जगाची दृष्टि आपल्यावर पडूं दिली नाहीं. जी पहिली दृष्टि पडेल ती तुझीच असावी म्हणून इतर कोणाच्याहि दृष्टीचा विटाळ तिनें होऊं दिला नाहीं आणि तिनें स्वतःला आपल्या अवगुंठनांतच लपवून ठेविलें आहे.

मी तिला बरोबर घेऊन देशदेशांतरीं फिरलों, माझ्या जीवनांत ज्या कांहीं घडामोडी झाल्या त्या सर्व तिच्यामुळेंच, तिच्याच आसपास झाल्या. माझ्या सर्व विचारांत आणि आचारांत, शयनीं आणि स्वप्नीं, माझ्या सर्वस्वांत तीच भरलेली असून देखील ती अलिप्त आणि एकटीच राहिली आहे; तिनें आपला पडदा बाजूस सारला नाहीं.

किती तरी लोकांनीं किती तरी दिवस तिला चाहिलें, तिची इच्छा केली, तिच्या भोंवतीं घिरट्या घातल्या, पण ते सर्व निराश होऊन बाहेरच्या बाहेर (बाहेर-दारांतूनच) परत गेले. त्यांचा आंत प्रवेशच झाला नाहीं. हे हृदयेश्वरा,

इतर कोणीच तिला ओळखूं शकणार नाहीं. तुझ्याखेरीज ती कुणालाच पहावयास तयार नाहीं. तुझ्याशीं परिचय होईल, ही आशा उराशीं बाळगून आजवर ती एकटी आपल्याशींच राहिली आहे. तिनें आपल्या चेहऱ्यावरील अवगुंठण आजवर बाजूस सारलें नाहीं. तिला प्रथम पाहील तो तूंच !"

# ३५

बिरबलाला म्हणे बादशहानें अेकदां अेका अुँच मिनाऱ्यावर ठेवून दिलें होतें, खालीं अुतरणें शक्य नव्हतें. मिनाऱ्यावर राहून अुपाशीं मरावें किंवा त्ररून अुडी मारून जीव द्यावा अेवढाच मार्ग अुरला होता.

पण बिरबलाची बायको बिरबलाहून कमी चतुर नव्हती. तिनें अेका गोगलगाअीच्या कमरेला अेक पातळसा धागा बांधला आणि तिच्या नाकाला मधाचें बोट लावून तिला मिनाऱ्याच्या भिंतीवर सोडून दिली. मधाच्या वासानें गोगलगाय हळूहळू वर चढूं लागली आणि शेवटीं मिनाऱ्याच्या शिखरावर पोंचली. अशाप्रकारें त्या पातळ धाग्याचें अेक टोंक बिरबलाच्या हातीं पोंचलें. पुढें त्याच्या बायकोनें त्या कच्च्या धाग्याला शिंप्याचा मजबूत धागा बांधला. बिरबलानें हळूहळू तो वर ओढून घेतला. याला जोडून अेक मजबूत पातळशी दोरी बांधली तीहि त्यानें वर ओढून घेतली. असें करतां करतां शेवटीं अेक मजबूत सोल खालून वरपर्यन्त पोंचला. त्याचें अेक टोंक मिनाऱ्यावरील अेका खांबाला बांधून त्याच्या सहाय्यानें बिरबल खालीं अुतरला आणि रातोरात अेका खेडेगावांत जाअून लपून राहिला.

( बिरबलाचें चातुर्य पाहून बादशहानें त्याला अभयदान दिलें व आपल्या दरबारीं पुनः स्थापित केलें, वगैरे बाकीच्या गोष्टींशीं आपल्याला कर्तव्य नाहीं. )

सूक्ष्म धागा जरी अेकदां हातांत आला तरी त्याच्या जोरावर हळूहळू प्राण वांचविणारा दोरखंड मिळवितां येतो, हाच या गोष्टींतून बोध घ्यावयाचा आहे.

भगवंताचे वर अनंत आहेत. ते सर्व आपल्याला केव्हां मिळणार असतील ते मिळोत किंवा न मिळोत. त्याचा जर फक्त कृपाप्रसाद झाला, त्याचा चरणस्पर्श मिळाला; तो आहे—आपलाच आहे—आपल्याला अनुकूळ आहे अेवढी अेकदां खात्री झाली म्हणजे या धाग्याच्या जोरावर जें हवें आहे तें सगळें आपल्याला यथाकाळीं मिळवितां येतें.

मनुष्याची मोक्ष-साधना जन्मोजन्मीं चालत असते. या जन्मीं तांतडी करून जर कांहीं मिळविण्याजोगें असेल तर तें फक्त हा धागा मिळविणें होय, तो मिळाला आणि तावडतोब आपण मरून गेलों तरी कांहीं बिघडलें नाहीं. अेक जन्म पूर्णपणें कृतार्थ झाला म्हणावयास हरकत नाहीं.

जा दियेछ आमार अे प्राण भरि
खेद रबे ना अेखन जदि मरि।
रजनीदिन कत दुःखे सुखे
कत—जे सुर बेजेछे अेअि बुके
कत बेशे आमार घरे ढुके
कत रूपे नियेछ मन हरि।
खेद रबे ना अेखन जदि मरि।

जानि, तोमाय निअि नि प्राणे बरि—
पाअि नि आमार सकल पूर्ण करि।

जा पेयेछि भाग्य बले मानि,
दियेछ तो तव परशखानि,
आछ तुमि अेअि जाना तो जानि –
जाब धरि सेअि भरसार तरी ।
खेद रबे ना अेखन जदि मरि

"माझा प्राण भरून जें कांहीं तूं मला दिलें आहेस तें इतकें कांहीं पर्याप्त आहे कीं, या क्षणीं जरी मी मेलों तरी मला त्याचा खेद उरणार नाहीं.

दिवसरात्र कितीतरी दुःखासुखांच्या अनुभवानें माझ्या या हृदयांत अनेक प्रकारचे सूर वाजूं लागतात. किती तऱ्हतऱ्हेच्या वेशानें तूं माझ्या घरीं डोकावतोस आणि किती विविधरूपानें माझें मन हरण करून घेतोस. आतां मीं मेलों तरी मला त्याचा खेद नाहीं.

मी अर्ध्या हळकुंडानें पिवळा होत आहें असें नाहीं. मला ठाऊक आहे कीं, माझ्या प्राणांनीं अजून तुला वरलें नाहीं, आपलें सर्वस्व अर्पण केलें नाहीं. माझ्या समस्त जीवनाला मीं अजून पूर्ण करून घेतलें नाहीं, हेंहि मला ठाऊक आहे. जें कांहीं मला मिळालें आहे तें माझ्या साधनेच्या जोरावर नसून भाग्यबलानेंच मला तें मिळालें आहे असेंच मी मानतों. कसें कां असेना! तूं मला स्वतःचा स्पर्श दिला आहेस हें खरें आहे. तूं आहेस एवढी जाणीव मला झाली आहे. आतां याच भरंवशाच्या नावेला धरून मी माझी बाकीची मोक्षयात्रा खात्रीनें पूर्ण करीन. आतां या क्षणीं मला मरण आलें तरीहि त्याचा मला खेद उरणार नाहीं."

# ३६

असें सांगतात कीं, यहुदी लोकांना जेव्हां ओीश्वरानें त्यांच्या पुढाऱ्याला प्रेरणा देअून अिजिप्तच्या गुलामगिरींतून सोडविलें तेव्हां स्वदेशी परत जातांना वाटेंत त्यांचे हाल होअूं नयेत म्हणून ओीश्वर रोज सकाळीं आकाशांतून अमृतभोजनाचा सडा करीत असे. ओीश्वरानें दिलेल्या त्या आहारामुळें यहुद्यांना प्रवासांत तहानभूक लागत नसे. पण यहुदी आपले दुःखी आणि कष्टीच दिसत असत. जेव्हां त्यांना विचारण्यांत आलें कीं, बाबांनो, तुम्ही कष्टी कां ? तेव्हां ते म्हणाले—आम्हांला रोज अमृत खावयाला मिळतें खरें पण अितके दिवस झाले कांदे कसे ते (मुळींच) खावयाला मिळाले नाहींत. कांद्यांवाचून दिवस कंठावेत तरी कसे !

भगवंताची खात्री झाली कीं, हे लोक कांद्याच्याच लायकीचे आहेत. द्या यांना कांदा आणि बंद करा ही अमृतवर्षा.

अेक म्हातारी बाअी अतिशय कष्टांत असे. मायेचें कोणीच नसल्यामुळें पोट भरण्यासाठीं तिला काबाडकष्ट करावे लागत. ती थकली, कंटाळली, कावली आणि म्हणूं लागली 'मरण मलाच कां विसरलें कोण जाणें !' गांवचे अितर लोक अनेक प्रार्थना करीत पण हिची

आपली ही अेकच प्रार्थना ठरलेली. ‘ सख्या मरणा, केव्हां भेट देशील आणि या जगाच्या जाचांतून सोडवशील. आतां ये आणि मला घेअून जा.’

तिची ही आर्तवाणी शेवटीं मरणाच्या कानीं पोंचली आणि दयार्द्र अंतःकरणानें मरण धांअून आलें. मरणाला पहातांच म्हातारी म्हणते – ‘ मला काय माहीत कीं, तूं अितक्या लवकर येशील म्हणून. तुझे कान बहिरे आहेत अशी खात्री होअूनच मी टाहो फोडीत असे. मला कांहीं अितक्यांत मरावयाचें नाहीं. बाबारे, तूं जा आपला परत. तूं माझी प्रार्थना अैकशील अशी शंका जरी आली असती तरी मीं तुला बोलाविलें – आळविलें नसतें. ’

आपण नाहीं कां मित्रमंडळींना औपचारिक आमंत्रण देत. साधकाचें देखील पुष्कळदां असेंच होतें. तो षड्रिपूंच्या जाचांतून मुक्ति मिळावी म्हणून प्रार्थना करीत असतो. पण जर खरोखरच मुक्ति मिळूं लागली तर त्याची गाळणच अुडावयाची. आपण थोरपणा मागतो पण लहानपणाचा जिव्हाळा आपल्याला सोडवत नाहीं. हीन वस्तु हीन आहेत हें आपल्याला समजतें. आपलें थोर मन हीन वस्तूंचा तिरस्कारहि करतें पण लहान मन त्या हीन वस्तूंना कवटाळण्यांतच सुख मानतें. जीवनांतील ही विसंगति प्रत्येकाच्या अनुभवाची गोष्ट आहे. आपण मागतों चांगलें पण दोन्ही मिळत असतां पसंत करतों वाअीट. या विचित्र विकृतीला काय म्हणावें ?

जड़ाये आछे बाधा, छाड़ाये जेते चाअि —
छाड़ाते गेले व्यथा बाजे ।
मुक्ति चाहिबारे तोमार काछे जाअि,
चाहिते गेले मरि लाजे ।
जानि हे तुमि मम जीवने श्रेयतम,
अेमन धन आर नाहि जे तोमा-सम,
तबु जा भाङाचोरा घरेते आछे पोरा
फेलिया दिते पारि ना जे ।

तोमारे आवरिया धुलाते ढाके हिया,
मरण आने राशि राशि —
आमि जे प्राण भरि तादेर घृणा करि,
तबुओ ताअि भालोबासि।
अेतअि आछे बाकि, जमेछे अेत फाँकि —
कत जे विफलता, कत जे ढाकाढाकि —
आमार भालो ताअि चाहिते जबे जाअि
भय जे आसे मनोमाझे।

" जी कांहीं बाधा आम्हांला चिकटली आहे तिच्यापासून सुटका व्हावी अशी मनापासून इच्छा असते. पण जेव्हां बरोबर सुटका होऊं लागते तेव्हां सोडतांना मन व्यथित होतें. मुक्ति मिळावी म्हणून तुजजवळ येतों पण मागतांना लाज वाटते. मला ठाऊक आहे कीं, तूंच खरोखर वरेण्य आहेस. तुझी प्राप्ति होणें यांतच माझें कल्याण आहे. तुजसमान धन नाहीं. तरी असलें धन भरून घेण्यासाठीं खिसे रिकामे करावेत तर खिशांत असलेलें बेगड टाकून देण्याची इच्छा होत नाहीं. कांहीं केल्या जीव चालत नाहीं.

ज्या वस्तु तुला लपवून ठेऊन हृदयाला धुळींत झांकून टाकतात आणि पावलोंपावलीं मरण आणतात, त्या वस्तूंची मी अगदीं मनापासून घृणा करतों आणि इतकें असूनहि त्याच वस्तु मला हव्या हव्याशाहि वाटतात.

हिशेब करून पाहिला तर माझेवर कितीतरी कर्ज निघेल, बुडींत येणें सारखें वाढत चाललें आहे. जीवनामध्यें सफलता किती मिळाली आणि निष्फळता किती पदरीं आली याचा हिशेब करतां निष्फळतेचाच ढीग डोळ्यांपुढें दिसतो आणि जें केलें असतां लाजावें अशींच कर्मे हातून घडल्यामुळें कितीतरी लपवालपवी करावी लागते. अशा स्थितींत माझें कल्याण व्हावें अशी इच्छा करीत असतांना

*जड़ाये आछे बाधा, छाड़ाये जेते चाअि—* ............................ ११९

देखील मनांत भीति राहून जाते कीं, जर खरोखरच कल्याण झालें तर या हीन गोष्टी सोडाव्या लागतील. त्या कशा सोडाव्यात ?"

---

टीप : देवाची प्रार्थना करतों कीं, मला यांतून सोडव पण प्रार्थनेबरोबर मनांत धडकी असतेच कीं, जर प्रार्थना भगवंतांनीं ऐकली तर हीं सर्व व्यसनें सोडावीं लागतील त्याचें काय ?

# ३७

**जी**वात्मा आणि परमात्मा यांचा संबंध दाखवितांना अुपनिषद्कारांनीं अेक भव्य अुपमा वापरली आहे. ‘ यथा नद्याः स्यंदमानाः समुद्रे अस्तं गच्छन्ति नामरूपे विहाय । ’ ज्याप्रमाणें गर्जणाऱ्या नद्या आपलें नाम आणि रूप दोन्हीं सोडून समुद्रामध्यें विलीन होतात त्याचप्रमाणें जीवात्मे परमात्म्यामध्यें विलीन होत असतात.

यात्रापरायण भारतवासियांनीं प्रत्येक नदीची केव्हां ना केव्हां परिक्रमा केलीच आहे आणि अुगमापासून मुखापर्यंत नदीकांठचीं सुंदर, भव्य आणि म्हणूनच पवित्र अशीं स्थळें हेरून ठेविलीं आहेत. या दरेक तीर्थस्थानीं ज्यांनीं मंदिरें आणि मठ बांधून भारतीय संस्कृति परिपुष्ट केली आहे त्यांनीं पाहिलें, नदी म्हटली कीं समुद्राला मिळावयाचीच. ‘ आकाशात् पतितं तोयं यथा गच्छति सागरम् । ’ आणि म्हणूनच शेवटीं त्यांनीं ठरविलें— ‘ सागरे सर्वतीर्थानि ’.

ज्याप्रमाणें सर्व नद्या शेवटीं समुद्राला मिळतात आणि आपापली पवित्रता त्याला अर्पण करतात त्याचप्रमाणें प्राचीन काळापासून निरनिराळ्या महाजातींचे प्रवाह वहात वहात हिन्दुस्तानांत आले आहेत आणि अशा रीतीनें आपला हा भारतवर्ष मनुष्यजातींचा अेक प्रकारें

सर्वपावन महासागर बनला आहे. अर्थात् जगाचे जेवढे म्हणून विशाल आणि जटिल प्रश्न असतील ते सर्व शेवटीं हिंदुस्तानांत गोळा व्हावयाचे आणि येथेंच ते कायमचे सोडविले जावयाचे. सगळ्यांत जो मोठा प्रश्न, कीं " भिन्न भिन्न जातींचे लोक—संस्कृतीच्या भिन्न भिन्न भूमिकेवर असलेल्या महाजाति शेवटीं कोठें तरी गुण्यागोविंदानें नांदणार आहेत, का शेवटीं अेकमेकांना मारून सर्वनाश साधणार आहेत? " हा प्रश्न जर कोठें सुटला तर या भारतवर्षांतच सुटणार आहे. आणि सर्व वसुधेचें अेक कुटुंब करण्याचें प्रेम-शास्त्र येथेंच रचलें जावयाचें आहे. भारतभूमीचें हें अैतिहासिक मिशन क्रान्तदृष्टीनें पाहून आणि अितिहासांत तें चरितार्थ झालेलें अनुभवून कवि आपल्या चित्ताला, आपल्या रुद्रवीणेला या दिव्य संदेशाची वाहक होण्यास येथें सुचवीत आहेत.

जगांतील सर्व मानवांनीं—जंगली लोकांनीं आणि सुधारलेल्या राष्ट्रांनीं—परमात्म्याला अनेक नांवें दिलीं आहेत. पण त्या सर्वांत ' नारायण ' हें नांव अगदीं निराळेंच चमकतें. हें नांव ज्या ऋषीला सुचलें त्याला भारतवर्षाचें भवितव्य रवीन्द्रनाथांप्रमाणेंच दिसलें असलें पाहिजे.

नरनारींच्या समूहाला—भूत, भविष्य, वर्तमानकाळाच्या मनुष्यसृष्टीला—संस्कृतमध्यें " नार " असें म्हणतात. नरनारींचा समूह तो नार. या नारालाच स्वतःचें अधिष्ठान ज्यानें बनविलें आहे त्याला, God of Humanity ला नारायण ही संज्ञा दिली गेली. या नारायणाची अुपासना भारतवर्षांत प्राचीन काळपासून होत असल्यामुळें येथील धर्म यहुदी धर्माप्रमाणें विशिष्ट जातीचा न राहतां ' सर्वभूतहिते रतः ' अशा स्वरूपाचा झाला आहे. या धर्मांतच पुनः पुनः सांगितलें आहे, ' अयं निजः परोवेति गणना लघुचेतसाम् । अुदार-चरितानां तु वसुधैव कुटुम्बकम् ॥ ' भारतवर्षाच्या अगदीं आदिमकाळींच विश्वात्मैक्याचीं साधना सुरू झाल्यामुळें विश्वकुटुम्बवाद देखील आपल्या ऋषींना अगदीं साधा वाटला. म्हणूनच ते म्हणतात, ' यत्र भवति विश्वं अेकनीडम्. ' आमच्या साक्षात्कारांत हें सर्व विश्व अेका लहानशा घरट्यासारखें ठरतें.

हाच प्राचीन वारसा ध्यानांत धरून कवीनें भारतवर्षाचें भव्य चिंतन सुरू केलें आहे.

हिंदुस्तानच्या अुत्तरेला जगाचा मानदंड असा हिमालय सनातन काळाचा साक्षी होअून धीर-गंभीरपणें बसला आहे आणि त्यानें अुत्तरेकडील गार वाऱ्यांपासून भारतवर्षाचें रक्षण

करण्याचें आणि त्याचेवर आपली पाखर घालण्याचें काम सनातन काळापासून चालविलें आहे. सिंधु, गंगा, ब्रह्मपुत्रा यांसारख्या महानद्या या हिमालयाच्या हातांत जणूं काय जपमाळेप्रमाणें चाळविल्या जात आहेत.

ध्वनिबरोबर जसा प्रतिध्वनि अुमटतो त्याप्रमाणें हिमालयाला पडसाद देण्यासाठींच जणूं काय विंध्य आणि सातपुडा समांतरपणें उभे आहेत. आणि दक्षिणेकडे भारतवर्ष कुठवर पसरलेला आहे याचें माप घेण्यासाठीं जणू काय सह्याद्रि निलगिरीचीं बोटें विस्तारून दक्षिण दिशा चांचपडून पहात आहे. पर्वतांनीं भूमीचे भाग पाडावे आणि नद्यांनीं या विभागांना अेकत्र आणावें हेंहि त्यांचें काम अखंड चालूच आहे. अशा या भारतवर्षामध्यें अुभें राहून, दोन बाहू पसरून, भारताइतकेंच विशाल हृदय अुघडें करून ऋषि लोक दाही दिशांच्या लोकांना—मानवस्रोतांना हिंदुस्तानचें आमंत्रण देत आले आहेत. अेकाद्या बौद्ध भक्तानें लहानसा विहार बांधला तरी तो संकल्प करावयाचा कीं दाही दिशांच्या समस्त मानवजातीला साधना करण्यासाठीं येथें आमंत्रण आहे. आणि त्याच परंपरेचें स्मरण ठेवून श्री. जगदीशचंद्र बसूंनीं हिमालयांत जेव्हां विज्ञानाची अेक प्रयोगशाळा बांधली तेव्हां तेथेंहि सर्व जगांतील विद्यार्थ्यांना आमंत्रण दिलें आणि या प्रयोगशाळेंत प्राप्त होणारें ज्ञान कधींहि कोणाहीपासून गुप्त ठेविलें जाणार नाहीं, अशी प्रतिज्ञा केली. ऋषी नव्हते म्हणाले, ‘ विवृताश्च वेदाः ! ’ वेद सगळेच उघडे आहेत.

आणि भारतवर्ष कोणच्या बाबतींत कमी आहे ? जगांत जितक्या म्हणून प्रकारचे देश आहेत, जितक्या प्रकारच्या आबोहवा आहेत त्या सगळ्यांचे नमुने येथें पहावयास सांपडतात. तुम्हांला स्वित्झरलंड हवा, काश्मीरांत जा. सहारासारखें वाळवंट हवें, राजपुतान्यांत भटकून या. स्कॉटलेंडसारखीं सरोवरें हवीं आहेत ? भीमताल—नैनीताल काय कमी आहेत ! नीलनदीची तोड हवी आहे, सिंधूला पाहून घ्या. समशीतोष्ण समृद्धि हवी आहे, लंकेहून अधिक ती तुम्हांला कुठें मिळेल ? कोरडा मुलुख हवा आहे, तर पंजाबांत चला. आणि दलदली हव्या असल्या तर बंगालांत जा.

आणि जगांतील कोणची वनस्पति, येथें उगवत नाहीं ? वृक्ष-वनस्पति, पशु-पक्षी, जलचर, खेचर आणि वनचर सर्व प्रकार तुम्हांला येथें मिळतील. मानवी महासागराला आमंत्रण देण्यापूर्वी प्रकृतीनें ही सर्व पूर्वतयारी येथें करून ठेविली आहे. आणि मगच सर्वांना आमंत्रण पोंचविलें आहे.

कोण सांगूं शकेल कीं कुणाच्या आमंत्रणानें या निरनिराळ्या जाती हिंदुस्तानाकडे वहात आल्या आहेत ? अुत्तरेकडे हिमालय आणि दक्षिणेकडे महासागर अशा या प्रचंड भीषण विभूतींनीं जरी या देशाचें रक्षण केलें असलें तरीहि हीं महाभूतें त्या महा आमंत्रणाच्या आड येऊं शकलीं नाहींत. येथें भारतवीर आले, कुरु आणि पांचाल आले, आर्य आणि द्रविड आले, सुर आणि असुर आले, हूण आले आणि शक आले, यवन आले आणि रोमन आले, मिश्र देशचे लोक आले आणि बाल्हिक देशचे लोकहि आले. चीन देशचे लोक आले आणि मोगल आले. फिरंगे ( पोर्तुगीझ ) आले आणि फ्रान्सिसी आले, वलंदे ( डच ) आले आणि अिंग्रज आले. यहुदी आले आणि ख्रिस्ती आले. वरूणपूजक यवन आले आणि अग्नि-पूजक पारसिक आले. आणि जे जे आले ते ते सर्व लवकर किंवा उशिरां येथचेच होऊन राहिले आहेत. कांहीं विजयोन्मादानें नाचत आले तर कांहीं आश्रय घेण्यासाठीं आले. पण शेवटीं विश्वकुटुम्बाचा भारतधर्म स्वीकारून येथलेच झाले.

यापुढें देखील जे येतील तेहि येथचेच होतील. सवता सुभा करूं पाहतील, तेहि शेवटीं भारतमातेच्या दुधाला जागतील आणि मानवी कुटुम्बाप्रमाणें सर्व धर्मांचे अेक धर्मकुटुंब स्थापन करण्याला कारणीभूतच होतील.

पश्चिम दिशेनें आतां आपलें दार अुघडलें आहे. समुद्रयात्रा-निषेध कोणालाच अुरला नाहीं. फिरंगी लोकांपासून तों थेट जर्मन आणि अिंग्रजांपर्यंत सर्व लोक कोणत्या ना कोणत्या मिषानें येथें येऊं लागले आहेत. भारतवासीदेखील जगाच्या सर्व देशांत जाऊं येऊं लागले आहेत. आतां हिंदुस्थानचें सर्व देशांशीं, सर्व जगाशीं दळणवळण सुरू झालें आहे. आदान-प्रदान वाढलें आहे. चिरपरिचयानें परकीपणा कमी होऊं लागला आहे. अेकमेकांचें अेकमेकांवांचून चालावयाचें नाहीं याचीहि जाणीव अुत्पन्न झाली आहे आणि " येथें यावें आणि लूट करून परत जावें " याहून अधिक महत्त्वाची कामगिरी स्वतःचे वाट्यास आली आहे असें सर्वांना समजूं लागलें आहे. तेव्हां आतां भारतवर्षाचें मिशन पुनः अेकदां चालू होणार याविषयीं शंका नाहीं.

भारतवर्षानें संस्कृतीचीं अनेक युगें पाहिलीं आहेत. अनेक साम्राज्यांच्या अुत्थानाचा आणि पतनाचा तो साक्षी आहे. अर्थात् त्याला आतां अर्ध्या हळकुंडानें पिवळें होणें शक्य नाहीं. पण जे पहिल्याच खेपेला मनुष्य-जन्माला आले आहेत, पहिल्या प्रथमच सुसंस्कारी झाले आहेत, त्यांना नव्या जोमामुळें स्वर्ग अेक बोट उरल्यासारखें वाटणें स्वाभाविक आहे.

ते म्हणत—हिंदुस्थानची संस्कृति खुरटली आहे. हिंदुस्थानामध्यें विकासाचीं तत्त्वें अुरलीं नाहींत. यामुळें तरण्याबांड जंगली जातीपेक्षां देखील हिंदुस्थानाला फार खालचें स्थान द्यावें लागतें. हिंदुस्थान ज्याअर्थी गुलाम आहे त्याअर्थी तो मागासलेला असलाच पाहिजे. जो हरला त्याची संस्कृति कसची ?

पण हेहि दिवस निघून गेले. हिंदुस्थानचीं बंधनें गळून पडलीं. हिंदुस्थानचा तिरस्कार करणाऱ्या राष्ट्रांचा संकुचितपणाहि बऱ्याच अंशानें दूर झाला आणि अभिमान ओसरल्यानंतर प्रेम आणि आदराचें वातावरण मोकळेपणानें खेळूं लागलें आहे. कवीचें विश्वबंधुत्वाचें प्रेमगीत कृतार्थ झालें.

ज्याप्रमाणें सृष्टीच्या प्रारंभीं भारतवर्षांतून अनेक जातींना आमंत्रण गेलें कीं "येथें सर्व या, आणि इतिहास-विधात्याच्या योजनेला सफल करा" त्याचप्रमाणें इतिहासाच्या प्रारंभीं अगदीं नान्दी म्हणण्याच्याच वेळीं भगवंतानें येथील लोकांना विविधतेमध्यें अेकता कशी पहावी, सर्वांचा समन्वय कसा करावा, निरनिराळ्या सुरांतून एक संपूर्ण राग कसा उत्पन्न करावा याचा महामंत्र त्यांच्या हृदयांत फुंकून दिला आणि अशा रीतीनें — हिन्दुस्थानचा प्राण सर्वसमर्थ केल्यानंतर त्याच्यापुढें सर्व प्रकारचे कठिणांतले कठिण प्रश्न फेंकावयास सुरुवात केली. गणितबुद्धीमध्यें प्रखरता दाखविणाऱ्या विद्यार्थ्यांपुढें शिक्षक ज्याप्रमाणें जटिल, कुटिल आणि खट्याळ अुदाहरणें मुद्दाम मांडतो आणि त्याच्या शक्तीची कसोटी पाहतो, त्याप्रमाणें नारायणानें हिन्दुस्थानची पारख चालविलेली आहे. विविधतेचा अेक प्रश्न त्यानें सोडविला आणि जरा हायसें म्हटलें कीं ताबडतोब नवा प्रश्न त्याच्यापुढें दत्त म्हणून आलाच आहे. तो सुटतो न सुटतो अितक्यांत सुटलासा वाटणारा जुना प्रश्न नव्यानें नवें रूप धारण करून विकट हास्य करीत खडा टाकतो. त्याचा अिलाज करावा तर कांहीं स्वकीयांना अश्रद्धेमुळें शंका वाटूं लागते कीं हिन्दुस्थानचें मिशन खरोखर हेंच आहे का ? आणि तें व्यवहार दृष्टीनें शक्य कोटींतील आहे का ? अेके ठिकाणीं सांधावें अितक्यांत दुसरीकडे तुटतें, अेके ठिकाणीं ठिगळ लावावें तर दुसरीकडे फाटतें, अशी विधात्याची लीला चालू आहे. आणि भारतवर्षहि न हारतां त्या सर्वांना तोंड देत आहे. हिन्दुस्थानची ही ध्येयनिष्ठाच त्याला आणि जगाला तारक होणार आहे.

पण हें सोपें नाहीं. पोटांत आग पडावी आणि ती शमविण्यासाठीं स्वतःच्याच हृदयाचे तुकडे करून ते खाण्याची पाळी यावी अशासारखी ही साधना आहे. नानात्व

वादतच जावें आणि तें यज्ञामध्यें होमून त्यांतून ऐक्याचें रसायन तयार करावें अशासारखी ही साधना आहे. आणि यांत विजय मिळाला तरी डोकें वर करावयास मिळूं नये, पण विजयानंददेखील दुःखाग्नीमध्यें आहुति म्हणून टाकून एकतेच्या मार्गांत पुढें जावयाचें अशी ही भीषण साधना आहे.

पण ही साधना जेव्हां सिद्ध होईल तेव्हां जगाचे सर्व प्रश्न सोडविण्याची शक्ति असलेला विशाल प्राण भारतवर्षांत जन्म घेईल. जगाची रात्र संपेल आणि हिंदुस्थान एखाद्या गरुडपक्ष्याप्रमाणें आपल्या घरट्यांत जगांतील सर्व महाजातींचें संगोपन करील. यत्र भवति विश्वम् अेकनीडम् ।

ज्यांच्या वांट्याला ही महासाधना साधण्याचें आलें आहे ते खरोखर धन्य होत. हें कार्य केवळ एका जातीचें नाहीं, एका धर्माचें किंवा पंथाचें नाहीं. येथें सर्वांनींच हातभार लावावयाचा आहे. ज्यांनीं ज्यांनीं म्हणून हिंदुस्थानचें मीठ खाल्लें आहे, ज्यांच्या ज्यांच्या फुप्फुसांत हिंदुस्थानची प्राणदायी हवा पोंचली आहे, हिंदुस्थानचें जीवन ज्यांच्या ज्यांच्या रक्तांत सळसळ वहात आहे आणि ज्यांना ज्यांना भारतीय संस्कृतीचा वारसा कमीअधिक मिळाला आहे, त्या सर्वांनीं या साधनेमध्यें भाग घेण्यासाठीं धांवून यावयाचें आहे. मग ते आर्य असोत किंवा अनार्य असोत. हिंदु असोत अथवा मुसलमान असोत. विश्वासी ख्रिस्त्यांनींहि यांत भाग घ्यावयाचा आहे आणि इंग्रजांनींहि यांत भाग घ्यावयाचा आहे. हिंदुस्थानच्या या सनातन साधनेमध्यें अुच्चनीचपणाचें विघ्न आणणाऱ्या ब्राह्मणांनीं आत्माभिमान सोडून पवित्र होऊन या उत्सवांत सामिल झालें पाहिजे आणि आपल्याला या मंगल कार्यांत स्थान असेल किंवा नाहीं अशी मनांतील शंका दूर करून आणि अपमान होईल कीं काय अशी भीति सोडून पतित आणि बहिष्कृत लोकांनींहि धांवून यावयाचें आहे. जोंपर्यंत या सर्वांच्या पवित्र हाताचा स्पर्श जगज्जननीच्या अभिषेकाच्या पाण्याला लागला नाहीं तोंपर्यंत तें तीर्थसलिल अभिषेकाच्या योग्य होणार नाहीं. म्हणून कोणालाहि सोडून चालावयाचें नाहीं. कोणालाहि तुच्छ लेखतां यावयाचें नाहीं. परस्पर आदर आणि प्रेम बाळगून सर्वांचा स्वीकार करून जेव्हां सर्व अेक होतील, तेव्हांच या महामानवाच्या सागरतीरीं या महायज्ञाची सांगता होईल. आणि मग स्वर्गींचे अमर आनंदानें सौमनस्याची वृष्टि करतील.

हे मोर चित्त, पुण्य तीर्थे
जागो रे धीरे—
एअि भारतेर महामानवेर
सागरतीरे ।
हेथाय दाँड़ाये दु बाहु बाड़ाये
नमि नरदेवतारे,
उदार छंदे परमानन्दे
बन्दन करी ताँरे ।
ध्यानगंभीर एअि-जे भूधर,
नदीजपमाला धृतप्रान्तर,
हेथाय नित्य हेरो पवित्र
धरित्रीरे
एई भारतेर महामानवेर
सागरतीरे ।

केह नाहि जाने कार आह्वाने
कत मानुषेर धारा
दुर्वार स्रोते एल कोथा हते
समुद्रे हल हारा ।
हेथाय आर्य, हेथा अनार्य,
हेथाय द्राविड चीन—
शक-हून-दल पाठान मोगल
एक देहे हल लीन ।
पश्चिम आजि खुलियाछे द्वार
सेथा हते सबे आने उपहार

दिबे आर निबे, मिलाबे मिलिबे
जाबे ना फिरे—
अेअि भारतेर महामानवेर
सागरतीरे ।

रणधारा बाहि जयगान गाहि
उन्माद कलरवे
भेदि मरुपथ गिरिपर्वत
जारा अेसेछिल सबे,
तारा मोर माझे सबाई बिराजे
केह नहे नहे दूर,
आमार शोणिते रयेछे ध्वनिते
तारि बिचित्र सुर ।
हे रुद्रबीणा, बाजो बाजो बाजो,
घृणा करि दूरे आछे जारा आजओ,
बन्ध नाशिबे, ताराओ आसिबे,
दाँड़ाबे घिरे—
अेअि भारतेर महामानवेर
सागरतीरे ।

हेथा एकदिन विरामविहीन
महा ॐकारध्वनि
हृदयतंत्रे एकेर मंत्रे
उठेछिल रनरनि
तपस्याबले एकेर अनले

बहुरे आहुति दिया
विभेद भुलिल, जागाये तुलिल
एकटि विराट हिया।
सेथि साधनार से आराधनार
यज्ञशालार खोला आजि द्वार,
हेथाय सबारे हबे मिलिबारे
आनतशिरे—
एथि भारतेर महामानवेर
सागरतीरे।

सेइ होमानले हेरो आजि ज्वले
दुखेर रक्त शिखा,
हबे ता सहिते, मर्मे दहिते—
आछे से भाग्ये लिखा।
ए दुखवहन करो मोर मन,
शोनो रे एकेर डाक।
जत लाज भय करो करो जय,
अपमान दूरे जाक।
दुःसह व्यथा हये अवसान
जन्म लभिबे की विशाल प्राण
पोहाय रजनी, जागिछे जननी
विपुल नीड़े
एथि भारतेर महामानवेर
सागरतीरे।

एसो हे आर्य, एसो अनार्य
हिन्दु मुसलमान ।
एसो एसो आज तुमि अिंराज
एसो एसो खृस्टान ।
एसो ब्राह्मण, शुचि करि मन
धरो हात सबाकार ।
एसो हे पतित, करो अपनीत
सब अपमानभार ।
मार अभिषेके एसो एसो त्वरा,
मंगलघट हय नि जे भरा
सबार–परशे–पवित्र–करा
तीर्थनीरे
आजि भारतेर महामानवेर
सागरतीरे ।

"हे माझ्या चित्ता, भारवर्षामध्यें मनुष्यांच्या महाजातींचा जो सागर उसळत आहे, याच्या तीरावरच्या महान् पुण्यतीर्थाचे ठिकाणीं धीरपणें जागें हो.

"येथें मानवसागराच्या तीरावर उभें राहून, आपले दोन्ही बाहू पसरून मी नरदेवतेला, या मानवी नारायणाला नमस्कार करतों आणि परम आनंदानें माझा गंभीर राग आळवून याला वंदन करतों.

"हा पहा येथें हिमालयासारखा ध्यानगंभीर पर्वत, नदीरूपी अनेक जपमाला हातांत धरून एका सरहद्दीवर आसन ठोकून बसला आहे. येथें या महामानवाच्या सागरतीरीं भारतवर्षाची पवित्र भूमि तूं पहा, तूं नेहमीं पहा.

"कांहीं समजत नाहीं, कुणाच्या आमंत्रणानें कितीतरी मनुष्यजातींचे प्रवाह कुठून तरी येथें आपापले लोंढे घेऊन आले आणि या महासमुद्रामध्यें मिळून लुप्त झाले आहेत, येथें पहावें तो हे आर्य आहेत, हे अनार्य आहेत, हे द्रावीड

आणि चीन, शक आणि हूण, पठाण आणि मोगल तऱ्हेतऱ्हेच्या भिन्न आणि विचित्र जाती येऊन या एकदेहामध्यें विलीन झाल्या आहेत—एकजीव झाल्या आहेत.

"आज आतां या देशाचें पश्चिमेकडचें द्वार उघडलें गेलें आहे. आणि सर्वजण येथून तऱ्हेतऱ्हेच्या देणग्या आणीत आहेत. हे सर्व लोक येतील, देतील आणि घेतील, मिसळतील आणि मिसळवतील, कोण–कोणीहि–परत जावयाचें नाहींत. ते सर्व या भारतरूपी महासागराच्या तीरीं कायमचे गोळा झाले आहेत.

"जे लोक एकेकाळीं रणनदीचा प्रवाह वाहवीत आणि उन्मादानें कलरव करीत जयगान गात आले, मरुपथ भेदून, गिरिपर्वत ओलांडून दूरदुरून जे कोणी आले ते सर्व आज माझ्यांतच विराजत आहेत. त्यांपैकीं कोणीहि दूर होणार नाहीं. आज आमच्या रक्तांत त्या सर्वांचे तऱ्हेतऱ्हेचे सूर एखाद्या संपूर्ण रागाप्रमाणें गुंजत आहेत.

"हे माझे रुद्रवीणे, त्या सर्वांचे हे विचित्र सूर तुला ठाऊक आहेत: भारतवर्षाच्या इतिहासाच्या रहस्याचें तुला आकलन झालें आहे. तूं गर्जना कर, घोषणा कर, सर्व जगाला तुझा उद्‌घोष ऐकीव कीं जे कोणी आमची घृणा करून, आमचा तिरस्कार करून दूर रहातात ते सर्व आमचीं आणि त्यांचीं बंधनें नष्ट झाल्यावर आमच्याजवळ येतील आणि भाऊ म्हणून आम्हांला घेरतील. भारतवर्षरूपी महामानवाच्या सागरतीरीं ते सर्व महामानव-संमेलनांत सामिल होणार आहेत.

"हें सर्व यदृच्छेनें कांहीं तरी घडत आहे असें नाहीं. भारतभाग्यविधात्या नारायणानें भारतवर्षाच्या जन्मकाळींच हें भविष्य भाकून ठेविलें आहे. भारत जातीला तिच्या उपनयन काळींच प्रणवमंत्राबरोबर ही सर्वात्मैक्याची–पूर्णतेची दीक्षा मिळाली होती.

"येथें एके दिवशीं अविरत महा ॐकारध्वनि ऐक्याचा मंत्र गात गात, हृदयतंत्रीच्या सर्व तारा छेडत गुंजन करीत उठला होता आणि त्याबरोबर भारतवर्षानें आपल्या तपस्याबलानें एकत्वाच्या होमकुंडांत नानात्वाची आहुति

देऊन विभेदाचा नाश करून टाकला आणि त्यायोगें एक विराट हृदय जागृत होऊन विश्वात्मैक्याची स्फुरणा स्फुरूं लागली. त्याच साधनेच्या आणि त्याच आराधनेच्या यज्ञशालेचें द्वार आज पुनः उघडलें गेलें आहे. आज येथें सर्वच नम्रतेनें शिर वांकवून एकत्र होण्यासाठीं येणार आहेत. भारतवर्षरूपी महा-मानवाच्या सागरतीरीं त्यांचा यज्ञवृंद गोळा होणार आहे.

"पहा, त्याच होमाग्नीमध्यें दुःखाची रक्तशिखा आज जोरानें पेट घेत आहे. आज जें भाग्यांत लिहिलें गेलें होतें त्याप्रमाणें हें सर्व सहन केलें पाहिजे. आणि अगदीं मर्मापर्यंत होरपळून घेतलें पाहिजे. हे माझ्या चित्ता, हे माझ्या हृदया, धैर्यपूर्वक तें दुःख सहन कर आणि ऐक्याचें तें आमंत्रण, ऐक्याची ती हांक ऐकण्याची पात्रता प्राप्त करून घे. हृदयांत जी कांहीं लाज, भीति कोनाकोपऱ्यांत उरली असेल तिच्यावर विजय मिळवून अपमान दूर सार. म्हणजे तुझ्या दुःसह व्यथेचा अंत होईल आणि केवढा तरी विशाल प्राण तुझ्यामध्यें जन्म घेईल. रात्र संपली आहे आणि या विशाल घरट्यामध्यें भारतजननी जागृत झाली आहे. आतां तिच्या महामानवरूपी सागरतीरावर सर्व एक होणार आहेत.

"हे आर्यांनो आणि हे अनार्यांनो, हे हिन्दु आणि मुसलमानांनो, या, या, धांवत या. आणि इंग्रजा, तूंहि ये. प्रत्येक खिस्त्या, तूंहि ये, जरूर ये.

"बा ब्राह्मणा, सर्व प्रकारची संकुचितता सोडून, अभिमान सोडून आपलें मन पवित्र करून ये आणि सर्वांच्या हातांत हात घालून उभा रहा. आणि हे पतिता, तुझा सर्व अपमानभार दूर होवो. तूंहि येथें ये.

"मातेच्या अभिषेकासाठीं तुम्ही सर्व धांवत या. अभिषेकाचा मंगलघट जोंवर पूर्ण भरला नाहीं तोंवर त्वरा करून या. सर्वांच्या स्पर्शानें पवित्र झालेल्या तीर्थनीरानें हा मंगलघट भरावयाचा आहे. आज भारतवर्षाच्या महामानवाच्या सागरतीरीं विश्वजननीचा अभिषेक व्हावयाचा आहे. मनुष्यजातीमध्यें बंधुता स्थापन झाल्याचा महोत्सव व्हावयाचा आहे. यासाठीं सर्वजण धांवून या. कारण या अभिषेकघटाला सर्वांचा हात लागला पाहिजे."

# ३८

बंगाली भाषेंत खरें पाहूं जातां लिंगभेद नाहीं, लिंग दिसून यायचें सर्वनामांत किंवा क्रियापदांत. बंगाली भाषेंत या दोन्ही बाबतींत लिंगभेद दाखविणारे प्रत्यय नाहींत. संस्कृतची ज्यांना ओढ आहे असे लेखक कधीं कधीं विशेषणांत लिंगभेद दाखवतात. यामुळें बंगाली भाषेंत लिंगभेद नाहीं असें स्पष्ट म्हणतां येत नाहीं हें कबूल केलें पाहिजे. लिंगभेद नसल्याचा फायदा प्रेमगीतें लिहिणाऱ्या कवींना मिळतो. अुत्कट भावना व्यक्त करणारें गीत पुरुषाचें आहे कीं स्त्रीचें, पुरुषाला अुद्देशून आहे कीं स्त्रीला हें अस्पष्ट राहिल्यानें जें अेक माधुर्य साधतें त्याला भाषान्तरांत वंचित व्हावें लागतें.

ही गोडी आणि भाषान्तराची ही अडचण याविषयीं अेकदां गुरुदेवांशीं मी बोलल़ों होतों. तेहि ही अडचण ओळखून हळहळले. भाषान्तरांत पुल्लिंग वापरलें तर भावनेचा नाजुकपणा, भक्तीची किंवा अनुरक्तीची अुत्कटता व्यक्त होत नाहीं आणि स्त्रीलिंग वापरावें तर स्त्री-पुरुष संबंधाचा भेद जागृत होअून तटस्थता मारली जाते आणि मग आध्यात्मिक भक्तिकाव्याचा जामा चढवून गीताला कृष्ण-गोपीच्या संबंधाचें रूप द्यावें लागतें.

काठेवाडी गुजराथीमध्यें केव्हां केव्हां प्रत्यय आंखूड करून त्याला लिंगनिरपेक्ष करण्याची सोय आहे. साहित्यापेक्षां संभाषणांत ती अधिक वापरली जाते हें खरें, पण कठीण प्रसंगीं त्या सोयीचा आश्रय घेतां येतो.

अिंग्रजींत किंवा संस्कृतांत सर्वनामांना लिंगाची बाधा आहे, क्रियापदांना नाहीं. त्यामुळें अर्धी अडचण दूर होते.

सूफी परिभाषेंत आणि ग्रीक भाषेंतहि आत्मा स्त्रीलिंगी मानला आहे. यामुळें भक्ताचा आणि अीश्वराचा जेथें संबंध येतो तेथें स्त्रीलिंगाचा अुपयोग स्वाभाविक वाटतो. आपल्या येथें भक्तीचे अनेक प्रकार आहेत. त्यांतील अुत्कट भक्ति सख्यभक्ति असल्यानें तेथें कोणचेंहि लिंग वापरलें तरी अडचण येअू नये. पण गीताला भक्तीचें स्पष्ट रूप देण्याची अिच्छा नसेल आणि मानवी प्रेम आणि आध्यात्मिक भक्ति अेकाच गीतानें व्यक्त करण्याची अिच्छा असेल तेथें लिंगभेद स्पष्ट करण्याची जबाबदारी ज्या भाषेंत आहे तिला ही अडचण चांगलीच जाणवते.

असो. मराठीला ही अडचण दूर करतां येत नाहीं. तेव्हां अनुवादकानें त्या त्या क्षणीं आपल्या अभिरुचि किंवा वृत्तीप्रमाणें लिंग वापरावें आणि वाचकांनीं आपल्या अभिरुचीप्रमाणें वाटल्यास तें बदलून घ्यावें असें सुचवल्यावांचून गत्यंतर नाहीं.

*　　*　　*

अीश्वराचें प्रत्यक्ष स्मरण, चिंतन आणि ध्यान करत असतांना होणारा अनुभव निराळा आणि जीवनव्यवहारांत गढून गेलें असतां आणि त्यामुळें जीवन-स्वामीचें विस्मरण झालें असतां देखील केव्हां केव्हां व्यवहाराच्या बाहेरचा अुत्कट अनुभव येतो तो निराळा. अेखाद्या वेळीं ज्याप्रमाणें अकारण अेखादी चुटपुट लागते, चुकल्या चुकल्यासारखें होतें; आनंदांत असूनदेखील विषादाचा स्पर्श होअून जातो ( पर्युत्सुकी भवति यत् सुखितोऽपि जन्तुः ), त्याचप्रमाणें केव्हां केव्हां कांहीं कारण नसतांना आणि क्वचित् प्रसंगीं प्रतिकूल परिस्थिति असतांनादेखील मनांत अेक प्रकारच्या आनंदाचा अुदय होतो, समृद्धीचें सुख अनुभवयास मिळतें, आणि संघर्ष चालू असूनदेखील सौमनस्य आपल्याला घेरून राहतें. आपल्याला आश्चर्य वाटतें. अेखाद्या पवित्र पुरुषाचें, प्रेमळ व्यक्तीचें स्मरण झाल्यासारखा आनंद अकारण फुलून अुठतो. त्याचा सुगंध आपल्याला अगदीं स्पष्टपणें जाणवतो. त्याचें संगीत आपल्याला गुदगुदल्या करतें आणि मग आपण कितीहि बेखबर असलों, गफलतींत असलों तरी ती व्यवहारी वृत्ति झाडून टाकण्याची अिच्छा होते आणि त्या दिव्य आनंदामुळेंच, अतर्क्य

सुखामुळेंच त्याचें मूळ शोधण्याची अिच्छा जागते आणि मग आपण जबरदस्तीनें खेंचल्या-प्रमाणें ध्यानावस्थेंत पोहोंचतों.

पवित्र व्यक्तीच्या स्मरणानें पवित्र वातावरण अुत्पन्न होणें हा अेक प्रकार; आणि कांहीं कारणावांचून प्रसन्न पवित्र वातावरणाचा अनुभव झाल्यामुळें पवित्र व्यक्तीच्या किंवा परमात्म्याच्या ध्यानाकडे खेंचलें जाणें हा दुसरा प्रकार. प्रत्येक प्रकाराची खुमारी वेगळीच असते. सूक्ष्मवेदी कविच हा भेद ओळखूं शकतो आणि आपल्याला त्याचा परिचय करून देअूं शकतो.

पारिजाताचें नाजुक फूल असतें सफेद. जरा शिळें झालें तर त्याचा पांढरा रंग थोडासा तेलकट होतो. पण फुलाचा देठ असतो पोवळ्याप्रमाणें पिवळसर लाल. या देठाची छाया फुलांत पसरल्यामुळें कवीनें पारिजाताला अरुणवर्ण म्हटलें आहे. अेखाद्या परडीमध्यें पारिजातकाच्या फुलांचा ढीग करावा आणि तो दुरून पहावा म्हणजे कवीनें पारिजातकाला अरुणवर्ण म्हटलें आहे याचें औचित्य मनाला अुत्तम पटतें.

भक्त घोर निद्रेंत जरी असला तरी अीश्वराची करुणार्द्र दृष्टि त्याचेवर पडल्यानंतर त्या दृष्टीचा परिणाम झोपेंतदेखील अुमटल्यावांचून रहाणार नाहीं. त्याला झोपेंत गोड स्वप्नें पडूं लागतात. त्याला घेरणारा अंधारहि आनंदानें स्फुरूं लागतो आणि त्याची अुपेक्षित धूळ खात पडलेली वीणा आपोआप गुंजारव करूं लागते.

अीश्वराचें भक्ताविषयींचें जागरूक प्रेम ही अीश्वराची साधना. हिचा फायदा भक्ताला मिळाल्यावांचून कसा राहील?

सुन्दर, तुमि अेसेछिले आज प्राते
अरुणबरन पारिजात लये हाते।
निद्रित पुरी, पथिक छिल ना पथे,
अेका चलि गेले तोमार सोनार रथे,
बारेक थामिया मोर बातायन-पाने
चेयेछिले तब करुण नयनपाते।
सुन्दर, तुमि अेसेछिले आज प्राते।

स्वपन आमार भरेछिल कोन गन्धे,
घरेर आँधार कैंपेछिल की आनन्दे,
धुलाय-लुटानो नीरब आमार बीणा
बेजे अुठेछिल अनाहत की आघाते ।

कतबार आमि भेबेछिनु अुठि-अुठि,
आलस त्यजिया पथे बाहिराअि छुटि,
अुठिनु जखन तखन गियेछ चले—
देखा बुझि आर हल ना तोमार साथे ।
सुन्दर, तुमि अेसेछिले आज प्राते ।

" हे परमसुन्दर, अरुणवर्णाचा पारिजात हातीं घेअून आज सकाळीं तूं आलास. सारें नगर निजलेलें होतें, रस्त्यावर अेकहि वाटसरू नव्हता. तूं जसा आलास तसाच स्वतःच्या सोन्याच्या रथांत बसून चालता झालास. पण जातां जातां क्षणभर माझ्या खिडकीसमोर थांबून तूं आपल्या प्रेमपूर्ण नयनांनीं मजकडे पाहिलेंस. मी अुठलों नाहीं हें खरें पण माझें साखरझोंपेंतील स्वप्न अेकाअेकीं अद्‌भुत सुगंधानें सुगंधित झालें. घरांतील अंधार तुझा क्षणिक स्पर्श होतांच आनंदभरानें हर्षपुलकित झाला आणि माझी धुळीमध्यें पडलेली नीरव वीणा देखील तुझ्या किरणांच्या अद्‌भुत आघातानें अनाहत ध्वनि गुंजूं लागली.

अितका गोड अनुभव आल्यानंतर नुसतें पडून रहावेना. आणि अुठण्याचीहि अिच्छा होअीना. आतां अुठतों आतां अुठतों असें करीत कांहीं काळ जाअूं दिला. शेवटीं जेव्हां आळस झाडून नारायणाचें दर्शन करण्यासाठीं बाहेर रस्त्यावर आलों तेव्हां तो निघून गेला होता. सर्व दिवस आकाश मेघमेदुर झाल्यामुळें नारायणाचें दर्शन पुनः झालेंच नाहीं पण सर्व दिवस हें स्मरण

ताजेंच राहिलें कीं, तूं सुन्दर रूप धारण करून माझ्यासाठीं आला होतास आणि मी जरी निद्राग्रस्त होतों तरी स्वतःचा वरदहस्त माझ्या मस्तकावर तूं ठेवून गेला आहेस. थरारलेला घरांतील अंधार, घमघमणारें माझें स्वप्न आणि मधुर अनुरणन करणारी माझी वीणा तुझ्या त्या प्रसादाचे साक्षी आहेत."

# ३९

मध्यकालीन भक्तांनीं आणि त्यांच्या पूर्वीं पुराणकारांनीं अनेक गोष्टींच्या द्वारा आपल्या मनावर ठसवलें आहे कीं ओीश्वर आपली परीक्षा पहाण्यासाठीं केव्हांहि कोणतेंहि रूप घेअून येओील. कधीं भेडसावील, कधीं अघोरीपणानें वागेल. कधीं आपली कठोर कसोटी करील. न मागायचें मागूं लागेल आणि आपल्याला गोंधळांत टाकील. जो खरा आणि अनन्य भक्त असेल तो भ्रमांत पडणार नाहीं. कसल्याहि स्थितींत ओीश्वराला ओळखून काढील आणि त्याच्या अिच्छेला अनुकूळ होओील. ज्यांनीं म्हणून अशा पौराणिक गोष्टी वाचल्या आहेत त्यांना वरील वर्णनाची चटकन प्रतीति येओील. ओीश्वर सर्वांभूतीं आहे, सर्व ठिकाणीं आहे, कोणच्याहि रूपानें तो प्रकट होअूं शकतो आणि आपल्या श्रद्धेची आणि अनुभूतीची कसोटी करूं शकतो.

हें झालें जगांत वावरणाऱ्या आणि आपल्या संबंधांत येणाऱ्या व्यक्तींविषयीं आणि पशुपक्ष्यादि प्राणिजीवांविषयीं. पण कवि म्हणतो कीं माझ्या भोंवतीं पसरलेलें हें विश्व-समस्तदेखील ओीश्वराचा अवतारच आहे. नेत्र, श्रोत्र, वाक्, त्वक्, आणि रसना इत्यादि सर्व अिंद्रियांनीं आपण जो कांहीं अनुभव घेतों, त्यांतूनदेखील ओीश्वर प्रकट होऊं शकतो व त्यांतूनदेखील आपल्याला ओीश्वराचा साक्षात्कार होअूं शकतो. चित्तवृत्ति ओीश्वरमय

झालेली असली व त्यामुळें जीवन अेकाग्र पवित्र झालेलें असेल तर त्यामुळेंदेखील आपल्याला अीश्वराचा अनुभव मिळूं शकतो.

काव्यमय ध्यानाच्या विशिष्ट साधनेनें कवीला या बाजूचा साक्षात्कार झाला आहे आणि म्हणून तो जीवन-स्वामीला आळवीत आहे कीं हें निमल अुज्ज्वल कान्त, सुन्दर स्निग्ध प्रशान्त, मला तुझें दर्शन, तुझा साक्षात्कार माझ्या सर्व अिन्द्रियांतून, प्राणांतून आणि कर्मांतून होत राहो. आणि हा साक्षात्कार अनंत रूपानें, अनंत प्रकारें नित्यनूतन होत राहो. भगवंताच्या विभूतिविस्ताराला जसा अंत नाहीं तसा माझ्या जीवनसाक्षात्काराला देखील अंत नसावा, मर्यादा नसावी. अेक्तेचा अनुभव आणि आनंद अनेकानेक प्रकारें घेत राहणें हेंच तर त्या लीलानाटकी सर्वसमर्थ प्रभूच्या साक्षात्काराचें मुख्य लक्षण आहे.

तुमि नब नब रूपे असो प्राणे।
अेसो गन्धे बरने, अेसो गाने।
अेसो अंगे पुलकमय परशे,
अेसो चित्ते अमृतमय हरषे,
अेसो मुग्ध मुदित दु नयाने।
तुमि नब नब रूपे अेसो प्राणे।

अेसो निर्मल अुज्वल कान्त,
अेसो सुन्दर स्निग्ध प्रशान्त,
अेसो अेसो हे विचित्र बिधाने।
अेसो दु:खे सुखे अेसो मर्मे,
अेसो नित्य नित्य सब कर्मे,
अेसो सकल कर्म-अबसाने।
तुमि नब नब रूपे अेसो प्राणे।

"नवीं नवीं रूपें धारण करून माझ्या प्राणांत येऊन रहा. गंधानें किंवा वर्णानें ध्यान खेंचणाऱ्या पदार्थजातामध्यें तूंच प्रगट हो आणि माझ्या गायनामध्यें देखील तूंच गायिला जा.

माझ्या अंगप्रत्यंगांमध्यें तुझ्या पुलकित स्पर्शानें प्रवेश कर. माझ्या चित्तांत अमृत-मय हर्षानें तूं प्रकाशित हो. निरतिशय आनंदामुळें मिटून घेतलेल्या माझ्या दोन्हीं भोळ्या डोळ्यांतूनदेखील तूंच प्रगट हो. आणि अशा रीतीनें नवनव रूपानें माझ्या प्राणांमध्यें तूं प्रस्फुरित हो. तूं निर्मळ, उज्ज्वल, कांतिमान आहेस, सुंदर, स्निग्ध (प्रेमळ) आणि प्रशान्त आहेस. असा तूं माझ्यामध्यें प्रवेश कर. मला कृतार्थ करण्यासाठीं अघटित-घटना-पटीयसी अशी तुझी शक्ति व्यक्त करीत करीत ये. माझ्या सुखदुःखांत तूंच असावेंस. माझ्या मर्मांत आणि माझ्या कर्मांत नित्य नित्य तूंच दिसावेंस आणि जेव्हां माझीं सर्व कर्मे संपतील आणि विरामाची वेळ येईल तेव्हांहि तूंच उरावेंस. नवनवीन रूपें धारण करून हे हृदयेश्वरा, माझ्या प्राणांत तूं अखंड वसावेंस.

# ४०

**क**वढा भयानक भविष्यवाणी ! 'करावें तसें भरावें;' दुसऱ्यासाठीं खड्डा खणावा आणि आपणच त्यांत पडावें. धर्मानें सांगितलें — आत्मनः प्रतिकूलानि परेषां न समाचरेत् । 'स्वतःला जें प्रतिकूल असेल तें दुसऱ्यासाठीं पेरूं नये.' हा झाला अुपदेश. हाच जेव्हां अभिशापाचे रूपानें मांडला जातो तेव्हां त्याचें रूप खालीलप्रमाणें होतें : दुसऱ्याचें जें म्हणून कांहीं वाअीट करावयास जाशील तेंच, — तेंच तुझ्यासाठीं वाढून येणार आहे, कांहीं केल्या तें टळणार नाहीं.

हा नियम जितका व्यक्तीला लागू आहे, तितकाच तो समाजाला आणि राष्ट्रालाहि लागू आहे. 'करावें तसें भरावें' हा सिद्धांत जर जगांत सार्वभौम नसता तर जग म्हणजे महापापाचा अेक ढीगच होअून बसलें असतें. भगवंतानें हें विश्व तयार केलें आणि त्याचें ओझें वाहावें लागूं नये म्हणून फिटंफाटीचा नियम त्यानें त्याला लावून दिला. यामुळेंच जग स्वतःचा भार स्वतः अुचलून जाअूं शकत आहे.

ज्याला हा नियम समजला तो कसलीच आंधळी प्रवृत्ति करणार नाहीं. आपल्या प्रत्येक कर्माचें फळ ओळखून जें अिष्ट असेल तेंच तो करीत राहील.

कर्माचा हा अटल सिद्धांत ठाऊक नसल्यामुळें किंवा ठाऊक असूनहि आचरणांत अुतरला नसल्यामुळें मोठ्या मोठ्या राष्ट्रांना भयंकर विटंबनेंतून पसार व्हावें लागतें.

जे क्रांतदर्शी ऋषि असतात त्यांना हा सर्व क्रियाकलाप आणि त्यांच्या फलांचा विस्तार स्पष्ट दिसत असल्यानें ते केव्हां केव्हां मनुष्यजातीला परम कारुणिक हृदयानें परंतु भयानक शब्दांत सुचवून ठेवतात —

'हांसत कर्म करावें, भोगावें रडत तेंचि परिणामीं।'

ज्याला आपण सामान्य भाषेंत शाप म्हणतों तो खरोखर शाप नसतो; पण कर्मफळाचें विद्युल्लतेप्रमाणें झालेलें दिग्दर्शन असतें. अंधाऱ्या रात्रीं सर्व दिशा धुंद झाल्या असाव्यात आणि मध्येंच वीज चमकून आसपासचा सर्व प्रदेश दूरवर प्रगट व्हावा, त्याप्रमाणें त्रिकाळदर्शी महात्म्याला अेखाद्या दुराचाराचा अत्यंत क्रोध आला म्हणजे त्या अुत्कट भावनेच्या योगानें त्या दुराचाराचें फळहि त्याला विजेच्या चमकेसारखें डोळ्यांपुढें प्रत्यक्ष होतें आणि पुढें काय ओढवणार आहे तें त्या दुर्दैवी दुराचाऱ्याला सावध करण्यासाठीं तो अेकाअेकीं सांगून टाकतो. भयग्रस्त पामर त्या अुग्र वाणींत नियतीचें प्रतिबिंब पाहण्याअैवजीं क्रोधाचा परिपाकरूप शाप पहातो आणि दुःखपेलव होअून कृपणाप्रमाणें अुःशाप मागूं लागतो. हा अुःशाप म्हणजे कांहीं शिक्षेंतील सूट नव्हे. पण मनुष्य ज्या मानानें पश्चात्ताप करून आपल्या आचरणांतील मलिनता धुवून काढील त्या मानानें दुराचाराचा परिणामहि सौम्य झाल्यावांचून राहणार नाहीं. गांवाला आग लावणाऱ्या आततायाला जर आपण सांगितलें कीं, 'तुझ्या घराचीदेखील राखरांगोळी होणार आहे' आणि तें अैकतांच जर तो गयावया करूं लागला कीं, 'मला यांतून वांचवा' तर आपण त्याला दुसरें काय सांगणार? ज्या हातानें आग लावलीस त्याच हातानें पाणी शिंपडण्याचा प्रयत्न कर. बाहूमध्यें शक्ति असेल ती सगळी वापरून आगीचा बंब चालवूं लाग, म्हणजे तूंहि वांचशील आणि तुझे शेजारीहि वांचतील.

येथें शाप कुठें आला आणि अुःशाप कुठें अवतरला? सर्व केवळ नियतीचें आकलनचा आहे.

प्रस्तुत गीतामध्यें अस्पृश्यतेचें महापाप आचरणाऱ्या भारत देशाला कवीन्द्र प्रथम अुःशापाचा अुपाय सांगतात आणि तेवढें हातून न घडलें तर नियतीचा शाप कोठवर नेअून पोहोंचवील, अधःपात, नाश कसा घडवून आणील, हें सांगून विराम पावतात.

हे मोर दुर्भागा देश, जादेर करेछ अपमान
अपमाने हते हबे ताहादेर सबार समान।
मानुषेर अधिकारे
वञ्चित करेछ जारे,
सम्मुखे [1]दाँड़ाये रेखे तबु [2]कोले दाओ नाञि स्थान,
अपमाने हते हबे ताहादेर सबार समान।

मानुषेर परशेरे प्रतिदिन ठेकाञिया दूरे
घृणा करियाछ तुमि मानुषेर प्राणेर ठाकुरे।
विधातार रुद्ररोषे
दुर्भिक्षेर द्वारे ब'से
भाग करे खेते हबे सकलेर साथे अन्नपान।
अपमाने हते हबे ताहादेर सबार समान।

तोमार आसन हते जेथाय तादेर दिले [3]ठेले
सेथाय शक्तिरे तब निर्वासन दिले अवहेले।
चरणे दलित हये
धुलाय से जाय बये—
सेञि निम्ने नेमे[4] एसो, नहिले नाहि रे परित्राण।
अपमाने हते हबे आजि तोरे सबार समान।

---

१. दाँड़ाये रेखे – उभे ठेवून. २. कोले – मांडीवर. ३. ठेले – ढकलून. ४. नेमे एसो – उतरून ये.

जारे तुमि नीचे [5]फेल' से तोमारे बाँधिबे जे नीचे,
पश्चाते रेखेछे जारे से तोमारे पश्चाते [6]टानिछे
अज्ञानेर अन्धकारे
आड़ाले ढाकिछ जारे
तोमार मंगल ढाकि गड़िछे से घोर व्यवधाने ।
अपमाने हते हबे ताहादेर सबार समान ।

शतेक शताब्दी धरे नामे शिरे असम्मान भार,
मानुषेर नारायणे तबुओ कर ना नमस्कार ।
तबु नत करि आँखि
देखिबारे पाओ ना कि
नेमेछे धुलार तले हीन-पतितेर भगवान ।
अपमाने हते हबे सेथा तोरे सबार समान ।

देखिते पाओ ना तुमि मृत्युदूत दाँड़ायेछे द्वारे,
अभिशाप आँकि दिल तोमार जातिर अहंकारे ।
सबारे ना जदि [7]डाक',
एखनो [8]सरिया थाक',
आपनारे बेंधे राख' चौदिके जड़ाये अभिमान–
मृत्युमाझे हबे तबे चिताभस्मे सबार समान ।

"हे माझ्या दुर्भागी देशा, ज्यांचा अपमान करीत आहेस तोच अपमान तुला स्वतः सहन करून त्या सर्वांशीं तुला समान व्हावें लागणार आहे. ज्यांना

---

५. फेल'–फेंकतोस. ६. टानिछे–खेंचतो. ७. डाक'–बोलविलेस. ८ सरिया थाक'–दूर राहिलास.

मनुष्यत्वाच्या अधिकारापासून तूं वंचित ठेवतोस, स्वतःच्या समोर अुभें करून ठेवूनदेखील ज्यांना भाअू म्हणून मांडीवर घेण्याची तुला बुद्धि होत नाहीं; त्या सर्वांशीं समान व्हावें लागणार आहे.

माणुसकीच्या स्पर्शापासून ज्यांना तूं दूर ठेवतोस आणि अशा रीतीनें हृदयांत आणि प्राणांत बसणाऱ्या भगवंताचा तिरस्कार करतोस, याचें फळ म्हणून तुला विधात्याच्या क्रोधाचा बळी होअून दुष्काळाचें दूवारीं बसून सर्वांच्या बरोबर पत्रावळी चाटाव्या लागणार आहेत आणि तो अपमान सहन करून तुला सर्वांशीं अेकरूप व्हावें लागणार आहे.

तुझ्या आसनावरून त्याला तूं जेथें लोटून दिलेंस तिथेंच तूं स्वतःच्या सामर्थ्याला अवहेलनापूर्वक हांकून लाविलें आहेस असें समज. पायीं तुडविलें गेल्यानें ज्या धुळींत ते जाअून पोंचले त्याच नीच जागीं जोंवर तूं अुतरला नाहींस तोंवर तुझें परित्राण व्हावयाचें नाहीं. आज तुला अपमानाद्वारा सर्वांशीं समान आणि अेकरूप व्हावयाचें आहे.

ज्याला तूं खालीं फेंकून देतोस तो तुला स्वतःशीं बांधून खालीं आणतो. ही मगरमिठी तुला सुटावयाची नाहीं. ज्याची तूं हेटाळणी करून मागें ठेवतोस तो तुला मागें खेंचल्यावांचून कसा राहील ? अज्ञानाच्या अंधःकाराआड ज्याला तूं झांकून टाकिलेंस तो तुझें 'कल्याण मंगल' झांकून तुझ्यासाठीं घोर व्यवधान तयार करीत आहे. त्याचा तो अपमान स्वतःवर ओढवून घेवून सर्वांशीं तुला समान झालेंच पाहिजे.

शंभर शतकें झालीं हा अपमानाचा भार, आपल्याच भावाचा अपमान केल्याचें पाप, तुझ्या डोक्यावर अुतरत आलें आहे. अितकें झालें तरी मानवतेच्या नारायणाला नमस्कार करण्याची—त्याला शरण जाण्याची—तुला बुद्धि होत नाहीं. जरा डोळे खालीं करून पहाना ! तेथें, तुझ्या पायाखालील धुळींत, दीन पतितांचा भगवान स्वतःच अुतरलेला दिसत नाहीं का ? तेथें जाअून तो सगळा अपमान मस्तकावर धारण करून तुला सर्वांशीं समान व्हावें लागणार आहे.

काय तुला दिसत नाहीं कीं, मृत्युदूत तुझे द्वारीं अुभे आहेत; आणि तुझ्या जात्यभिमानाच्या अहंकारावर त्यांनीं अेक भयानक अभिशाप कोरून काढला आहे!

आतां जर सर्वांना तूं आपल्याकडे बोलाविलें नाहींस, अजूनहि तूं त्यांचेपासून दूरच राहशील आणि आपल्या चोहींकडे अभिमानाच्या भिंती अुभारून स्वतःला कोंडून ठेवशील, तर मृत्यूच्या द्वारें तुला सर्वांशीं चिताभस्माची समानता मिळणार आहे. वेळींच जाग, पश्चात्ताप कर आणि प्रायश्चित्त करून पुनीत हो; नाहीं तर चिताग्नीच तुला पावन करील.

# ४१

वैदिक काळचे ऋषि वाळलेल्या लाकडांचे ओंडके घेऊन त्यांच्या मंथनानें अग्नि तयार करीत असत. खळगा असलेली अेक आडवी फळी खालीं ठेवून तिच्यावर रवीप्रमाणें अेक अुभा दांडा वरून दाबून धरीत आणि दोरीनें तो दांडा खालच्या खळग्यांत घुसळत. अशा घर्षणानें अुष्णता अुत्पन्न होऊन प्रथम ठिणगी पडे. पुढें लवकरच त्यांतून निघणाऱ्या धुराची ज्वाळा होअून तें लाकूड पेटूं लागे. खालच्या लाकडाला अरणि म्हणत आणि वरच्या लाकडाला अुत्तरारणि म्हणत.

अशा अरणि-मंथनाची क्रिया यज्ञांत वारंवार येते.

हा सर्व खटाटोप अग्नीच्या ज्वालेसाठीं असे. आग पेटली म्हणजे अरणि आणि अुत्तरारणि दोन्ही तिच्या आहारीं पडावयाच्या.

आपला जीवन-व्यापारहि असाच मरणप्राप्तीसाठीं नाहीं काय ? मरण हीच जीवनाची अंतिम परिपूर्णता आहे. शेतकरी गाडा भरून धान्य बाजारांत घेअून जातो. घरचा गाडाहि त्याला विकावयाचा होता आणि बैलाची जोडीहि घरीं फाजील पडत असल्यामुळें काढून टाकावयाची होती. त्यानें प्रथम धान्य विकलें, मग गाडा विकून टाकला. बैलांची जोडीहि

चांगलेसें गिन्हाअीक पाहून त्याच्या गळ्यांत बांधली आणि नक्द रुपये हातीं घेअून हलकेपणें तो घरीं आला. जातांनाचा भार येतांना मुळींच नव्हता.

मरणाचेंहि असेंच आहे. जीवनभर जो खटाटोप केला, त्यांतून मिळणारी अनुभूति पदरीं बांधून घेतली म्हणजे हा सगळा पसारा सोडून द्यावयाचा असतो. परम आत्मीय असें जें शरीर तें देखील सोडून देअून मोकळें व्हावयाचें आणि अेका जन्मांत जें कांहीं सत्त्व मिळविलें असेल तें हातीं घेअून मरणाच्या घरीं पोंचावयाचें. शेती करून धान्य मिळविलें आणि तें विकून नक्द रुपये केले. रुपये देअून अेक रत्न मिळविलें आणि कृतार्थ झालों अशासारखाच हा प्रकार आहे. हा शेवटचा घास गोड व्हावा म्हणूनच जन्मभर अितकी आटाटी केली.

ज्याला जीवन-रहस्य कळलें तो गौरीहरापुढें बसलेल्या सतीप्रमाणें मरणाची प्रतीक्षा करीत राहील. अितर लोक मात्र मरणाच्या भयानें अर्धमेले होतात आणि सगळें जीवन विफल करतात. पतिव्रता नववधूला पतीची भीति वाटावी कीं अुत्कंठा ? दोन्ही स्वाभाविक आहेत. दोन्ही अेकाच वेळीं वाटणेंहि शक्य आहे. पण पतीची भीति ही क्षणिक असते, प्रीति स्थायी असते, येवढें तरी निदान वधूला समजलें पाहिजे.

मरणाची भीति मनुष्यांमधें अितकी कांहीं दृढमूल होअून बसली आहे कीं मरणाची परम कारुणिकता, मरणाची सुन्दरता आणि मरणामधें प्राप्त होणारी जीवनाची सफलता लोकांच्या ध्यानांतच येत नाहीं. दिवसाच्या श्रमानंतर झोंप मिळावी अशी आपण आशा करतों. स्वयंपाकाच्या खटाटोपीनंतर जेवण मिळावें आणि आहार संपवून तृप्तीचें आपण अधिकारी व्हावें, त्याचप्रमाणें जीवनाचे अंतीं मरण मिळावें हा आपला अधिकार आहे, ही आपली कृतार्थता आहे आणि सफलता आहे हेंच लोक विसरून जातात. जीवनाचे शेवटीं जर मरण मिळालें नाहीं तर दिवसभर राबून मुशाहिरा मिळाला नाहीं असें वाटण्याचे अैवजीं आणि मरण माझें हक्काचें आहे, तें मला कसें देत नाहींस तें पहातों असा देवाकडे झगडा करण्याचे अैवजीं लोक मरण कसें टळेल याचाच विचार करीत असतात. आणि देवाला तऱ्हेतऱ्हेची लांच देअू करून मरण पुढें लोटण्याचा प्रयत्न करीत असतात !

अशा मनुष्य-समाजाला मरणाचें स्वरूप समजावून सांगण्याचें काम रवीन्द्रनाथांनीं अनेक प्रकारें केलें आहे. आणि जणूं काय मरणानें त्यांना हें कार्य अुत्तमपणें करतां यावें

म्हणूनच चांगलीं अैशीं वर्षें या जगांत ठेवलें. मरणाला रवीन्द्रनाथांहून अधिक योग्यतेचा प्रचारक आणि वकील मिळाला नसता. रवीन्द्रनाथांचीं मृत्युकाव्यें हीं खरोखरच अुत्कृष्ट कोटीचीं भक्तिकाव्यें आहेत.

ओगो आमार अेअि जीवनेर
शेष परिपूर्णता
मरण, आमार मरण, तुमि
[1]कओ आमारे कथा ।
सारा जनम तोमार लागि
प्रतिदिन जे आछि जागि,
तोमार तरे [2]बहे बेड़ाअि
दु:खसुखेर व्यथा ।
मरण, आमार मरण, तुमि
कओ आमारे कथा ।

जा पेयेछि, जा हयेछि,
जा-किछु मोर आशा,
ना जेने धाय तोमार पाने
सकल भालोबासा ।
मिलन हबे तोमार साथे
अेकटि शुभ दृष्टिपाते,
जीवनवधू हबे तोमार
नित्य - अनुगता ।
मरण, आमार मरण, तुमि
कओ आमारे कथा ।

---

१. कओ – सांग. २. बहे बेडाअि – घेअून भटकतों.

वरणमाला गांथा आछे
आमार चित्तमाझे,
कबे नीरव हास्यमुखे
आसबे वरेर साजे।
सेदिन आमार रबे ना घर,
कअि-बा आपन, कअि-बा अपर
विजन राते पतिर साथे
मिलबे पतिव्रता।
मरण, आमार मरण, तुमि
कओ आमारे कथा।

"हे मरणा, माझ्या मरणा, माझ्या जीवनाची तूं अंतिम परिपूर्णता आहेस. तूं येअून माझ्या कानांत आपल्या गुजगोष्टी सांग. सगळा जन्म तुझ्यासाठीं मी प्रतीक्षाच करीत राहिलों, तुझ्यासाठीं वाट पहात राहिलों, जागत राहिलों आणि तुझ्यासाठीं सुखदुःखाची व्यथा वहन करीत राहिलों. आतां तुझ्या गुजगोष्टी माझ्या कानीं पडूं दे.

मी जें कांहीं मिळविलें, जें कांहीं झालों आणि जी कांहीं आशा मीं अुराशीं बाळगली तें सर्व नकळत तुझ्याकडे वाहून जाणारें माझें प्रेमच होतें. किती आनंदाची गोष्ट कीं आतां तुझी भेट होअील आणि तुझ्या अेका शुभ दृष्टि-पाताबरोबर ही जीवनवधू निष्ठापूर्वक तुझ्या मागोमाग येअील, तुझी नित्य अनुगता होअील. मरणा, माझ्या मरणा, माझ्याशीं गुजगोष्टी बोल.

माझ्या हृदयांत स्वयंवराची माळा गुंफून तयार आहे. नवरदेवाचीं मंगलवस्त्रें परिधान करून नीरव हास्यानें अुज्ज्वल झालेल्या चेहऱ्यानें तूं मजकडे केव्हां येशील? तूं येशील तेव्हां माझें हें घर अुरणार नाहीं. कोणीहि स्वकीय किंवा परकीय असे रहाणार नाहींत. विजन रात्रीच्या समयीं पतिव्रता पतीच्याबरोबर सहगमन करील. मरणा, माझ्या प्रिय सख्या मरणा, आपल्या गुजगोष्टी मला सांगून टाक, तुझें रहस्य माझ्या कानीं पडूं दे.

# ४२

दिवस आणि रात्र मिळून ज्याप्रमाणें दिवस होतो, त्याचप्रमाणें जीवन आणि मरण मिळून समग्र जीवन बनत असतें. हास्य आणि रुदन, प्रसाद आणि विषाद हीं दोन्ही मिळूनच आनंद परिपूर्ण होत असतो. जो दिवस रात्रीला भिऊन असतो तो खरा दिवस नव्हे. दुःख प्राप्त होतांच जें कोमेजून जातें तें सुख सुख नव्हे. डोळ्यांची अुघडझांप चालू असणें म्हणजेच स्थिर पहाणें आहे, डोळ्यांच्या अुघडझांपीमुळें पहाण्यांत कधींच बाधा येत नाहीं, अेवढेंच नव्हे तर अशी अुघडझांप होत असते म्हणूनच ज्याप्रमाणें डोळे ताजे राहून स्पष्टपणें, निर्मळपणें पाहूं शकतात त्याचप्रमाणें सुखदुःखाची जोडी नांदत आहे म्हणूनच जीवन सारपूर्ण व सुखमय झालें आहे. अुन्हाळा आणि हिंवाळा यांचें द्वैतच जेथें विरून गेलें तेथेंच वर्ष सिद्ध झालें. भुकेची तळमळ नसेल तर ज्याप्रमाणें खाण्याची तृप्ति मिळणार नाहीं, तहानेची कोरड नसेल तर ज्याप्रमाणें जलपानाची कृतार्थता रहाणार नाहीं, त्याचप्रमाणें जगामधें दुःखामागून सुख येतें, सुखानंतर दुःख पुन्हा डोकावतें, म्हणूनच तर जीवनांत कांहीं अर्थ आला आहे. ही गोष्ट जर समजली नाहीं तर जीवनाची खोलीच समजावयाची नाहीं. प्रथम प्रथम या द्वैतामुळें मनुष्य गोंधळून जातो, जेरीस येतो; पण पुढें जीवनाचा जसजसा साक्षात्कार होअूं लागतो तसतसें हें सर्व यथायोग्य आहे अशी खात्री पटते.

*जेन शेष गाने मोर सब रागिणी पुरे* ..............................

मग मात्र सर्वत्र आनंदच आनंद भरलेला आहे असा अनुभव येतो. अशा अनुभवाच्या गीतांमधें कांहीं औरच आनंद भरलेला असतो. सुख आणि दु:ख, जीवन आणि मरण, मौन आणि वाणी यांच्यामधील द्वैत पूर्व आणि पश्चिमेच्या द्वैतासारखेंच आहे. या दोन दिशा दिसायला परस्पर विरोधी असतील, पण त्या अेकमेकींवांचून राहूंच शकत नाहींत. अेका बाजूनें पहातां जिला आपण पूर्व म्हणतों, तीच दुसऱ्या बाजूनें पहातां पश्चिम ठरते अितकें या दोघींमधें अद्वैत आहे. हें अद्वैत पारखलें, पटलें आणि अंगीं मुरल्यानंतर जें गायन जीवनांतून स्फुरतें तेंच गायन अंतिम गायन होय. तेथें द्वैतहि दिसतें आणि अद्वैतहि असतें.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे आनंदाच्या अनंत विभूति आहेत. ज्याप्रमाणें जो शिव आहे तोच रुद्र आहे, जी दुर्गा आहे तीच शान्ता आहे. त्याप्रमाणें सुख आणि दु:ख हे त्या आनंदाचेच दोन निरनिराळे अवतार आहेत. सुख आणि दु:ख हीं हरिहराप्रमाणें किंवा अर्धनारीनटेश्वराप्रमाणें जगभर आणि जीवनभर आपली विचित्र लीला नटवीत असतात. याचा ज्यांना साक्षात्कार झाला .त्यांच्या गायनांत अेकांगीपणा नसतो, त्या गायनांत जीवन सर्वस्व भरलेलें असतें.

जेन शेष गाने मोर सब रागिणी पुरे —
आमार सब आनन्द मेले ताहार सुरे ।
जे आनन्दे माटिर धरा हासे
अधीर हये तरु लताय घासे,
जे आनन्दे दुअि पागलेर मतो
जीवन मरण बेड़ाय भुवन घुरे —
सेअि आनन्द मेले ताहार सुरे ।

जे आनन्द आसे झड़ेर वेशे,
घुमन्त प्राण जागाय अट्ट हेसे ।
जे आनन्द दाँड़ाय आँखिजले
दु:ख-व्यथार रक्तशतदले,

जा आछे सब्र धुलाय फेले दिये
जे आनन्दे वचन नाहि फुरे—
सेभि आनन्द मेले ताहार सुरे।

"माझें शेवटचें गाणें असें असावें कीं, जन्मभर गायिलेल्या सर्व रागिण्या त्यांत येऊन बसाव्यात, त्यांत दिसाव्यात आणि अुत्तम रीतीनें त्या शेष रागिणींच्या सुरामध्यें माझा सर्व आनंद पूर्णपणें मावावा.

ज्या आनंदामुळें ही मृत्तिकेची धरा हसूं लागते आणि त्या हास्याची अुत्कटताच तरु-लता आणि गवताच्या रूपानें प्रगट होते, ज्या आनंदामुळेंच जीवन आणि मरण अुन्मत्ताप्रमाणें हातांत हात घालून या जगावर फुगडी खेळत अथवा पिंगा घालीत फिरतात, तो आनंद माझ्या त्या शेवटच्या गायनाच्या आलापामध्यें व्यक्त झाला पाहिजे.

जो आनंद तुफान वारा आणि पावसाच्या झडीच्या वेषानें येतो आणि जीवमात्राला आपल्या अट्टाहास्यानें खडबडून जागें करतो, जो आनंद दुःखव्यथेच्या लाल कमळामध्यें अश्रुजलाच्या रूपानें शोभून अुठतो आणि जो आनंद सर्व कांहीं धुळींत फेंकून देऊन अेक निश्वास देखील तोंडावाटें येअूं देत नाहीं, तोच आनंद माझ्या या शेवटच्या गाण्याच्या आलापामधून व्यक्त होवो.

माझ्या अंतिम गानामध्यें जीवनाच्या सर्व विभूति अेकवटाव्यात आणि त्या गायनानें माझें जीवन-सर्वस्व घेअून जीवन-स्वामीच्या चरणीं पोंचावें."

# ४३

जे खरोखर आळशी असतात त्यांना आपला आळस झांकण्यासाठीं कांहींना कांहीं बहाणा सांगावा लागतो. ज्यांना ताबडतोब कांहीं करावयाचें नसतें ते अुद्याचा वायदा बोलतात. वर्तमानकाळांत जे हरलेले असतात ते भविष्य-काळावर विसंबून आशेचे मांडे मनांतल्या मनांत खात असतात.

अुलटपक्षीं ज्यांच्याजवळ कांहीं निश्चित आदर्श आहे, ज्यांना कांहीं थोर कृत्य करावयाचें आहे, त्यांना बारीकसारीक तुच्छ कामांत गुंतून घेणें परवडावयाचें नाहीं. आपल्या कामाचा मुहूर्त येअीतोंपर्यन्त त्यांना थांबलेंच पाहिजे. अशा वेळीं हे आळशी आहेत, यांना कांहींच करायला नको, यांच्यापुढें खरोखर कांहीं आदर्शच नाहीं, निष्कारण गगनविहार करीत रहातात अशी जर टीका झाली तर ती त्यांना मुकाट्यानें सहनच करावी लागते. गगनविहारी आळश्यांचा अेक खराखुरा वर्ग जोंपर्यन्त जगांत आहे तोंपर्यन्त ' आम्ही त्यांतील नहों ' असें नुसतें म्हणून चालावयाचें नाहीं. आज तुम्ही जी टीका कराल ती मुकाट्यानें सहन करूं. कुणी सांगावें आम्ही तसे आळशीनंदन खरोखरीच असलों तर ! आमचा मुळींच आग्रह नाहीं कीं जगानें आमच्यावर विश्वास ठेवावा—आम्हांला अितरांहून निराळें समजावें.

पण आमचें आम्हांला ठाऊक आहे कीं आम्हीं असे स्वस्थ कां बसलों आहोंत. घरांत जर लुंग्यासुंग्यांना पाहुणे म्हणून बोलावून घर भरून काढलें तर जेव्हां खरोखरीच तो महान अतिथि येईल तेव्हां त्याचेसाठीं जागाच उरणार नाहीं. म्हणून घर रिकामें ठेवल्याची टीका किंवा निंदा सहन करूनदेखील आम्ही त्या अतिथिवर्याची वाट पहात बसणार. जर तर तो वेळींच आला किंवा शेवटीं आणि आम्ही सगळें घर आणि आपली सारी शक्ति त्याचे चरणीं अर्पण केली तर आमचें आतांपर्यन्तचें वाट पहाणें सकारण झालें असें सिद्ध होईल. तसें न घडलें तर लोकांत आमचें हसें होओईल कीं, 'यांना कांहींच करावयाचें नव्हतें, यांना आपला अनिर्णय आणि आळस झांकूनच ठेवावयाचा होता. तसें झालें तर आम्हांला त्याची हरकत नाहीं. जर तो आला, त्यानें आमचा स्वीकार केला तर आम्ही कृतार्थ झालों. तसें तर न घडलें तर जगामधें फजीत होण्याची आमची तयारी आहे. लोक आमच्यावर रागावोत, त्रासून जावोत. आमची निन्दा करोत, आम्हांला दोष लावून त्याबद्दल शिक्षा करोत; हें सर्व आम्ही सहन करूं. आमची आळशांत गणना झाली, आमची हेटाळणी झाली तरी आमची हरकत नाहीं...

'खाओीन तर तुपाशीं, नाहींतर उपाशीं', ही म्हण आमच्यापुढें मांडून आमचा कुणी उपहास केला तर म्हणूं कीं खरोखर आमची अशीच वृत्ति आहे खरी. ती उपहास करण्यास पात्र असेल तर आमचा जरूर उपहास करा. आम्ही तो सहन करूं. पण आहे तें कोठें जाणार ? अर्पण होऊं तर त्या प्रेमेश्वराच्याच हातींच अर्पण होऊं.

प्रेमेर हाते धरा देब
तात्रि रयेछि बसे;
अनेक देरि हये गेल,
दोषी अनेक दोषे।
विधिविधान-बाँधन-डोरे
धरते आसे, जाअि जे [1]सरे —
तार लागि जा [2]शास्ति नेबार
नेब मनेर तोषे।

१. सरे – निसटून. २. शास्ति – शिक्षा.

प्रेमेर हाते धरा देब
तामि रयेछि बसे।

लोके आमाय निन्दा करे,
निन्दा से नय मिछे —
सकल निन्दा माथाय धरे
रब सबार नीचे।
शेष हये जे गेल बेला,
भाङ्ल [3]बेचा-केनार मेला —
डाकते जारा एसेछिल
फिरल तारा रोषे।
प्रेमेर हाते धरा देब
तामि रयेछि बसे।

" प्रेमाच्या हातीं स्वतःला अर्पण करून घ्यावें म्हणून मी बसून राहिलों आहे. पुष्कळ अुशीर झाला आहे. अनेक दोष आणि क्षति माझ्या हातून घडत आहेत. लोक विधिविधानाच्या बंधनरज्जूंत मला बांधूं पहातात. पण मी त्यांतून नेमका निसटतों. या माझ्या अपराधाबद्दल जी कांहीं शिक्षा मला होणार असेल ती मी राजीखुशीनें स्वीकारीन. कारण प्रेमाच्याच हातीं स्वतःला अर्पण करण्यासाठीं मला बसून रहावयाचें आहे.

लोक माझी निंदा करतात आणि ती निंदा गैरवाजवी आहे असेंहि नाहीं. मी तर सगळी निंदा शिरसा धारण करून सगळ्यांच्या शेवटीं बसावयास तयार आहे.

वेळ निघून गेली, क्रयविक्रयाचा हाट अुठला. जे लोक मला बोलवावयास आले होते ते त्रासून रागारागानें परत गेले. मला प्रेमाच्याच हातीं स्वतःला अर्पण करावयाचें आहेच, म्हणून मी असा येथें ( आळशासारखा ) अकर्मण्य होअून बसलों आहें."

---

३. बेचा-केनार — विक्री-खरेदीचा.

# परिशिष्ट – १

## कांहीं टीपा

**गीत क्र० १९**

कोन भुले आज सकल भुलि
आछि आकुल ह'ये

अत्यंत अुत्कट सुखाचे क्षण अनुभवीत असतां मनांत क्षणोक्षणीं भीति अुठत असते कीं हे क्षण टिकतील का ? थोडीबहुत तृप्ति देअून मग जातील का ? क्षणभर वेड लावून मागें फक्त चुटपुटच ठेवून जातील का ? या शंकेमुळें जे कांहीं सुखाचे क्षण मिळाले असतील त्यांचें सुखहि निर्वेधपणें भोगतां येत नाहीं. सुख अगोदर अत्यल्प आणि तेंहि अशा शंका भीतीनें कालवलेलें. यांत मनुष्यानें समाधान कसें मानावें ?

आणि जेव्हां दुःखाचे दीर्घ क्षण येतात तेव्हां देखील मनांत शंका अुठते कीं यांचा कधींतरी अंत होणार आहे कीं आपलाच अंत हे पहाणार आहेत ? आलेलें दुःख गेल्यावांचून रहाणार नाहीं असा विश्वजनीन अनुभव असला तरी अशा वेळीं तो कामीं येत नाहीं. घाबरलेल्या मनुष्याला वाटूं लागतें हें दुःख आतां कायमचें मागें लागलें. सुखाचे दिवस आतां कायमचे संपले.

अशी ही अस्वस्थता असल्यामुळें मनुष्य व्याकुळ होअून ओढवलेल्या दुःखाला चौपट असह्य करून टाकतो.

या दोन्ही प्रकारच्या क्षणांचा अनुभव प्रत्येकाला असतोच. पण या खेरीज ज्याच्या जवळ हृदय आहे त्याला आणखी अेक अनुभव येतो, ज्याचें पृथक्करणहि

होअूं शकत नाहीं. त्याला सुख म्हणावें कीं दुःख हेंहि ठरवितां येत नाहीं. अेक प्रकारची अुत्कट अस्वस्थता अनुभवास येते. जीव कावराबावरा होतो. बेचैनी वाटते. पण ही स्थिति दूर व्हावी असें मात्र वाटत नाहीं. स्वतःला काय होतें हेंच जेथें समजत नाहीं तेथें मनुष्य विचार तो कसला करणार ?

सर्वत्र अंधार पसरला असावा, पण त्यांतून शांतीचें साम्राज्य स्थापन न व्हावें म्हणून विजा अधूनमधून कडाडत असाव्यात. मधून मधून वृष्टि होत असावी. आतां संपेल मग संपेल अशी वाट पहावी, पण अेक सर संपते न संपते अितक्यांत दुःखवेगाप्रमाणें दुसरी सर जोरानें यावी. दिशा धुंद व्हाव्या. जिथें पहावें तिथें पाणीच पाणी दिसावें. आणि मग हृदयाला वाटावें कीं आतां ही मेघवृष्टि थांबावयाचीच नाहीं. हा जो पर्जन्य राहून राहून झोडपत आहे तो प्रलयकाळचाच पर्जन्य असला पाहिजे. आतां कांहीं याला विराम म्हणून असणार नाहीं.

बरें, हा प्रलयकाळचा पर्जन्य आहे असें समजून दुःखानें अभिभूत व्हावें तशी-हि वृत्ति मनांत अुठत नाहीं. बरें झालें आतां फक्त अेक पाअूसच पाअूस अुरला आहे. अितर कशाचाच विचार करावयास नको. परिवर्तन होणार असेल तरच विचार करावयाचा ना ! बरी आहे ही अेकच प्रकारची स्थिति. आतां अितर कसल्याच गोष्टीचा विचार करावयास नको, कसलीच पूर्वतयारी करावयास नको. वृष्टिधारेनें आपली सर्व मर्यादा सोडून दिली आहे. आतां जें कांहीं होत राहील त्याचा स्वीकार करत रहावयाचा. या खेरीज दुसरें कसलेंच कर्तव्य अुरलें नाहीं. आतां हा अेक पाअूस सोडून अितर कशाचाच हिशेब करण्याचें कारण नाहीं. अेक पाअूसच खरा, बाकी सर्व मिथ्या-मायारूप आहे. असेंच जेथें वाटूं लागतें तेथें अेक प्रकारचें स्थायी समाधान अुत्पन्न होतें आणि त्या समाधानाच्या धर्तीवर कधींहि न संपणारी आणि कधींहिं न ओसरणारी अशी व्याकुलता हृदयाला घेरून टाकते.

पण याचें कारण काय ? अशी ही कोणती विस्मृति डोक्यावर वरदहस्त ठेवून आपल्यासमोर अुभी आहे कीं जिच्यामुळें मन निश्चिंतहि होतें, आणि व्याकुळहि होतें. वृष्टि सर्व मर्यादा सोडून वहात आहे आणि मनहि अेकमनानें व्याकुळ होत आहे.

अशा वेळीं जर ही स्थिति बराच वेळ टिकली तर व्यक्तित्व मरून जातें आणि बाह्य स्थितीशीं अेकरूप होतें आणि बाह्य जगत् आणि आंतरिक भावना असें द्वैत अुरत नाहीं.

भर पावसाळ्यांत मध्यरात्रीं किंवा उत्तररात्रीं याचा अनुभव कधीं आला आहे कां, नाहीं?

या स्थितींत अेकप्रकारें व्यक्तित्व अितकें कांहीं अुत्कट, अेकाग्र आणि घनीभूत होतें कीं त्याच्यावांचून हा अनुभवच पदरांत पडला नसता, अशी खात्री वाटते. दुसऱ्या बाजूनें या अितक्या अुत्कट पिंडीभूत व्यक्तित्वाचा जर परिपूर्ण विसर न पडला तर त्या परिस्थितीशीं अेकरूप होतांच येत नाहीं. आणि स्वतःला विसरून परिस्थितीशीं जर अेकरूप झालों, अैक्यात्म न साधलें तर हा अनुभव फक्त कल्पनामात्रच राहील, त्याचा भरींवपणा आणि त्याची पारमार्थिक सत्यता हें व्यक्तित्व नष्ट होण्यांतच आहे. परस्पर विरोधी वाटणारी ही साधना सहजगत्या अशा वेळीं सहज सिद्ध होअू शकते, हीच या प्रसंगाची अद्‌भुतता आणि अलौकिकता आहे.

**गीत क्र. २२ ( रवींद्र-मनन-१० )**

मने कारि अमनि सुरे गाअि
कंठे आमार सूर खुंजे ना पाअि

हा अनुभव नेहमींचाच आहे. अेखादें नाटक पहावयास जावें आणि अेखाद्या नटाचें भावपूर्ण अद्‌भुत गायन अैकावें म्हणजे त्याचें असें वेड लागून जातें कीं पुनः पुनः तेंच गायन, तेच सूर मनांत घोळूं लागतात. असलें हें वेड नको म्हणून त्या गीताला आणि त्यांतील त्या आलापांना विसरून जाण्याचा प्रयत्न करावा तर कांहीं केल्या ते दूर होत नाहींत. त्यांची अशी कांहीं विलक्षण पकड असते कीं ते पुनः पुनः कानांत आणि हृदयांत गुणगुणूं लागतात.

शेवटीं वाटूं लागतें कीं हे सूर आणि हें गीत आपलेंच झालें. आपल्यांत अितकें कांहीं मुरलें आहे कीं तें आपल्यापासून निराळें होअूच शकत नाहीं. पण जेव्हां ही झालेली भावना खरी समजून ते सूर आणि ते आलाप आणि तें भावगीत

गळ्यांतून काढण्याचा प्रयत्न करतों, तेव्हां कांहीं केल्या ते गळ्यांतून निघत नाहींत. मनामध्यें जें अगदीं आपलेसें झालें तें गळ्याला अितके दूर कां असावेत याचें वैषम्य वाटून प्राण रडकुंडीस येतो आणि मग जीवनांतील हें वैषम्य अगदीं असह्य होतें. देवानें हे सर्व सूर गळ्यांतून तितकेच भावपूर्ण काढण्याची शक्ति तरी द्यावी किंवा संगीताची गोडी लावून या सुरांच्या जाळ्यांत हरणासारखें अडकावून तरी टाकूं नये!

जर सामान्य संगीताची ही गोष्ट तर विश्वसंगीताचें रहस्य समजण्याअितकी जर हृदय-सिद्धि अीश्वरानें दिली आणि जीवनांत तें व्यक्त करण्याच्या जीवन-सिद्धी-पासून मात्र वंचित ठेविलें तर मनुष्याला अगदीं गुदमरल्यासारखें कां होणार नाहीं? जेथें पहावें तेथें हे दिव्य संगीताचे धागेदोरे अद्भुत रीतीनें पसरले आहेत. फुलांकडे पहावें, आकाशांतील ताऱ्यांकडे पहावें, नद्यांच्या प्रवाहाचें ध्यान धरावें, मेघमालांवरील रंगांचें वैभव पहावें तर हीं सर्व त्या विश्वसंगीताशीं ताल धरून नाचतांना आणि गातांना दिसतात. आणि आपणच मात्र चुटपुटत राहातों आणि अेका बाजूनें धन्यता आणि दुसऱ्या बाजूनें विफलता या द्विविध अुत्कट अनु-भवांमध्यें चेंगरून जातों. असें पाहून मनुष्य दुसरें काय म्हणूं शकेल?

गीत क्र. २९

सब सुखे दुखे भुले-थाकाय
जान, मम मन तोमारे चाय।

वेदान्तामध्यें अेक ठराविक अुदाहरण घेतलें जातें. सासुरवासी सुनेला सासू, नणंद, भावजय अित्यादि सर्वांची सेवा करावी लागते. त्या सेवेंत यत्किंचितहि चूक किंवा गफलत होअून 'चालत नाहीं. जरा बिघडलें कीं बोलणीं खावीं लागतात. यामुळें सर्व कामें ती अबोध बालिका ध्यानपूर्वक, काळजीपूर्वक बिनचूक करीत असते.

आणि तरीहि या नव्या घरांत तिचें स्वतःचें दैवत असा काय तो तिचा पतिच असतो. यामुळें अेकीकडे ही सर्वांची सेवा बिनचूक चालत असतांना देखील ध्यान, तिचें हृदय पतीकडेच लागलेलें असतें. तो कुठें आहे, त्याला

काय हवें आहे, तो प्रसन्न आहे कीं अप्रसन्न? सर्व कांहीं तिला आपोआप समजतें. अंतर्ज्ञानानें नाहीं पण प्रेमाच्या अंतर्ध्यानानें.

याचप्रमाणें भक्तानें जगाच्या रहाटींत राहून आणि सर्व कर्तव्यें यथासांग पार पाडून आंतील ध्यान अखंड ओश्वराकडेच लावलें पाहिजे. ही झाली साधकाची स्थिति. याच्याहून अेक निराळा प्रसंगहि समजून घेण्याजोगा आहे. सासुरवासी सून सासरचीं कामें बिनचूक करीत असली तरी तिचें सुप्त मनच तें सर्व करीत असतें. तिचें जागृत मन, प्रेमभक्तीनें भारलेलें मन, पतीचेंच ध्यान करीत असतें. यामुळें तिला जर चोवीस तास पतीच्या साक्षात्कार होत असला तर त्यांत नवल नाहीं.

पण ज्याला अेकदां ओश्वराची भक्ति जडली आहे आणि ज्याला सर्व कांहीं तोच आहे ही गोष्ट पटली आहे असा मनुष्य साधक नसला – प्रमादी असला, अेवढेंच नव्हे, तर चांगला दुनियादारींत मुरला असला, तर त्याचें जागृत मन सांसारिक गोष्टींमध्येंच ओतप्रोत झालेलें असतें. ओश्वर आणि त्याची भक्ति यांना जागृत मनाच्या कोनाकोपऱ्यांतहि कोठें जागा नसते. पण अेकदां जें भक्तीचें बीज पेरलें गेलें तें व्यर्थ जाणें शक्य नसतें. अेकदां जी आस्तिकता दृढमूल झाली, हृदयांत रुजली गेली, ती आपलें काम केल्यावांचून रहात नाहीं. पण हा सर्व व्यापार अज्ञातपणें सुप्त मनांत चालत असतो आणि बाहेर येण्यासाठीं अनुकूल संधीची वाट पहात असतो.

मनुष्याच्या जीवनांत जागृत मनाचें क्षेत्र अुठावदार असलें तरी तें अल्प असतें आणि सुप्त मन जरी विस्मृतीच्या भुयारांत काम करीत असलें तरी त्याचें क्षेत्र विशाल असतें. आणि तेथें मनुष्याची जागृति पोंचत नसल्यामुळें त्याचा अधिकारहि तेथें पोंचत नाहीं; व म्हणून त्याच्या विस्मृतीचा – गफलतीचा परिणामहि त्याच्यावर विशेष होत नाहीं. मनुष्य जागा असो किंवा निजलेला असो. त्यानें व्याजू दिलेल्या रकमेवर व्याज जसें वाढतच असते त्याचप्रमाणें ओश्वर-निष्ठेची गुप्त ठेव अज्ञातपणें वाढीला लागलेली असते.

मनुष्याला आपला हिशोब ठाअूक नसला तरी ज्याप्रमाणें बँकेच्या व्यवस्थाप-काला आणि त्याच्या सॉलिसीटरला तो बरोबर ठाअूक असतो त्याप्रमाणें स्वतःच्या सुप्त मनाविषयीं अगदीं अज्ञान – अंधकारांत असलेल्या मनुष्याला ज्या गोष्टी

ठाऊक नसतात त्या ईश्वराला ठाऊक असतात. पुरलेला निधि ज्याप्रमाणें * पायाळू मनुष्याच्या नजरेस पडतो त्याप्रमाणें मनुष्याच्या सुप्त मनांतील सर्व व्यापार भगवंताला ठाऊक असतात.

म्हणूनच कवि म्हणतो, 'भगवंता, मी स्वतःला ओळखतों. याहून तूं मला अधिक ओळखतोस. मी फार तर माझ्या स्मृतीचें क्षेत्र कांहीं अंशीं जाणूं शकतों. विस्मृतीचें क्षेत्र तर तुलाच ठाऊक असतें. म्हणून मी जरी व्यावहारिक आणि सांसारिक गोष्टींच्या मागें पूर्णपणें लागलों असलों तरी आंतून मला तुझाच ध्यास आहे, तूंच मला हवा आहेस, हें तुला ठाऊक आहे. मी कांहीं छातीवर हात ठेऊन तुला सांगूं शकत नाहीं कीं, मी तुझा भक्त आहें. पण तुला ती गोष्ट ठाऊक आहे. माझें सर्व सुख, दुःख तर तूं जाणतोसच. पण महत्त्वाच्या गोष्टी, जीवनाच्या मुख्य गोष्टी, माझ्या कल्याणाच्या गोष्टी मी कसा विसरतों, कां विसरतों, हें देखील सर्व तुला ठाऊक असतें आणि विस्मृतींत देखील मी तुझीच भक्ति करीत आहे हें तुला पटतें.

सब छेड़े सब पाब तोमाय,<br>
जानो मम मन तोमारे चाय।

अेक मुलगा बेरीज शिकला होता. गुणाकार शिकण्याची त्याची तयारी नव्हती. त्यामुळें त्याला प्रत्येक दोन संख्येची बेरीज काय होते हें तोंडपाठ करावें लागे. हजारों संख्यांची बेरीज त्यानें तोंडपाठ केली आणि रोजच्या रोज त्याचें हें ओझें वाढतच गेलें. पुढें जेव्हां अेका शिक्षकानें त्याला सांगितलें कीं वेड्या, गुणाकार म्हणजे बेरजेचाच एक संक्षिप्त प्रकार आहे. गुणाकार समजला म्हणजे बेरजेचें ओझें मुळींच बाळगावें लागत नाहीं. तेव्हां त्यानें हिंमत करून गुणाकाराची रीत समजून घेतली. त्या दिवशीं त्याला केवढा आनंद झाला! तो म्हणाला, काय आश्चर्य! माझ्या सर्व बेरजा या गुणाकाराच्या पोटांत समावल्या आहेत. आजवर पाठ केलेल्या सगळ्या बेरजा विसरून जाण्याची मोठीच सोय मला लाभली आहे.

---

* असें सांगतात कीं जो मनुष्य पायाळू (पायाकडून जन्मलेला) असतो तो डोळ्यांत विशिष्ट अंजन घातलें असतां गाडलेलें धन नेमकें दाखवूं शकतो.

अेका अीश्वराला मिळविलें म्हणजे जगांतील सर्व ज्ञान, सर्व वैभव आणि सर्व सामर्थ्य न मागतां न मिळवितां आपलेसें होतें. कारण तोच ज्ञानेश्वर आहे, तोच परमेश्वर आहे, सर्वसमर्थ लक्ष्मीपति ज्ञानदाता तोच आहे. त्यालाच आपलासा केला म्हणजे कसलेंच अुणें रहात नाहीं.

पण त्याच्या प्राप्तीची जी साधना आहे ती मात्र विचित्र आहे. अितर सर्व वस्तूंचा हव्यास सोडून दिल्यावांचून, सर्वांचा त्याग केल्यावांचून त्याची प्राप्ति होअूं शकत नाहीं आणि त्याची एकदां प्राप्ति झाली म्हणजे बाकीच्या सर्व गोष्टी न मागितल्या तरी आपोआप हजर होतात. यासाठीं जें हवें आहे त्याची वासना सोडून अर्थात् जें हवें आहे तें नकोसें करून अेकदां अीश्वराला आपलासा केला पाहिजे आणि मग जर कोणच्याहि दुन्यवी वस्तूची आवश्यकता अुरलीच तर ती आपोआप समोर येअून पडते. यासाठीं अेकदां अीश्वरप्राप्तीची वैराग्यपूर्ण साधना करून ठेविली म्हणजे दोन्ही प्रकारचा लाभ पदरीं पडतो. अेकतर मला हें हवें तें हवें असली हांवच मुळांत नाहींशी होते. आणि मग जर खरोखरच कशावांचून अडलें असलें तर तें आपोआप मिळून जातें आणि जर कांहींच नको असलें तर मग आपण त्रिभुवनाचे बादशहाच झालों. अुपनिषदांत हेंच निराळ्या शब्दांत सांगितलें आहे. ‘ त्यक्तेन भुञ्जीथाः ’ त्यागाच्या द्वाराच अुपभोग करा. सर्व सोडा म्हणजे सर्व मिळेल. या विरोधाभासामधील तेंच तत्त्व कवीनें येथें गुंफिलें आहे.

**गीत क्र० ४०** आसते जे चाय सन्देहे ताय
ताडाअि बारे बार

प्रभो, जें हातांतून निसटणारें आहे, जाणारें आहे त्याला कवटाळून ठेवण्याचा पुष्कळ प्रयत्न करून पाहिला पण तें तर सर्व आतां निसटून जाअूं लागलें आहे. त्यानें बाहेर जाअूं नये म्हणून दरवाजा बंद करून बसलों. पण कसचें टिकतें! आणि जें कांहीं आंत येअूं पहात होतें त्याच्याविषयीं, ‘ हें मला घातक होअील काय, हें मला लुटेल काय, माझेंच स्थान बळकावील काय? ’ अशा अनेक शंकांनीं मीं त्याला पुनः पुनः माझ्या दरवाजांतून पिटाळलें आहे – काढून लाविलें आहे. यामुळें माझ्या घरांत कोणीच येअूं शकत नाहीं. आणि तुझें हें जें आनंदमय विश्व-भुवन आहे तें माझ्या घराच्या बाहेर मोकळेपणानें खेळत आहे.

शंकाशील होऊन मीं ज्या सर्वांना घराच्या बाहेर काढलें त्यांतच तूंहि असला पाहिजेस. तुला कांहीं माझ्या घरांत शिरण्याची वाट सांपडत नाहीं. तूं अनेक वेळां आलास आणि तितक्या वेळां सगळ्याबरोबर मीं तुलाहि काढून लावलें. तूं सगळ्यांबरोबर या जगांतून कचऱ्याबरोबर वा धुळीबरोबर मिसळून, अेकाकार होऊन कां यावेस ? तुला घरांत बोलवावें अशी माझी अिच्छा आहे. पण तूं तर अेकटा येत नाहींस आणि तुझ्या बरोबरच्या त्या सगळ्या लटांबराला काढून लावलें म्हणजे तूंहि रहाण्याचें नाकारतोस आणि चालता होतोस.

तूं आंत येअूं पहातोस, मी तुला ठेअूं पहातों. पण तूं अेकटा येशील तेव्हांना! तूं येतोस या सगळ्या घोळक्याबरोबर. माझा त्या घोळक्यावर विश्वास नाहीं. मी त्याला बाहेरच्या बाहेर घालवून वाटेला लावतों त्यामुळें तूंहि अंतरतोस.

# गीतांची समग्र सूची

## परिशिष्ट–२

[ ‘रवींद्र–मनन’, ‘रवींद्र–वीणा’ आणि ‘रवींद्र–झंकार’ या तीन पुस्तकांत गीतांजलींतील जीं गीतें आलीं आहेत त्यांची समग्र सूची वाचकांच्या सोयीसाठीं येथें दिली आहे. आरंभींचे आंकडे त्या त्या पुस्तकांतील पृष्ठ–क्रमांक सुचवितात. म = मनन, वी = वीणा, झं = झंकार. कंसांतील नागरी आंकडे बंगाली गीतांजलींतले गीतक्रमांक सुचवतात व अिंग्रजी आंकडे अिंग्रजी गीतांजलींतले गीतक्रमांक सुचवितात. अिंग्रजी गीतांजलीव्यतिरिक्त अन्य पुस्तकांत सांपडणाऱ्या अिंग्रजी अनुवादांचा निर्देशहि कंसांत आहे. ]


| | | | |
|---|---|---|---|
| वी १३० | अन्तर मम विकशित करो | (५) | |
| झं ३३ | आकाशतले अुठल फुटे | (४८) | |
| वी १६ | आछे आमार ह्वदय आछे भरे | (११०) | |
| वी १३८ | आज धानेर खेते रौद्रछायाय | (८) | |
| वी १३४ | आज बरषार रूप हेरि मानवेर माझे | (१००) | |
| म ६४ | आज बारि झरे झर झर | (२७) | |
| म ४२ | आजि झडेर राते तोमार अभिसार | (२०) | (23) |
| झं २८ | आजि श्रावण-घन-गहन-मोहे | (१८) | (22) |
| झं २३ | आनन्देरअि सागर थेके | (९) | |
| झं ४ | आबार अेरा घिरेछे मोर मन | (३३) | |
| झं ७६ | आबार असेछे आषाढ आकाश छेये | (९९) | |

| | | | |
|---|---|---|---|
| वी ५९ | आमार अे गान छेड़ेछे तार | ( १२५ ) | ( 7 ) |
| झं ६७ | आमार अे प्रेम नय तो भीरु | ( ८९ ) | |
| झं ६१ | आमार अेकला घरेर आड़ाल भेडे. | ( ८४ ) | |
| म ११५ | आमार खेला जखन छिल तोमार सने | ( ६८ ) | ( 97 ) |
| वी ८८ | आमार चित्त तोमाय नित्य हबे | ( १३७ ) | |
| म २६ | आमार नयन–भुलानो अेले | ( १३ ) | |
| वी ९२ | आमार नामटा दिये ढेके राखि जारे | ( १४३ ) | ( 29 ) |
| वी ७५ | आमार माझे तोमार लीला हबे | ( १३० ) | |
| वी १२१ | आमार माथा नत करे दाओ हे तोमार | ( १ ) | |
| म ७४ | आमार मिलन लागि तुमि | ( ३४ ) | ( 46 ) |
| म १५१ | आमारे जदि जागाले आजि, नाथ | ( ८६ ) | |
| वी १ | आमि चेये आछि तोमादेर सबापाने | ( १०४ ) | |
| म १ | आमि बहु वासनाय प्राणपणे चाअि | ( २ ) | ( 14 ) |
| म ७१ | आमि हेथाय थाकि शुधु | ( ३१ ) | ( 15 ) |
| वी ४ | आर आमाय आमि निजेर शिरे | ( १०५ ) | ( 9 ) |
| म ६१ | आर नाअि रे वेला, नामल छाया | ( २६ ) | ( 74 ) |
| म १६२ | आरो आघात सअिबे आमार | ( ९० ) | |
| वी ४१ | अुड़िये ध्वजा अभ्रभेदी रथे | ( ११८ ) | |
| म १६७ | अेअि करेछ भालो, निठुर | ( ९१ ) | ( Crossing 6 ) |
| म १४५ | अेअि ज्योत्स्नाराते जागे आमार प्राण | ( ८२ ) | |
| म ६८ | अेअि तो तोमार प्रेम, ओगो | ( ३० ) | ( 59 ) |
| झं १७ | अेअि मलिन वस्त्र छाड़ते हबे | ( ४१ ) | |
| झं ७८ | अेअि मोर साध जेन अे जीवनमाझे | ( १०२ ) | |
| म १०३ | अेकटि अेकटि करे तोमार | ( ६४ ) | |
| झं ९७ | अेकटि नमस्कारे, प्रभु | ( १४८ ) | ( 103 ) |
| म १९१ | अेकला आमि बाहिर हलेम | ( १०३ ) | ( 30 ) |
| झं ६४ | अेका आमि फिरव ना आर | ( ८५ ) | |
| म ९४ | अेबार नीरव करे दाओ हे तोमार | ( ५९ ) | |

म ११९ ऐ रे तरी दिल खुले (६९)
झं १४१ ओगो आमार एेञि जीवनेर (११६) (91)
झं ४९ ओगो मौन, ना जदि कओ (७१) (19)
वी १२६ कत अजानारे जानाञिले तुमि (३) (63)
म १४८ कथा छिल अेक–तरीते केवल तुमि आमि (८३) (42)
म १०६ कबे आमि बाहिर हलेम (६५)
झं ८० के बले सब फेले जाबि (११२)
म ३६ कोथाय आलो, कोथाय ओरे आलो (१७) (27)
म ८० कोन् आलोते प्राणेर प्रदीप (५१)
वी २० गर्व करे निञि ने ओ नाम, जान अन्तर्यामी (१११)
वी १०९ गान गावाले आमाय तुमि (१५४)
झं ९४ गान दिये जे तोमाय खूँजि (१३२) (101)
वी ७२ गाबार मतो हय नि कोनो गान (१२९)
म १५७ चाञि गो आमि तोमारे चाञि (८८) (38)
म १३७ चिर जनमेर वेदना (७)
वी १२ छाड़िस ने, धरे थाक अँटे (१०९)
म १५४ छिन्न करे लओ हे मोरे (८७) (6)
वी ८१ जखन आमाय बाँध' आगे पिछे (१३५)
म ३१ जगत् जुड़े अुदार सुरे (१५)
झं २० जगते आनन्दयज्ञे आमार निमंत्रण (४४)
झं १११ जड़ाये आछे बाधा, छाड़ाये जेते चाञि (१४५) (28)
झं ९१ जड़िये गेछे सरु मोटा (१२८)
वी ८३ जतकाल तुञि शिशुर मतो (१३६)
म १२३ जतबार आलो ज्वालाते चाञि (७२)
म ५१ जदि तोमार देखा ना पाञि, प्रभु (२४) (79)
झं १०८ जा दियेछ आमार अे प्राण भरि (१३९)
वी ३६ जात्री आमि ओरे (११७)
म ४५ जानि जानि कोन् आदिकाल हते (२१)

झं ४० जीवन जखन शुकाये जाय (५८) (39)
वी १०० जीवने जत पूजा (१४७)
झं १०२ जीबने जा चिरदिन (१४९)
म १८० जेथाय तोमार लुट हतेछे भुवने (९६)
वी ८ जेथाय थाके सबार अधम (१०७) (10)
झं १४५ जेन शेष गाने मोर सब रागिणी पुरे (१३४) (58)
म १७७ डाको डाको डाको आमारे (९५)
म ९१ तब सिंहासनेर आसन हते (५६) (49)
वी ५२ ताअि तोमार आनन्द आमार 'पर (१२१) (56)
झं ५८ तारा तोमार नामे बाटेर माझे (८१)
झं ५५ तारा दिनेर बेला अेसे छिल (९०) (33)
म ९३ तुमि आमार आपन, तुमि आछ आमार काछे (५२)
झं ३७ तुमि अेबार आमाय.लहो हे नाथ, लहो (५७)
म ४८ तुमि केमन करे गान कर जे, गुणी (२२) (3)
झं १३२ तुमि नब नब रूपे अेसो प्राणे (७)
म १४० तुमि जखन गान गाहिते बल (७८) (2)
म १७१ तुमि जे काज करछ, आमाय (९३)
झं १३१ तोमाय खोंजा शेष हबे ना मोर (१३३)
म १११ तोमार प्रेम जे बअिते पारि (६६)
म २१ तोमार सोनार थालाय साजाब आज (१०) (83)
म १०० तोरा शुनिस नि कि शुनिस नि तार (६२) (45)
वी ३२ दया क'रे अिच्छा क'रे आपनि छोटो हये (११५)
झं ५२ दया दिये हबे गो मोर (७५)
वी ११८ दिवस जदि सांग हल, ना जदि गाहे पाखि (१५७) (24)
वी ७८ दुःस्वपन कोथा हते अेसे (१३१)
झं ६९ देवता जेने दूरे रअि दाँड़ाये (९२) (77)
वी २५ नदी पारेर अेअि आषाढेर (११३)
वी ९५ नामटा जेदिन घुचाबे, नाथ (१४४)

म ८७ नामाओ नामाओ आमाय तोमार (५३)
वी ६४ निन्दा दुःखे अपमाने (१२६)
झं ११ निशार स्वपन छुटल रे ओअि (३७)
झं ७ पारवि ना कि जोग दिते ओअि छन्दे रे (३६) (70)
झं ८७ प्रभुगृह हते आसिले जे दिन (१२३) (85)
म १८ प्रेमे प्राणे गाने गन्धे (६)
झं १४८ प्रेमेर हाते धरा देब (१५१) (17)
म १८३ फुलेर मतन आपनि फुटाओ गान (९७)
म १३१ बज्रे तोमार बाजे बाँशि (७४)
म १३ बिपदे मोरे रक्षा करो (४) Fruit gathering Lxxix
झं ४३ बिश्व जखन निद्रामगन (६०)
म १७४ बिश्वसाथे जोगे जेथाय विहार’ (९४)
वी ४४ भजन पूजन साधन आराधना (११९) (11)
वी ५५ भेवेछिनु मने जा हबार तारि शेषे (१२४) (37)
वी २८ मरण जे दिन दिनेर शेषे (११४) (90)
झं ८४ मानेर आसन, आरामशायन (१२२)
झं ७३ मुख फिराये रब तोमार पाने (९८)
झं १ मेघेर ’परे मेघ जमेछे (१६) (18)
झं ४६ मेनेछि, हार मेनेछि (६३)
वी ६८ राजार मतो बेशे तुमि साजाओ जे शिशुरे (१२७) (8)
झं ३१ रूपसागरे डुब दियेछि (४७) (100)
झं १४ शरते आज कोन् अतिथि (३८)
वी ११४ शेषेर मध्ये अशेष आछे (१५६)
वी १०४ संसारेते आर जाहारा (१५२) (32)
म १२८ सबा हते राखब तोमाय (७३)
म १३४ सभा जखन भाङबे तखन (७६)
वी ४९ सीमार माझे, असीम, तुमि (१२०)
झं १२७ सुन्दर, तुमि ऐसेछिले आज प्राते (६७)

म  ९७ से  जे  पाशे असे बसेछिल (६१) (26)
झं ११९ हे मोर चित्त, पुण्य तीर्थे (१०६)
झं १३५ हे मोर दुर्भागा देश, जादेर करेछ अपमान (१०८)
म १८६ हे मोर देवता, भरिया ए देह प्राण (१०१) (65)
म  ७७ हेथा जे गाअिते आसा आमार (३९) (13)
म  ५८  हेरि अहरह तोमारि बिरह (२५) (84)

[illegible] ग्रंथ [illegible]
[illegible] वि: [illegible]
[illegible] 20/3/[illegible]

92684

REFBK-0012745

REFBK-0012745

कवीवर्य रविबाबूंच्या गीतांजलीचा
व आचार्य काकासाहेब कालेलकरांच्या
रसिक भाषाशैलीचा मराठी वाचकांना
परिचय 'रवींद्रमनन' व 'रवींद्रवीणा'
ह्या दोन ग्रंथांद्वारें झालाच आहे.
गीतांजलींतील प्रत्येक गीतांत व्यक्त झालेल्या
रविबाबूंच्या जीवनतत्त्वज्ञानाची आचार्य कालेलकरांनीं
आपल्या सोप्या, रसिक मराठी शैलींत
मनन लिहून फोड करून दाखविली आहे.
त्याशिवाय गीतांतील ज्या ओळी विशेष आवडल्या
किंवा महत्त्वाच्या वाटल्या
त्यांच्यावर विस्तृत टीपा लिहिल्या आहेत.
रविबाबूंचें गूढ मानलें जाणारें तत्त्वज्ञान
सोप्या साध्या भाषेंत मराठी वाचकापर्यंत
पोंचविण्याच्या हेतूनेंच
हीं पुस्तकें लिहिलीं गेलीं आहेत.
प्रस्तुत पुस्तकांत मूळ बंगाली गीत,
त्यांतील भाव विशद करणारें मनन,
गीताचा स्वैर अनुवाद
व कठीण बंगाली शब्दांचे अर्थ देण्यांत आले आहेत.
बंगाली गीतें बंगाली पद्धतीनें वाचतां
यावींत म्हणून बंगाली उच्चारणाचे नियम
'रवींद्रमनन' ह्या पुस्तकांत दिले आहेत.
ह्या तीन पुस्तकांत मिळून निवडक ००
गीतें घेण्यांत आलीं असून ह्या द्वारें रविबाबूंचीं
मूळ गीतें आणि त्यांचें तत्त्वज्ञान ह्याचा प्रत्यक्ष
परिचय मराठी वाचकांना होईल.